


# Mel Vyagrah

Magazine May 2020

महाराष्ट्र वन विभाग

*Newsletter of Melghat Tiger Reserve*

## Wildflower Melghat

*Leonotis nepetifolia*

दिपमाळ



Newsletter of
Melghat Tiger Reserve
Amravati

# Mel Vyagrah

Magazine May 2020




## Magical Melghat MOBILE APP

***First time in the history of Melghat, the android App for Melghat Tiger Reserve is Now made available on Google Play Store and ios Store. Download it and make reservations for Safari, Accommodation, Night Safari, Full Day Safari, Machaan Stay and many more.***



GET IT ON Google Play

Download on the App Store

*Bookings are also available on*
**www.magicalmelghat.com**




**Editor:**

**M.S. Reddy** *IFS*

Additional Principal Chief Conservator of Forest
& Field Director, Melghat Tiger Reserve, Amravati

**Cover Photo Front and Back :**

**Piyusha Jagtap** *IFS*

Divisional Forest Officer
Melghat Wildlife Division, Partawada

**Supported by:**

**Dr. Shivabala** *IFS*

**Sipna Wildlife Division**

**Vinod Shivkumar** *IFS*

**Gugamal Wildlife Division**

**T. Bula Elil Mati** *IFS*

**Akot Wildlife Division**

**Piyusha Jagtap** *IFS*

**Melghat Wildlife Division**

**Vishal Mali**

**Divisional Forest Officer**
**(O/o M.T.R. & W.C.C.)**

**Manoj Khairnar**

**Divisional Forest Officer**
**Akola Wildlife Division**

**Shubhash Puranik**

**Divisional Forest Officer**
**Pandharkawada Wildlife Division**

**Typesetting & Design:**

**Anand Vipat**

*(Graphic Designer)*

**Compile by:**

**Prafulla Sawarkar**

*(Livelihood Expert)*

**© Published and Issued By:**

Office of the Additional Principal Chief Conservator
of Forest & Field Director, Melghat Tiger Reserve,
Amravati 444 602 (M.S.)



**Website: www.magicalmelghat.com**
**E-mail: projecttigermelghat@gmail.com**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेख/कविता/माहिती | लेखक | पान नं. |
|---|---|---|---|
| 1. | संपादकीय | श्री. एम.एस. रेड्डी | 1 |
| 2. | Photographs Section | मेळघाट टीम | 2 |
| 3. | लॉकडाऊन मधील मेळघाट व्याघ्र प्रकल्पाची भूमिका | मेळघाट टीम | 3 |
| 4. | अंधारी दरीतील हिरवी सकाळ... | पियुषा जगताप | 7 |
| 5. | फायर सेल मेळघाट : केस स्टडी | विशाल माळी | 10 |
| 6. | वाईल्डलाईफ क्राईम सेल | आकाश सारडा | 13 |
| 7. | माझे पहिले व्याघ्र दर्शन | सुनिता हरिभाऊ रोगे | 16 |
| 8. | व्याघ्र दर्शन | मोनिका चौधरी | 17 |
| 9. | मांडूळ साप (दुतोंड्या) समज/गैरसमज | एन.बी. अंभोरे | 18 |
| 10. | मेळघाटातील वन सैनिक | प्रफुल्ल सावरकर | 21 |
| 11. | मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील आदिवासी महिला सशक्तीकरण | राम ध. उमेकर | 22 |
| 12. | उन्नतीसाठी उपजीविका | प्रफुल्ल सावरकर | 24 |
| 13. | मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पुनर्वसन एक नवसंजीवनी | अतुल दि. तिखे | 27 |
| 14. | अंगारमुक्त वनांचा मार्ग, लोक सहभागातून जातोय का? | धंनजय सायरे | 29 |
| 15. | "मेळघाट" धरतीवरील स्वर्ग... | मीना जाधव | 32 |
| 16. | अविस्मणीय रात्र 'निसर्ग अनुभव' 'मचानवरील थरारक रात्र' | दीपा जाधव | 34 |
| 17. | मनस्वी मेळघाट आणि नरनाळा | सतिश अनसिंगकर | 37 |
| 18. | MY DAD IS GREEN HERO | प्रतिक्षा इंगळे | 40 |
| 19. | "मेळघाट" एक अविस्मरणीय अनुभव | भुषण अ. कुळकुर्णी | 41 |
| 20. | मेळघाट आणि प्रवासातील जैवविविधता | भरत पाटील | 43 |
| 21. | मॅजिकल मेळघाट एक विलोभनिय प्रवास वर्णन | नारायणी नि. चौधरी | 44 |
| 22. | अद्‌भुत जादुई मेळघाट | अंगुल खांडेकर | 46 |
| 23. | मेळघाटातील आधुनिक भागीरथ | अमोल सावंत | 49 |
| 24. | वन है हमारी असीम धरोहर / निसर्ग अनुभव | अभय चंदेल/संदीप खंडारे | 52 |
| 25. | प्राण्यांतील शैली / काटेपूर्णा | एस.एस. सोळुंके/श्रीराम कुरवाडे | 53 |
| 26. | प्रिय वनरक्षकास / मृगजळ | पियुषा जगताप/एस.एस. धवसे | 54 |
| 27. | मेळघाट निसर्ग / हार्दिक अभिनंदन | अनुप/मी सुध्दा रंक्षक | 55 |
| 28. | मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या कार्याची वृत्तपत्रांनी घेतलेली दखल | मेळघाट टिम | 56 |
| 29. | निसर्ग सृष्टीवर आधारीत कलाकृती | सृष्टी किशोर रिठे | 60 |
| 30. | निसर्ग सृष्टीवर आधारीत कलाकृती | पियुषा जगताप | 61 |
| 31. | पांढरकवडा वनविभाग विशेष माहिती | प्रफुल्ल सावरकर | 62 |


Mel Vyagrah
Magazine May 2020
वन परिसंस्थेतील
सर्वात महत्वाचा घटक वाघ
मेळघाट व्याघ्र प्रकल्प

Mel Vyagrah

# संपादकीय...

**श्री. एम.एस. रेड्डी *IFS***
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक
मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती



नमस्कार,

मी आपणास प्रथम विनंती करतो कि, कोरोना (केविड-19) या संसर्गजन्य विषाणूपासून आपण सुरक्षित राहावे व त्यासाठी आवश्यक ते उपाय व प्रतिबंध करून या विषाणूपासून आपण, आपला देश व आपले वन्यजीव सुरक्षित राहतील.

मेळघाट व्याघ्र प्रकल्प हा भारतातील प्रथम 9 व्याघ्र प्रकल्पामध्ये एक महत्वाचा व्याघ्र प्रकल्प असून जैव विविधतेने संपन्न आहे. 22 फेब्रुवारी 1974 ला या व्याघ्र प्रकल्पाची स्थापना झाली असून 2757.97 चौ.कि.मी. क्षेत्रात पसरलेले असून 4 वन्यजीव विभागामध्ये विभागले आहेत. ज्यामध्ये गुगामल राष्ट्रीय उद्यान, मेळघाट, नरनाळा, वान, अंबाबरवा हे अभयारण्य येतात. या शिवाय मेळघाट व्याघ्र प्रकल्प कार्यालया अंतर्गत अकोला वन्यजीव विभागातील काटेपूर्णा, कारंजा सोहळ, ज्ञानगंगा, लोणार हे अभयारण्य येतात. आपल्या आनंदात भर घालण्यासाठी सांगू इच्छितो कि, पांढरकवडा विभागा अंतर्गत असलेले टिपेश्वर व पैनगंगा अभयारण्याचा समावेश एप्रिल 2020 मेळघाट व्याघ्र प्रकल्प अधिकार क्षेत्रामध्ये झाला आहे, यातील टिपेश्वर अभयारण्य हे वाघासाठी प्रसिध्द आहे. हे सर्व निसर्ग प्रेमींना माहितच आहे.

जैविक परिसंस्थेमध्ये कणा असलेल्या वाघाची मेळघाट ही भूमी, 2018 च्या व्याघ्र गणनेनुसार मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये 50+ वाघांची नोंदणी झाली आहे व ही सर्व मेळघाट प्रेमी, वन्यजीव अभ्यासक आणि आमच्या सर्व क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी यांच्या आनंदात भर घालत असून मेळघाट व्याघ्र प्रकल्प हे वाघासाठी सुरक्षित, अबाधित आणि कशाप्रकारे वाढतील यासाठी विविध उपाय योजना अहोरात्र करत आहे.

ज्या वनामध्ये वाघ दिसतो ते वन समृध्द समजावे असेल महाभारतामध्ये सांगातिले आहे ते वन व वाघाचे संवर्धन करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे, असे भारतीय संविधान मध्ये नमूद केले आहे. त्याप्रमाणे मेळघाटचे वन नैसर्गिक दृष्टीने अतिशय संपन्न व महत्वपूर्ण आहे. आपल्या या वनातून सिपना, गडगा, डोलारा व खापरा या नंद्या उगम पावतात व तापी नदीला जाऊन महाराष्ट्र, मध्य प्रदेश व गुजरात या राज्याच्या शेतीच्या संपन्नेत भर घालतात.

या सातपुड्याच्या वनामध्ये 80 च्या जवळ सस्तन प्राणी असून सोबत 290 पेक्षा पक्ष्यांच्या प्रजाती आहेत.

पर्यटनचा दृष्टीकोनातून ही मेळघाट व्याघ्र प्रकल्प अग्रेसर आहे, ज्यामध्ये पूर्वी सेमाडोह, हरिसाल, नरनाळा, धारगड हे पर्यटन मार्ग होते. यावर्षी चौराकुंड व ढाकणा वनपरीक्षेत्रात सुध्दा पर्यटनाला सुरूवात केली आहे. त्याचा पण आपण आनंद घेऊन मेळघाट व्याघ्र प्रकल्पाला संपन्न करावे.

आपणास कल्पना आहे, संध्या लॉकडाऊन आहे. सर्व अत्यंत आवश्यक सुविधा सोडून इतर विभागातील सर्व कर्मचारी घरीच आहेत. परंतु आपणास कल्पना नसेल मेळघाट व्याघ्र प्रकल्प सुरक्षित व या वनातील वन्यजीव सुरक्षित राहण्यासाठी क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी दिवस रात्र कार्य करत आहे, त्याबद्दल मी त्यांचे कौतुक करतोच पण निसर्ग प्रेमी, वन्यजीव अभ्यासकांना ही विनंती करतो की, आपण ही त्यांच्या कर्तृत्वाची दखल घ्यावी. मेळघाट व्याघ्र प्रकल्प ही आपल्या सर्वांची असीम संपत्ती असून आपल्या सर्वांची ही नैतिक जबाबदारी आहे की, या वनांचे येथील वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन करणे हे आपले सुध्दा कर्तव्य समजावे आणि आपल्या विविध कृतीमार्फत आपण वन समृध्द करण्यात पुढाकार घ्यावे.

लॉकडाऊन मुळे मेळघाट परिसरातील स्थानिक बाजारपेठ अस्थावस्थ झाले असल्यामुळे, मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान मार्फत स्थानिक इको मार्गदर्शन यांना किराणा देण्यात आला. या शिवाय विविध संस्था यांच्या मदतीने मेळघाट व्याघ्र प्रकल्पा अंतर्गत येते असलेल्या सर्व वन्यजीव विभागतील वन संरक्षण कुटीवर सुध्दा किराणा देऊन आपली नैतिकता जोपासली आहे, या शिवाय स्थानिक गावामध्ये कोरोना विषाणूपासून सुरक्षित राहण्यासाठी जगजागृती, मास्क वाटप व इत्यादी उपक्रम राबविले आहेत, जेणे करून या विषाणूचा पादुर्भाव मेळघाटच्या वन परिसरमध्ये होऊ नये.

सदर "मेळव्याघ्र" मासिकेसाठी ज्या सर्व निसर्ग प्रेमी, वन कर्मचारी यांनी आपल्या लेखणीतून, छायाचित्र, विविध कलेच्या माध्यमातून मेळघाट व्याघ्र प्रकल्पाबद्दल ज्या संवेदना, प्रेम व्यक्त केले आहे ते नक्कीच माझ्यासाठी व मेळघाट व्याघ्र प्रकल्पात कार्यरत असलेले सर्व वन अधिकारी, कर्मचारी यांच्या वन संवर्धनाच्या भूमिकेत महत्वाची भर घालतील.

धन्यवाद!


श्री. एम.एस. रेड्डी

सुनिल वाकोडे, वन परिक्षेत्र अधिकारी, धारगड
हिरालाल चौधरी, वन परिक्षेत्र अधिकारी, ढाकणा
डॉ. मयुर भैलुमे, वन परिक्षेत्र अधिकारी, चिखलदरा
परमानंद अलोकार, वनरक्षक, सेमाडोह संकुल

# Photographs Section


Landscape of Melghat Tiger Reserve


Sunset of Melghat Tiger Reserve


Gadaga river of Melghat Tiger Reserve


Spotted owlet


Crested hawk-eagle


Crested hawk-eagle


Gaur


Spotted deer


Sambar




Tiger




Bamboo pit viper


Sloth bear


Sloth bear


Yellow-footed green pigeon


Sunrise of Melghat Tiger Reserve


Gaur



मेळघाट टीम
मेळघाट व्याघ्र प्रकल्प,
अमरावती



# कोविड १९ (कोरोना) दरम्यान अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प यांच्या अधिनिस्त असलेल्या संरक्षित क्षेत्रात करण्यात आलेले विविध उपक्रम.

**मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान मार्फत कोरोना (कोविड १९) या संसर्गजन्य आजारापासून सुरक्षित राहण्यासाठी विविध स्तरावर उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.**

१ मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान मार्फत मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये कार्यरत असलेले अधिकारी, कार्यालीयन कर्मचारी, क्षेत्रीय कर्मचारी/अधिकारी, यांना कोरोना कोविड १९ या संसर्गजन्य आजारापासून सुरक्षित राहण्यासाठी खालीलप्रमाणे कापडी मास्क, Hand Santizer, साबण, इत्यादी पुरवण्यात आले. या शिवाय वेळोवेळी वरिष्ठांमार्फत कोविड १९ या आजारापासून सुरक्षित राहण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले आहे.






२ मेळघाट व्याघ्र प्रकल्पा अंर्तगत येत असलेल्या गावामध्ये विविध माध्यमातून कोरोना (कोविड १९) पासून सुरक्षित राहण्यासाठी गावांमध्ये जनजागृती अभियान राबविण्यात आले. तसेच गावा-गावामध्ये उपाय योजना म्हणून स्थानिक गावकरी लोकांना विविध उपयोगी बाबी देण्यात आल्यात. ज्यामध्ये, मास्क, साबण, इत्यादीचा समावेश खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्यालय | गावांची संख्या | मास्क | Sanitizer | साबण |
|---|---|---|---|---|---|
| १ | अकोट वन्यजीव विभाग | १ | ८०० | ०० | २४७ |
| २ | गुगामल वन्यजीव विभाग | ११ | ५,६२५ | ०० | २,२६२ |
| ३ | सिपना वन्यजीव विभाग | ०० | ०० | ०० | ०० |
| ४ | मेळघाट वन्यजीव विभाग | ३८ | २०,९५३ | ०० | ५,६८० |
| ५ | अकोला वन्यजीव विभाग | ०० | ०० | ०० | ०० |
| ६ | पांढरकवडा वन्यजीव विभाग | ०० | ०० | ०० | ०० |
| | **एकूण** | **५०** | **२७,३७८** | **००** | **८,१८९** |





३ मेळघाट व्याघ्र प्रकल्पा अंर्तगत येत असलेल्या गावामध्ये स्थानिक भाषेत जनजागृती करण्यात आली आहे. यांमध्ये सर्व वनपरीक्षेत्र अधिकारी, क्षेत्रीय कर्मचारी यांनी गावात जाऊन लोकांशी संवाद साधून कोरोना (कोविड १९) बद्दल माहिती देण्यात आली.






४ अ. मेळघाट व्याघ्र प्रकल्पा अंर्तगत येत असलेल्या गावामध्ये विविध गैरशासकीय संस्थाच्या मदतीने किराणा वाटप करण्यात आले आहे.

गुगामल वन्यजीव विभागातील हरिसाल, मांगिया, रोरा, इत्यादी गावातील २५० आदिवासी कुटुंबाना किराणा वाटप करण्यात आले. यामध्ये आटा, तेल, तांदूळ, चहा पावडर, तिखट, मीठ, हळद, डाळ असे प्रती कुटुंब ८०० रुपयांचा किराणा वाटप करण्यात आले आहे.




## मेळघाटातील १२५ कुटुंबांना ग्लोबल सेवा संस्थेकडून मदत

**हरिसालच्या किराणा दुकानाच्या खात्यात ५० हजार ऑनलाईन जमा**

लोकमत लोकमत न्यूज नेटवर्क

Hello Amravati Page No. 3 Apr 14, 2020 Powered by: erelego.com

परतवाडा : मेळघाटातील गरीब गरजू १२५ कुटुंबीयांना ग्लोबल सेवा संस्था नागपूरकडून मदत वितरित केली गली. हरिसाल, रोरा, मांगीया गावात ही मदत दिली गेली. याकरिता हरिसाल येथील थारड यांचे दुकान खात्यात नागपूरवरून ग्लोबल सेवा संस्थेने ५० हजार ऑनलाईन ट्रान्सफर केले. व्याघ्र प्रकल्पांतर्गत गुगामल वन्यजीव विभागाचे सहायक वनसंरक्षक पदवारी यांनी पुढाकार घेतला. गारड यांच्याशी संपर्क साधून त्यांनी १२५ कुटुंबांकरिता



१२५ किट्स बनवून घेतल्यात आणि रविवार, १२ एप्रिल रोजी स्वत: पुढाकार घेत अधिनस्त वनकर्मचारी व अधिकाऱ्यांच्या हस्ते हरिसाल, रोरा, मांगीया गावात त्या किट्स वितरित केल्यात.

यात ग्लोबल सेवा संस्था नागपूरकडून २५० किलो तांदूळ, २५० किलो साखर, २५० किलो डाळ आणि १२५ लिटर खाण्याचे तेल पुरविले गेले. यापूर्वीसुद्धा डिसेंबर २०१९ मध्ये नागपूरच्या याच ग्लोबल सेवा संस्थेकडून मेळघाटातील गरजू गरीब आदिवासी बांधवांना पाचशे ब्लँकेट्स वितरित करण्यात आलेत. लॉकडाऊनच्या परिस्थितीत रविवारला हरिसाल, रोरा, मांगीया येथे वितरित केल्या गेलेले साहित्य उल्लेखनीय ठरले आहे.

४ ब. मेळघाट व्याघ्र प्रकल्पा अंर्तगत हरिसाल व आमझरी येथील महिला शिलाई केंद्रा मार्फत मोठ्या प्रमाणात मास्क तयार करण्यात आले आहे. या करिता वनविभागा मार्फत त्यांना कापड उपलब्ध करून देण्यात आले. ११,००० मास्क या महिला शिलाई केंद्रा द्वारे तयार करण्यात आले व त्याची खरेदी वनविभागाने करून गावकऱ्यांना मोफत वाटप करण्यात आले आहे.

Nagpur Main Page No. 2 Apr 05, 2020 Powered by: erelego.com

रविवार नागपूर, दि. ५ एप्रिल २०२० लोकमत www.lokmat.com ② प्रादेशिक/राज्य




मास्क निर्मितीत गुंतलेल्या हरिसाल येथील नारीशक्ती महिला बचत गटाच्या सदस्य.

### २१ हजार ५३५ पिशव्यांची निर्मिती

हरिसाल येथील नारीशक्ती बचत गटाने २१ हजार ५३५ कापडी पिशव्यांची निर्मिती केली आहे. या कापडी पिशव्या शिवण्याकरिता बचत गटाने अमरावती, धारणी आणि मध्यप्रदेशातील खंडवा येथून 30 रुपये व २० रुपये प्रतिमीटर दराने कापड मिळविले. यात तीन वेगवेगळ्या आकारातील पिशव्यांची त्यांनी निर्मिती केली आहे. एका दिवसाला एक महिला ४० ते ५० पिशव्या शिवते. यात त्या महिलेला १५० रुपये एका दिवसाला मजुरी पडते.

संडे बातमी

## आदिवासी महिलांकडून मेळघाटात 'मास्क' निर्मिती

**बचतगट । आत्मनिर्भरतेकडून आर्थिक सक्षमीकरणाकडे वाटचाल**

अनिल कडू
लोकमत न्यूज नेटवर्क

परतवाडा (अमरावती) : मेळघाटातील आदिवासी महिलांनी 'मास्क'ची निर्मिती सुरू केली आहे. नारीशक्ती महिला बचत गटाच्या माध्यमातून या आदिवासी महिलांनी आर्थिक सक्षमीकरणाची वाट मजबूत करीत आत्मनिर्भरतेचा परिचय दिला. मास्क निर्मितीत पुढे आलेला मेळघाटातील हा पहिला महिला बचत गट ठरला आहे.

धारणी पंचायत समितीने हरिसाल येथील सदर महिला बचत गटाकडे मार्च महिन्यात ४०० मास्कची मागणी नोंदवली व ते मास्क धारणी येथील आरोग्य विभागाला पुरविले. यादरम्यान एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडून प्रकल्प अधिकारी मिताली सेठी यांनी या बचत गटाला ५२ मीटर कापड उपलब्ध करून दिले. एक मीटर कापडात सहा मास्क बनविले जातात. एका दिवसाला एक महिला २० ते २५ मास्क शिवत आहेत. त्यासाठी प्रत्येक मास्कला १५ रुपये असा मोबदला एका महिलेला मिळत आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाकडून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जनवनविकास योजनेतून हरिसाल येथे शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र उभारले गेले. त्यामार्फत आदिवासी महिलांकरिता शिलाई मशीन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

**पिशवी पोहोचली दुबईला**

आदिवासी महिलांद्वारे निर्मित कापडी पिशव्या व्याघ्र प्रकल्पाच्या माध्यमातून मुंबई येथील युनायटेड वेच्या रेणुका बिरगुडिया यांनी दुबईला पाठविल्या आहेत. या कापडी पिशव्या राज्यातील अन्य शहरांतदेखील पोहोचल्या आहेत. शॉपिंग मॉलपासून ब्रुणवा-भाकर केंद्रापर्यंत या पिशव्यांना मागणी आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पालाही बचत गटाने पिशव्या पुरविल्या आहेत. पर्यटकांनीही या पिशवीला पसंती दर्शविली. या कापडी पिशवीवर मेळघाटचा कुलमामा (वाघ) अंकित आहे. ग्राहकांच्या मागणीनुसार नाव आणि चिन्ह अंकित करून या बोलक्या पिशव्या व्याघ्र प्रकल्पाच्या माध्यमातून देशभर पाठविल्या जात आहेत. आज मात्र बचत गटाने मास्क निर्मितीत पुढाकार घेतला असून, कापडाच्या उपलब्धतेनुसार मास्क शिवून देण्यात या महिला सध्या व्यस्त आहेत.

**पर्यावरणपूरक उपक्रम**

पर्यावरणपूरक उपक्रमातूनही या नारीशक्ती महिला बचत गटाने पर्यावरणपूरक कापडी पिशवीची निर्मिती केली. ही कापडी पिशवी प्लास्टिक आणि कॅरिबॅगला पर्याय ठरली आहे. ही कापडी पिशवी (नारीशक्ती बॅग) १०० टक्के बायोडिग्रेडेबल आहे. प्लास्टिक व कॅरिबॅग (पन्नी) बंदीच्या शासकीय आदेशाला पूरक या नारीशक्ती बॅग (कापडी पिशवी) च्या माध्यमातून 'घर तिथे कापडी पिशवी' ही संकल्पनाही साकारली गेली आहे.

४क. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाअंर्तगत येणाऱ्या विविध गावात लोकांना LPG सिलेंडर मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानमार्फत घरपोच पुरवठा करण्यात आले. सदर LPG सिलेंडर पुरवठा करण्याकरिता मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानमार्फत तर्फे स्वतंत्र वाहन खरेदी करण्यात आले आहे. या वाहनातून सर्व गावांना LPG सिलेंडर पुरवठा करण्यात येत आहे. गावकरी यांनी Lockdown मधे जळाऊ लाकूड आणण्याकरिता जंगलात जाऊ नये म्हणून जवळपास १५४ कुटुंबाना LPG सिलेंडर पुरवठा करण्यात आला आहे.




लोकमत

नागरिकांना गॅस सिलिंडरचे वाटप करताना वनाधिकारी व कर्मचारी.

## वस्तापुरात शंभर गॅस सिलिंडरचे वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

परतवाडा : मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान अंतर्गत संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्यावतीने वस्तापूर गावात शंभर गॅस सिलिंडरचे वाटप करण्यात आले.


कोरोना विषाणूच्या अनुषंगाने वन्यजीवांच्या सुरक्षेकरिता जंगल शेजारील गावकऱ्यांना व्याघ्र प्रकल्पाकडून जंगल बंदी करण्यात आली आहे. 'लॉकडाउन'मुळे वाहतुकीची साधने बंद आहेत. घरातच राहावे लागत असल्यामुळे नागरिकांची महत्त्वाची कामेही थांबली आहेत. नेमक्या या अडचणीच्या वेळेस संयुक्त वनव्यवस्थापन समिती गावकऱ्यांच्या पाठीशी उभी झाली आहे. गावातील शंभर गरजवंतांना त्यांनी घरपोच गावात

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा मेळघाट व्याघ्र प्रकल्प क्षेत्रसंचालक एम.एस. रेड्डी व मेळघाट वन्यजीव विभागाच्या उपवनसंरक्षक पीयूषा जगताप, सहायक वनसंरक्षक इंद्रजीत निकम, पी.एस. आत्राम यांच्या मार्गदर्शनात ते वाटप करण्यात आले.

यात संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तेजू हेकडे, वनपाल ए.बी. चंदेल, सरपंचा सरस्वती झामकर, गोडूजी येवले, एल.एल. येलसरे, वनरक्षक व्ही.बी.गुलोरकर, आर.एस.वडे, मनोहर खडके, चव्हाण, शे. मजु यांनी पुढाकार घेतला. दरम्यान साबणासह एक हजार मास्कदेखील वितरित करण्यात आले. कोरोना विषयक जनजागृतीही यावेळी करण्यात आली. नागरिकांना स्वच्छतेचे

मेळघाट व्याघ्र प्रकल्पा अंर्तगत कार्यरत सर्व तपासणी नाक्यवर जिल्हा प्रशासनद्वारे देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे Lockdown ची अंबलबजावणी करण्यात येत आहे.

यामध्ये सेमाडोह, मेमना, धामणगाव, हरिसाल, राजाफाटा, पाचडोंगरी, जारीदा, पोपटखेडा, सावाऱ्या, झरी इत्यादी नाक्याचा समावेश आहे. (एकूण १५ नाका)






कोरोना (कोविड १९) मुळे सर्व संरक्षित क्षेत्रातील पर्यटन बंद असल्यामुळे मेळघाट व्याघ्र प्रकल्पाअंर्तगत कार्यरत असलेल्या सर्व पर्यटन मार्गदर्शक यांना किराणा वाटप करण्यात आले.

आटा ५ किलो, तेल २ लिटर, तांदूळ २ किलो, तूर डाळ १ किलो, मुंग डाळ ५०० ग्राम, साखर १ किलो, तिखट, हळद, मोहरी, गरम मसाला, जीरा, चहा पावडर, सोयाबीन वडी, इत्यादी साहित्य प्रत्येक पर्यटन मार्गदर्शक यांना वाटण्यात आले आहे.




अमरावती | ५
बुधवार, दि. १५ एप्रिल २०२०

## मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पर्यटक मार्गदर्शकांना अन्नधान्य वाटप


चिखलदरा ■ तालुका प्रतिनिधी

कोरोना व्हायरसने संपूर्ण जगामध्ये कहर माजविल्याने सर्व जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे भारतात प्रधानमंत्र्यांनी एकवीस दिवसांच्या लॉकडाऊनची घोषणा केल्यामुळे व आता ३ मेपर्यंत वाढविल्याने त्याचा परिणाम मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पर्यटन स्थळ जसे चिखलदरा, सेमाडोह हरीसाल, ढाकना, धीराखुंड, ज्ञानगंगा, काटेपूर्णा, अंबाबरवा, वझ्झानूर, आणि टिपेश्वर या पर्यटन स्थळी असणारे १३० पर्यटक मार्गदर्शन (गाईड) यांच्या व त्यांच्या परिवाराचा उदरनिर्वाह पूर्णपणे पर्यटनावर अवलंबून असल्याने त्यांच्या परिवारावर उपासमारीची वेळ आली आहे.

पर्यटक मार्गदर्शकांना धान्य वाटप करताना क्षेत्रसंचालक

हे मार्गदर्शक स्थानिक असून त्यांना इथल्या सर्व परिस्थितीचे ज्ञान आहे. या सर्व परिस्थितीचा अभ्यास करून प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक यांच्या नेतृत्वामध्ये सर्व मार्गदर्शकांना मेळघाट कॉन्सेर्वेशन फाऊंडेशनमार्फत जीवनावश्यक बाबी क्षेत्रसंचालक यांच्याहस्ते जसे राशन, किराणा इत्यादी जीवनावश्यक बाबींचे वितरण करण्यात आले आहे. वरील बाबींचे वितरण करताना सर्वांनी तोंडाला मास्क लावून, सामाजिक अंतर (सोशल डिस्टन्सिंग) चे भान ठेवून करण्यात आले.

५ कोरोना (कोविड १९) मुळे संभाव्य धोका लक्षात घेऊन क्षेत्रीय कर्मचार्यांसाठी वैधकीय तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. सेमाडोह, हरिसाल व ढाकणा येथे आयोजित या शिबिरांमध्ये २५० क्षेत्रीय कर्मचारी यांची वैधकीय तपासणी करण्यात आली आहे.






लोकमत

वनकर्मचाऱ्यांची तपासणी करताना वैद्यकीय अधिकारी.

## वन्यजीवांच्या सुरक्षेकरिता वनकर्मचाऱ्यांचे थर्मल स्कॅनिंग

### जनजागृती : व्याघ्र प्रकल्पाचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

परतवाडा : मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत कोरोना विषाणूच्या अनुषंगाने वन्यजीवांच्या सुरक्षिततेकरिता क्षेत्रीय वनकर्मचाऱ्यांसह वनमजुरांचे थर्मल स्कॅनिंग करण्यात येत आहे. वैद्यकीय तपासणी करून आवश्यकतेनुसार औषधांचे वाटपही करण्यात येत आहे.

कोरोना विषाणूचा फैलाव रोखणे व त्याचा संसर्ग क्षेत्रीय कर्मचारी आणि त्याकरिता वन्यजीवांमध्ये होऊ नये, या अनुषंगाने ही खबरदारी घेतली जात आहे.

अपर प्राधान्य मुख्य वनसंरक्षक तथा मेळघाट व्याघ्र प्रकल्प क्षेत्रसंचालक एम. एस. रेड्डी व गुगामल वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक विनोद शिवकुमार यांच्या मार्गदर्शनात, व्याघ्र प्रकल्पाचे वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून ढाकणा वनपरिक्षेत्राचे आर एफओ, हिरालाल चौधरी यांनी बुधवार, १५ एप्रिल रोजी वैद्यकीय तपासणी करून घेतली.

या क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी, वनपाल, वनरक्षक, विशेष व्याघ्र संरक्षण दलातील वनरक्षक, वनमजूर, संरक्षण कुटीवरील रोजंदारी मजूर आणि मुख्यालयी जंगलात कुटुंबासमवेत राहणाऱ्या सदस्यांची वैद्यकीय तपासणी पार पडली. कोहा, ढाकणा, तारुबांदा, धेनकुंड क्षेत्रातील ९३ लोकांच्या तपासणीनंतर आवश्यकतेनुसार औषधांचे वाटप केल्या गेले. कोरोनाच्या अनुषंगाने आवश्यक खबरदारी घेण्याचे निर्देश देत जनजागृतीही करण्यात आली.

दुर्गम भागात कार्यरत असलेल्या संरक्षण कुटीवर कार्यरत असलेल्या स्थानिक रोजंदारी मजूर यांना किराणा वाटप करण्यात आले आहे. Lockdown मुळे स्थानिक पातळी वरील बाजारपेठ विस्कळीत झाल्यामुळे मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानमार्फत १६२ संरक्षण कुटी व तपासणी नाके यांना खालील प्रमाणे किराणा वाटप करण्यात आले आहे.









# अंधारी दरीतील हिरवी सकाळ...

**पियुषा जगताप**
उपवनसंरक्षक
मेळघाट वन्यजीव विभाग
✆:9552355707

उन्हाळ्याची चाहूल यंदा तशी उशीराच लागत आहे. होळी संपून आठवडा झाला तरी अद्यापही विदभार्तली हवा अजून म्हणावी तशी तापली नाहीये. दरवर्षी प्रमाणे मार्च महिन्याची धामधूम, त्यात अजून हे corona चं लोण सगळीकडे पसरत चाललेलं. शेवटी मनाचा हिय्या करूनबाहरे पडायचंच असा पक्का निश्चय करून आज सकाळीच निघालो, जवळच, घाटांग रस्त्याला. सकाळी सहाची वेळ. तांबडं फुटलं तरी सूयोर्दय अद्याप व्हायचाच होता. हवेत मस्त गारवा होता. लेकीची गुलाबी झोप मोडू नये म्हणून तिची पाळण्यात रवानगी करून आम्ही निघालो. पाळण्याची दोरी अथार्त तिच्या आज्जीच्या हाती देऊनच!

घटांग पासून पुढे थंडी जरा जास्तच जाणवायला लागली. त्यातच आम्ही नियोजित ठिकाणी पोहचलो. हे ठिकाण धारणी-परतवाडा मुख्य रस्त्यालगतच्या एका वळणावर होतं. गुर्गी पूल त्याचं नाव. अनेकदा या रस्त्याने जाताना ठरवलं होतं या दरीत कधीतरी उतरायचंच. आज तो योग जुळून आला. सिपना नदी खोर्यातली ही दरी. एका बाजूला प्रसिध्द गिरीस्थान चिखलदरा तर दुसर्या बाजू ला तितकेच उंच माखल्याचे पहाड. आणि मध्ये सिपनेच्या विस्तीणर् खोर्यातली, दुतुर्फा जंगलाने वेढलेली ही एक दरी! पानगळीच्या सागाच्या जंगलाला अपवाद अशी ही जागा. सदाहिरत. दरीच्या माथ्यावर एकीकडून वळणा वळणाचा मुख्य रास्ता तर दुसरीकडून एक नैसिगर्क रोपवन. याच ठिकाणी तीन वषार्पूवी मोठ्या प्रमाणावर बांबूच्या झाडांना फुलोरा आला होता. त्यानंतर बीज तयार झाल्यावर बहुतांशी बांबू बेटं सुकून गेली होती. दरीत उतरतांना समोर अस्वल आलं तर काय हा नेहमीचा प्रश्न मनात ठेवून सुरवात केली. शासकीय दौरा असल्याने आठ जणांचा चमू सोबत होताच. हिरडा-झडी (जिथे हिरड्याचं झाड उभं आहे तेथून ) आम्ही उतरायला सुरुवात केली. उतार विशेष नव्हता, साधारण शंभर मीटर चालत गेल्यावर आम्ही अंधारी नाल्याच्या प्रवाहात जाऊन पोचलो. हा या दरीचा मुख्य नाला. उन्हाळा असूनही अद्यापही पाणी वाहत होतं. आम्ही पाणी चुकवत गोट्यांवरून उड्या मारत मारत चाललो. ऊन आलं असलं तरी खाली पोचत नव्हतं . पण दरीत येणारं एक प्रकारचं दडपण इथे येत नव्हतं. कुंद हवा वाहत होतीच. नाल्याभवती मोठी आंब्याची झाडं डौलात उभी होती. कमीत कमी २० ते २२ मीटर उंचीची ती झाडं अवघं आकाश व्यापू न टाकत होती. सहज म्हणू न एका झाडाची गोलाई मोजली तर ती किमान अडीच मीटर भरली. अजून एकाची मोजली तर तब्बल साडेचार मीटर घेर असलेला तो भव्य आम्रवृक्ष होता. आंब्याच्या खाली भरपूर प्रमाणात आंब्याची रोपटी उतरलेली होती. सशक्त जंगलाचं एक महत्वाचं लक्षण! आंब्याची झाडं सदाहिरत असल्याने हिरव्यागार पानांनी डावरलेली होती. काही फांद्यांना नवी पालवी फुटलेली होती. रानडुकराने खाऊन टाकलेल्या मागच्या वषीर्च्या कोवीचे अवशेष अजून दिसत होते. त्यावरून एकूण फळ लहान असावं आणि खूप प्रमाणात येत असावं हे जाणवत होतं. मेळघाटात इतक्या मोठ्या प्रमाणावर इतकी मोठी आंब्याची झाडं मी पहिल्यांदाच पाहत होते. प्रत्येक झाडाला एक व्यक्तीमत्व असतं असं माझं ठाम मत असल्याने, अशया व्यक्तिमत्वाना जवळून पाहण्याचा, त्यांचा सहवास अनुभवण्याचा आनंद काही औरच असतो. त्यात आंबा हा पुरातन काळापासून मांगल्य, सुफळ संपूणर्तेचं प्रतीक आहे. परतु यंदा आंबा म्हणावा तसा फुलाला नव्हता. तरीही त्याची पालवी प्रसन्न करणारीच होती. अंधारी नाल्याच्या दुतर्फा आंबा आणि जांभळाची दाट गर्दी दिसत होती. दरीत बर्यापैकी खाली उतरल्यावर एका ठिकाणी पाण्याचा आवाज कानावर पडला. थोडीशी वाट वाकडी करून एका धबधब्याजवळ पोचलो. गुर्गीपूलाखालून वाहणार्या नाल्याच्या हा तयार झालेला धबधबा. रस्ता बर्यापैकी लांब उंच असावा कारण वाहनांचा आवाज अजीबात येत नव्हता. उन्ह चांगली वर अली असावीत करण आता संपूर्ण दरीत पाखरांचा किलबिलाट ऐकू येत होता. तीन टप्प्यात कोसळणारा हा धबधबा भर उन्हाळ्यातही सुरू होता. पाणी कमी होतं पण सुंदरच दिसत होता. मेळघाटात उन्हाळा कडक आणि दुष्काळी म्हणून प्रसिद्ध आहे. पाणी असणारी अशी काही ठिकाण म्हणजे अपवादच.





खास करून वन्यप्राण्यांसाठी नैसिगर्क पाणवठे म्हणजे अमृताचेच साठे! आशा पणावठ्यात शिकारीसाठी वीष कालावणारे दोन पायाचे प्राणी पण असतात. त्यांना अटकाव करण्याचे काम वनिवभाग सातत्याने करत असतो. धबधब्याच्याधबधब्याच्या पिरसरात मोठे वाढलेले गवत दिसत होते. ते बहुदा हत्ती गवत असावे. त्याला छान फुलोरा आला होता. वाटेवर उगवलेले नेचे (फर्न) अजूनही हिरवेगार होते. नाल्याची आता 'अंधारी नदी' झाला होती. इतक्या वेळ केवळ पाटा (खडक) असल्याने न दिसणारे प्राण्यांचे ठसे आता मधून मधून वाळूच्या पट्टयात उमटलेले दिसत होते. गवे, सांबर, भेडकी, अशा तृणभक्षी प्राण्यांच्या खुरांची तुलना करत त्यांचे फोटो घेत आम्ही पाटा नाल्याजवळ आलो. अंधारी नदीला मिळणारा हा नाला सरळ दरीत उडी घेत होता. त्याला वाहतं पाणी नसलं तरी पावसाळ्यात मोठा धबधबा होत असणार इथे. त्याच्या पायथ्याला डोहात मात्र अजून पाणी साठून होते. नदी पात्र आता थोडं रुंदावलं होतं. आंबा व जांभूळ यांच्या सोबत अजुर्नही दाटीवाटीने उभे होते. काही ठिकाणी वडाच्या पारब्या नदीवर ओणावल्या होत्या. खाली थंड, स्वच्छ,नितळ पाणी वाहत होतं. पारब्यांचा बांधून झोका बनवावा असं एकदा मनात आलं पण माझ्या! चित्रपटातील नायिकेने त्यावर बसून झोका घेतल्यास तिच्या पायाने पाण्यावर तरगं उमटावे त असं हे ठिकाण. पण निसगार्ची रचना बदलून पाण्याकडे धावत निघालेल्या त्या कोवळ्या मुळांना बांधून ठेवण्याचा विचार मी ताबडतोब झटकून टाकला. जंगल भ्रमण केल्यावर काही काळानंतर तुम्हाला गोष्टी फक्त पाहत राहव्याशा वाटतात. त्यात बदल करावा निसगार्च्या नियमात हस्तक्षेप करावा असं नाही वाटत. लहानाहून लहान गोष्टीमागे काहीतरी करण असतं. निसगार्तील प्रत्येक गोष्ट हा छोटासा चमत्कारच असतो आणि तो दुरून पाहणे व समजून घेणे यातच खरा आनंद असतो. साधारण तीन किलोमीटर चालल्यानंतर धामणीकुंडी नाला आडवा आला. त्यात सलग पाणी वाहत होते. खडकात डोह तयार झालेले होते आिण खाली-वर असणार्या दोन डोहांना पाण्याचे ओहोळ जोडत होते. पाणी घसरगुंडी खेळत असावे असा हा भाग होता. सलग, शांत,नितळ. पूर्वी फुलोरा येऊन गेलेल्या बांबूच्या सुकलेल्या रांझी पांढर्याशुभ्र दिसत होत्या. त्यांच्या भोवती बांबूची असंख्य पिल्ले पसरलेली होती. त्यातली सशक्त रोपांचे कालांतराने नवीन रांझीत रूपांतर होईल. सुकलेल्या बांबूचे एक खोड मातीतून बाहरे आलेले होते. पावसाने स्वच्छ धुऊन निघाल्याने नैसिगर्क काष्ठिशल्पच वाटत होतं ते. त्यावर वाढणार्या लाखेच्या किड्यासाठी प्रसिध्य असणारी कुसुमची झाडं नव्या पालिवने नटली होती. लाल-लाल पानं वार्यावर डोलत होती. दरीत वाहतं पाणी, हवा आणि पाखरांचा नादमधुर स्वर गुंजत होता. वातावरण भरावल्यासारखे झाले होते. इतक्यात वरून दोन मोठी घुबडं आमच्या चाहुलीने उडत उंच अजुर्नावर जाऊन बसली. फीश आऊल प्रजातीची ती होती. थोडंस पुढे गेल्यावर कोतवाल (रॅकेट टेल्ड ड्रॉगो) आणि ट्री-पाय यांची पकडा-पकडी सुरू होती. पोपटांचे थवे इकडून तिकडे उडत होते. एक छानसं पोपटाचं पीस मला सापडलं. बहुदा शेपटीचं ते असावं असा माझा अंदाज. हिरवा निळा तपिकरी असा चमकदार रगं असलेलं ते पीस मी हलकेच एका ब्रॅकेट मश्रूम मध्ये खोवलं. हे मश्रूम लाकडी कडक प्रकारातले एक.पावसाळा नसूनही कुजक्या तुटक्या फांद्यावर वाढणारं. त्याचा एक छानसा फोटो काढून आम्ही पुढे निघालो. आम्रा नाला ओलांडून आम्ही पुढे पुढे चालत राहिलो. कधी नदीपात्रातून तर कधी बाजूच्या जंगलातून. आता हळू हळू रायमुनीया अथार्त घाणेरीचे प्रमाण वाढत चालले होते. साधारण पंचवीस तीस मीटर वर झुडपं सळसळ करत होती. आम्ही सावध झालो. कानोसा घेत स्तब्ध उभे राहीलो.

तेवढ्यात एक मोठा गवा समोर चालत गेला. त्याच्या मागे दोन अजून पिल्लं त्याच वाटेवरून गेले. गव्यांचा कळप बहुदा आसपास चरत असावा. आम्ही तडक तिथून पावलं उचलली. अस्वलाची विष्ठा ठिकठिकाणी सापडत होती. नुकत्याच संपत आलेल्या रायमुनियाच्या छोट्या छोट्या काळ्या गोड फळांचा त्याने फडशा पाडलेला स्पष्ट दिसत होता. मोठ्या झाडांची अजब सरिमसळ इथे पाहायला मिळत होती. अजुर्न बहुतांश ठिकाणी यजमान (होस्ट) चे काम करत होता. त्याच्या पांढर्या तुकतुकीत खोडामध्ये वड, आंबा, जांभूळ, अगदी रायमुनियासुद्धा वाढलेला दिसत होता. एका ठिकाणी तर आंबा आणि अजुर्नाची झाडं एकमेकांना बिलगून एक होऊन गेली होती. साधारण अडीच मीटर गोलईचं एक आंब्याचं आणि एक अजुर्नाचं झाड, त्यांच्या फांद्या आडवी कलमं केल्यासारख्या एकमेकां ना जोडल्या गेलेल्या,किमान चार ठिकाणी. शिवाय जोडच्या ठिकाणी घेर साधारण पाऊण ते एक मीटर! सयामी जुळी (काँजॉइन्ट िट्वन्स) असावीत अशी ती झाडं! एक काळं एक पांढरं! लहान मूल जसं नवीन गोष्टी पाहून हरखून जातं तसं काहीसं माझं मनातल्या मनात झालं होतं. पुढे चिकर गोटा नावाचा नाला येऊन अंधारीला भिडला. हे सर्व नाले डाव्या बाजूनेच नदीला मिळत होते. आता नदीपात्र कोरडं झालं होतं, पण जिमनीखालून, लहान-मोठया गोट्यातून, छुपा प्रवाह वाहत होताच. मधूनच पाणी दिसे मधूनच पूर्ण गायब होऊन जाई. चिकरगोट्याच्या डोहात दीड पुरुषभर पाणी होतं. त्यात पुलासारख्या दोन कपारीत अडकलेल्या शिळेवर उतरून आम्ही बांबूच्या साह्याने त्याची खोली मोजली. त्यातही संततधार वाहतं पाणी होतं. समोर दोन मोठे मधुबाज (हनीबझार्ड) आपले पंख पसरवत उडत गेले. उंच सागाच्या झाडावर जाऊन बसले. पाणी पाहून आम्ही देखील थोडी विश्रांती घेतली. नेमकाच माझ्या बुटाचा चिटकावलेला तळ निघून आला होता. तब्बल पाच वर्ष त्याने अविरत सेवा दिल्यानंतर आता त्याची मरम्मत करायची वेळ आली होती. सात किलोमीटर अंतरानंतर बूट-मोजे काढून पायाला पाण्याचा स्पर्श स्वगर्वत वाटत होता. नदीचा तळ स्पष्ट दिसत होता. लहान लहान मासे आणि पाणनिवळ्यांचे थवे इकडून तिकडे पोहत होते. निवळयांसोबत पाण्यावर तरगंणारे कोळ्यासारखे किटकही होतेच. भक्षकांची दिशाभूल करण्याची त्यांची कला काही औरच असते. हे किटक केवळ पायाची टोकेपाण्यावर टेकवतात, पाण्याचे सरफेस टेन्शन वापरून त्यावर चक्क चालतात. त्यांची सावली मात्र पाण्याच्या तळाशी मोठ्ठी पडते. प्रत्येक पायाभोवती एक वलयांकित वतुर्ळ असा एखादा ड्रॉन कॅमेरा पाण्यात फिरवा तशी ही सावली दिसते. प्रत्यक्षात तो कीटक मात्र त्यापासून थोडा दूर जवळपास पाण्यात नसल्यासारखाच वाटतो. पाहणार्याचं लक्ष सगळं त्या सवलीकडे जातं. सोबत आणलेल्या चिवड्याचा नाष्टा करून पोटभर स्वच्छ पाणी पिऊन कुठलाही कचरा मागे राहणार नाही याची काळजी घेत आम्ही पुढे निघालो. पुढचा अर्धा-अधिक किलोमीटर प्रवास बिगर बुटाचा करावा लागला. पूर्वी अनवाणी चालायची असलेली सवय आता पार मोडल्याची जाणीव झाली. त्या दरीतून आता आम्ही बाहरे पडत होतो. अंधारी नदी सिपनेच्या पत्रात जाऊन मिळत होती. हा भाग बराचसा चराई झालेला, माणसांचा वावर असलेला जाणवत होता. उन्ह डोक्यावर आलं होतं. त्या सुंदर दारीतले ते सूक्ष्मवातावरण (मायक्रो क्लाइमेट) आता संपलं होतं. आम्ही मुख्य रस्त्याला पोचलो होतो. भर उन्हाळ्यात साडेसात किलोमीटर आणि काही तासांचा हा सुंदर हिरवागार अनुभव सोबत घेऊन आम्ही परतलो.

**लेखिका भारतीय वन सेवेतील (IFS) तुकडी २०१४ अधिकारी आहे**



**विशाल माळी**
(विभागीय वन अधिकारी)
मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती
✆: 9673866990




# फायर सेल मेळघाटः केस स्टडी

महाराष्ट्राच्या उत्तर सीमेला पूर्व पश्चिम अशी सातपुड्याच्या रांग पसरली आहे. याच विस्तीर्ण रांगेत अमरावती, अकोला व बुलढाणा जिल्ह्याच्या उत्तर भागात असलेल्या सातपुडा रांगांना मेळघाट असे संबोधले जाते. गाविलगढ पर्वत रांगांचा सुध्दा मेळघाटात समावेश होतो. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाची स्थापना 1974 सालची असून आता या प्रकल्पात एकूण चार प्रशासकीय वन-विभाग आहेत.

मेळघाटचे अवाढव्य डोंगर, सागाची वने, पाण्याचे झरे आणि न संपणाऱ्या नागमोडी वाटा यांनी मढलेला मेळघाट वन-संरक्षणाच्या दृष्टीने आव्हानात्मक आहे. वन वणवा हा व्यापक स्वरूपाची गंभीर समस्या असून नवीन फुटवा, रोपे, लहान प्राणी व किटक यांची अपार हानी होते. जरी सागासारखी झाडे काही प्रमाणात वणव्याला प्रतिरोधक असली तरी बांबू सारख्या वनस्पतींची अपरिमित हानी होते. वन वणवा जरी नैसार्गिक कारणांमुळे जसे वीज पडणे, फांदी घर्षण बाबींमुळे झाल्याचे वानिकी शास्त्रात सांगण्यात येत असले तरी महाराष्ट्रात वन वणवा हा मनुष्य निर्मित कारणांमुळे लागतो. मोहाची फुले गोळा करण्याकरीता झाडाखाली जाळणे, शेतातील राब जंगलात पसरणे, पेटलेली बिडी काडी जंगलात निष्काळजीपणाने फेकणे व वन-अधिकाऱ्यांना कामाला लावण्या करीता सुध्दा लोकांनी आग लावून दिलेची उदाहरणे आहेत.

वणवा लागल्यानंतर ती झपाट्याने पसरते. जमिनीवर पडलेला पालापाचोळा, उष्णता, वारा, इत्यादी भौगोलिक बाबींवर त्याचा पसरण्याचा वेग अवलंबून असतो. डोंगरावरून आग हळू उतरते तर चढतांना अतिशय जोरात चढते. मेळघाटात जर आग लागल्यानंतर जर लवकर विझवली नाही तर ती ऑक्टॉपस सारखी वेगवेगळया दिशेला पसरते. अशा आगीला विझवणे भयंकर कठीण आणि वेळकाढू (time consuming) होते. 2016 मध्ये गुगामल विभागात रूपागोलाई (चिखलदरा परिक्षेत्र) येथे लागलेली आग सतत 4 दिवस 70-80 मजुरांच्या साहाय्याने विझवली होती. म्हणून आग लावणाऱ्यावर नियंत्रण ठेवणे शक्य नसले तरी आग लागल्या नंतर तत्काळ विझवणे तरी आपल्या हातात आहे. असे तत्परतेने केल्याने आग मर्यादित राहून नुकसान कमी होते.

आग नियंत्रणात ठेवण्या करीता पुढील बाबी आवश्यक आहेत.

1. आग लागल्याची माहिती तत्काळ मिळणे.
2. अग्नी-रक्षक आगीच्या स्थळावर लवकर पोहचणे.
3. नियोजनाने साधनांच्या मदतीने आग विझवणे.

पारंपरिक पध्दतीत आगीची माहिती देण्याकरिता मनोर्यावर (Watch Tower) 24 तास मजुरांची नेमणूक केली जाई. त्यांनी मनोर्यांतून जंगलाचे निरीक्षण करायचे व धूर दिसल्यावर माहिती द्यायची. परंतु या पध्दतीत त्रुट्या आहेत. मनोर्यातून सर्व जंगल नजरेत पडत नाही. एखाद्या निरीक्षकाच्या ढिलाई मुळे उशिरा माहिती मिळते. गर्द झाडी, दरीतील आग लवकर समजून येत नाही. रात्री धूर दिसत नाही. त्यामुळे रात्रीच्या आगीची माहिती लवकर मिळत नाही.

यावर उपाय म्हणून "इ-फायर वॉच" या प्रणालीचा अवलंब करणे मेळघाटात 2014-15 मध्ये प्रायोगिक तत्वावर ही प्रणाली सुरू केली. परंतु फायर सेल ची संकल्पना 2018 मध्ये साकारण्यात आली.

## काय आहे इ-फायर वॉच?


शास्त्राच्या मदतीने उपग्रहांचा (satellite) शोध लागला आणि बघता-बघता पृथ्वीचे अवकाश या उपग्रहांनी भरून गेले. या उपग्रहांना चांगल्या प्रतिचे कॅमेरा लावण्यात आले. यातच पुढे चालून थर्मल कॅमेरा चा शोध लागल्यावर उष्णता शोधणारे हे थर्मल कॅमेरा सुध्दा उपग्रहांना जोडून अवकाशात पाठवण्यात आले. असेच काही उपग्रह नेहमी पृथ्वीच्या अवतीभोवती फिरताना पृथ्वीचे छायाचित्र काढतात. अशा छायाचित्रांत जर कुठेही आग लागली असेल तर समजते. सदर छायचित्रे अक्षांश व रेखांश सोबत असल्या कारणाने नकाशासारखेच असतात. त्यामुळे आग लागलेल्या विशिष्ट स्थानाचा शोध घेणे सोपे होते.

अशा प्रकारची उपग्रह यंत्रणा अमेरिकेच्या नासा या संस्थेने व भारताच्या इसरो य संस्थेने उभारली आहे. या दोन्ही यंत्राणामधून पृथ्वीच्या कोणत्याही पृष्ठभागावर आग लागल्यास छायाचित्रात दिसून येते. परंतु अशा छायाचित्रांचे विश्लेषण करणे माहिती विनियोग (Application of Information) करणाऱ्या व्यक्तींना म्हणजे वन विभागाच्या लोकांना शक्य नाही.

याकरिता अशी छायाचित्रे विश्लेषण करून या संस्था मोफत साद करतात. अशा छायाचित्रांचा/नकाशांचा वापर करून आगीचे अचूक ठिकाण शोधण्यात सोपे जाते. सदर आगीची माहिती तात्काळ (near real time) मिळते व त्या माहितीचा वापर आग विझवन्याकरीता सुयोग्य प्रकारे करण्यात येतो. अनेक शासकीय विभाग अशा उपग्रहीय माहितीचा वापर करीत आहे. यात कृषि, भूवैज्ञानिक, मासेमारी, इत्यादि खात्यांचा समावेश होतो.

आगीची माहिती ईमेल स्वरूपात मिळणे करीता नासा च्या वेबसाईट वर सर्व फायर सेल वन रक्षकांचे रेजिस्ट्रेशन करण्यात आले. वन वणवा लागताच या वेबसाईट वरून तत्काळ (near real time) ईमेल प्राप्त होतो.

सदर आगीची माहिती तत्काळ नकाशा मध्ये रूपांतरित केली जाते. सदर नकाशा क्षेत्री कर्मचाऱ्यांना व्हाटस अप ग्रुप वर उपलब्ध करून दिला जातो.




अशा पध्दतीने नकाशा तयार करण्या करीता, QGIS नावाच्या सॉफ्टवेअर चे प्राथमिक प्रशिक्षण सर्व वनरक्षक यांना देण्यात आले. परंतु जरी QGIS वापरता येत नसले तरी दुसऱ्या सोप्या मार्गाने गुगल अर्थ चा वापर करून अशा पध्दतीचा नकाशा तयार करता येवू शकतो.

वन-वणवा हंगामात प्रत्येक रेंज मध्ये आठ अग्नि रक्षक एकाच ठिकाणी ठेवण्यात येतात. काही वन-परीक्षेत्रात मोठे क्षेत्र असल्या कारणाने दोन ठिकाणी विभागणी करून अग्नि रक्षक ठेवण्यात येतात. आग लागल्याची माहिती मिळताच हे अग्नि रक्षक त्यांचेकडील फायर ब्लोर (आग विझवण्याचे यंत्र) घेऊन घटनास्थळी पोहचतात. नकाशाच्या मदतीने त्यांना आग ही वन खंडाच्या कोणत्या दिशेला लागली आहे हे सहज कळते. आग विझवण्याकरिता किती लोक सामुग्री गेली याचा अहवाल पुढील पध्दतीने घेण्यात येतो.

1. आग रिपोर्ट दिनांक :

2. आग रिपोर्ट वेळ :

3. वनपरिक्षेत्र :

4. आग विझवन्या करिता जाण्याची वेळ :

5. आग विझवन्या करिता गेलेल्या व्यक्ती संख्या :

6. ब्लोवर संख्या

7. वाहन क्रमांक :

8. आग विरोधक चमूतील सर्वोच्च वन अधिकाऱ्याचे पद व नांव :

असा अहवाल घेतल्याने क्षेत्रीय कर्मचारी आग विझवण्यात कोणताही निष्काळजीपणा करीत नाही. सदर अहवाल व्हाटस अप ग्रुप वर तत्काळ घेतला जातो.

फायर अलर्ट आल्यावर त्याला लगेच क्षेत्रीय कर्मचाऱ्यांपर्यत पोहचविणे आवश्यक असते. याकरिता मेळघाट फायर सेल मध्ये वनरक्षकांना प्रशिक्षित करून 24X07 कोंट्रोल रूम चालविली जाते. प्रत्येक महिन्याचे टाइम टेबल तयार करून 6 तासाची ड्यूटि दिली जाते. वन-रक्षकाला कॉम्प्युटर किंवा लॅपटॉप दिलेला असतो. वन-रक्षकाचे रेजिस्ट्रेशन खालील बाबींकरीता करून घेतलेले असते.

1. NASA Firms वेबसाइट वर ईमेल रेजिस्ट्रेशन
2. FSI म्हणजे फॉरेस्ट सर्वे ऑफ इंडिया च्या वेबसाइट वर मोबाईल नंबर चे रेजिस्ट्रेशन.

परंतु FSI चे फायर अलर्ट उशिरा मिळणारे बेभरवशाचे असल्या कारणाने नासा च्या ईमेल रेजिस्ट्रेशन चा वापर करणे सुयोग्य आहे. नासा वरून जवळ जवळ सर्व फायर अलर्ट अचूक मिळतात.

तसेच ड्युटी वरील वन-रक्षक पुढील लिंक वरील वेबसाइट चे पण निरीक्षण करीत असतो.

1. https://firms.modaps.eosdis.nasa.gov/map/#z:13;c:77.1,21;d:2020-04-08..2020-04-08;l:countries,protected_areas.firms_noaa20-viirs=D, firms_viirs.firms_modis_afirms_modis_t
2. http://117.239.115.44:90/fsi_fire/fire.html

जरी डोंगराळ भाग असला तरी आगीची सूचना आग लागल्यापासून कमी वेळेत मिळाल्याने आग लवकर आटोक्यात येते. आग आटोक्यात आल्यावर पुढील पध्दतीने अहवाल व्हाटस अप वरील ग्रुप वर मंगविण्यात येतो.

1. आग लागल्याचे दिनांक व वेळ :

2. आग विझल्याचे दिनांक व वेळ :

3. आगीत जळलेले एकूण क्षेत्र :

4. प्र.गु.रि. क्रमांक :

संपूर्ण दिवसातील 24 तासात किती आगी लागल्या याचा रिपोर्ट तयार करून दररोज वरिष्ठ अधिकाऱ्याना सादर करण्यात येतो. अशा पध्दतीने फायर वॉच केल्याने वन-वनव्यावर तत्काळ नियंत्रण मिळवून विझवणे शक्य होते. मेळघाटात अशा पध्दतीने वन-वणवा नियंत्रण केल्याने वणवा मोठ्या प्रमाणात नियंत्रात आला आहे.

फायर कंट्रोल रूम मधील कर्मचाऱ्याच्या सहभागाप्रमाणे क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचे खास म्हणजे वन-रक्षकांचा यात सिंहाचा वाटा आहे.

**आकाश अनिल सारडा**
**वनरक्षक**
**वाईल्डलाईफ क्राईम सेल, अमरावती**
**✆: 9372442771**

# वाईल्डलाईफ क्राईम सेल

Wildlife Crime Cell

वन्यजीव गुन्हेगारी मध्ये ट्रान्स-स्टेट आणि ट्रान्स-देशी स्वभाव आहे. 2013 मध्ये तपासण्यात आलेल्या महाराष्ट्रातील वाघांची शिकार करणारी काही प्रकरणे दिर्घकाळापर्यंत पोहोचली आहेत. वाघांच्या शरीराच्या अवयवांचे शिकार करणे आणि तस्करी करण्यात अशा अनेक टोळयांना समावेश होता. वाघांना मारणारे शिकार करणारे मध्य-प्रदेशातील होते. वाघांच्या शरीराचे अवयव विकत घेणारे पुरवठा करणारे हरियाणा आणि पंजाबचे होते. वाघांचे भाग विकत घेणारे तस्कर दिल्लीच्या नेतरच्या साखळीत तिबेटी आणि चीनी तस्कर होते. ब-यापैकी शिकारी आणि तस्कर मोबाईल फोनचा उपयोग कॉर्डिनेशसाठी करतात. पोलिसांच्या मदतीने हे मोबाईल नंबर मागोवा घेण्यात आले आणि ही वन्यजीव सायबर ऑपरेशसन्सची नम्र सुरूवात होती. नंतर 2015 मध्ये महाराष्ट्र शासन अधिसुचनेसह बाहेर आले. सी.डी.आर.-2015/सीआर-1/स्पेल-1/दिनांक-02/07/2015 ज्याने महाराष्ट्रातील वनविभागाच्या नोडल अधिक-याना थेट सायबर डेटा मागणी करण्याचे अधिकार दिले.

वाईल्‌डलाईफ क्राईम सेल (W.C.C) थेट फिल्ड डायरेक्टर तथा मुख्य वनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती यांच्या अंतर्गत स्थापित करण्यात आले. आता यात एक समर्पित संघ तयार करण्यात आला. ज्यामध्ये विभागीय वन अधिकारी आणि ६ वनरक्षक + ३ STPF वनरक्षक आहेत. फिल्ड डायरेक्टर मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या देखरेखी खाली त्याचे स्वतंत्र कार्यालय आहे. वाईल्‌डलाईफ क्राईम सेल (W.C.C) सायबर उपकरणे आणि तंत्रज्ञानाने भरलेली आहे. टीम ऑफ वाईल्‌डलाईफ क्राईम सेल तसेच सायबर डेटा ऑपरेशन्सचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. यात २ वर्क स्टेशन, २ लॅपटॉप, सायबर टूल किस्टेशन, १ मॅप प्लॉटर आणि सायबर डेटा ॲनलिसिसचे दोन सेट सॉफटवेअर आहेत. वाईल्‌डलाईफ क्राईम सेल क्षेत्रीय तपासणी, आरोपीचा पाठपुरावा आणि लँडस्केप फोटोग्राफी आणि व्हिडीओसाठी २ ड्रोन पथक देखील ठेवले आहे. वाईल्‌डलाईफ क्राईम सेल मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वन्यजीव प्रकरणांचा पाठपुरावा करतो आणि या प्रकरणाचे तपशीलवार खाते (सर्व प्रकरणाचे कागदपत्रे, आरोपीचा बायोडाटा आरोपीचे हाताचे ठसे) सांभाळतात. वाईल्‌डलाईफ क्राईम सेल फरार आरोपीलाही न्यायालयीन खटला पाठपुरावा करण्याचा विचार आहे. वाईल्‌डलाईफ क्राईम सेल मेळघाटमध्ये एक वर्गीकृत माहिती नेटवर्क तयार करीत आहे जे शिकार आणि तस्करांची गुप्त माहिती अगोदरच पुरविते आणि गुन्हयांना रोखता येते. वाईल्‌ड लाईफ क्राईम सेल संपुर्ण महाराष्ट्रात वन आणि वन्यजीवांच्या महत्त्वपुर्ण प्रकरणांमध्ये सायबर डेटा प्रदान करते. वनविभागाच्या प्रभारीकडून औपचारिक, लेखी विनंती विशेष गुन्हयाबाबत घेतली जाते आणि सायबर डेटा व विश्लेषण दिले जाते. विस्तृत डेटाबेस ज्यात वन गुन्हेगारीशी संबंधीत सायबर डेटा, आरोपीचा बायोटाटा (डिजिटल फिंगरप्रिंटसह) डब्ल्यू. सी. सी. मागणीनुसार तपास अधिका-याना कॉल डिटेल रेकॉर्ड (C.D.R.), सबस्क्राइबर डिटेल रेकॉर्ड (S.D.R.), लाइव्ह टॉवर लोकेशन (L.T.L.) असे विविध प्रकारचे सायबर डेटा उपलब्ध करून देऊ लागली.

वाईल्‌डलाईफ क्राईम सेल २०१९ च्या अग्नि हंगामात नासा एफ.आय.आर.एम.एय. सॅटेलिटसह नोंदणी केली आहे. यामुळे अग्निशमन दलाच्या नवकर ओळखण्यात मदत झाली. वास्तविक सक्रिय संदेश आणि नकाशा जिथे आग सक्रिय आहे ते तयार केले गेले आणि संबंधित आर.एफ.ओ., ए.सी.एफ. आणि डी.सी.एफ. यांना व्हॉटसअॅप ग्रुपव्दारे तसेच वायरलेसद्वारे पाठविले जाते. प्रत्येक फायरचा पाठपुरावा फायर विझविण्यापर्यत मेळघाट फायर सेल व्हॉटसअॅप ग्रुपव्दारे तसेच वायरलेसद्वारे माहिती घेण्यात येते. वन अधिका-यांना तातडीने माहिती देण्यात येते. अग्निशमन दल तत्परतेने धाव घेते. ज्यामुळे कमीत-कमी जंगलाचे क्षेत्र आगिमुळे जळणार तसेच डब्ल्यू.सी.सी. गडचिरोली टेरिटोरियल सर्कल कर्मचा-यांना यांना सुध्दा नासाचे नोंदणीकृम असण्याचे प्रशिक्षण दिले तसेच संपूर्ण अग्नि हंगामात संबंधित अग्निशमन दप्तरावरील नकाशांसह वास्तविक आगीची घटनाची माहिती दिली जाते.

वाईल्‌डलाईफ क्राईम सेल ला फिंगरप्रिंट प्रशिक्षण देण्यात आले आहे. फिंगरप्रिंटसचे डिजिटायझेशन आणि त्याची तुलना करण्याचे प्रशिक्षण प्रक्रियेत आहे. पुर्ण प्रशिक्षणानंतर आरोपीच्या फिंगर प्रिंट डेटाची डीजीटल तुलना केली जाऊ शकते. वाईल्‌डलाईफ क्राईम सेल संघास कायदेशीर प्रशिक्षण देखील दिले गेले आहे. मेळघाटच्या गुन्हेगारीच्या वेळी लीगल टूलकिट आणि फॉरेंसिक टूल किट वापरण्यात येते.

वाईल्‌डलाईफ क्राईम सेल ला 2013 मध्ये ढाकणा वन्यजीव मेळघाट व्याघ्र प्रकल्प मधील वाघांच्या शिकार प्रकरणातील शेकडो आरोपींना अटक करण्यात यश मिळाविले. आरोपीच्या खटल्यात अनेक शिकार करणारे लिंक आणि तस्कारांना दोषी ठरविले गेले. वाईल्‌डलाईफ क्राईम सेल ने 2017 च्या सिपना वन्यजीव विभागमध्ये झालेल्या भारतीय गौर शिकार प्रकराणाच्या समन्वयीत तपास ही केला आहे. ज्यामध्ये आठ महिन्यांच्या कालावधीत आरोपींना सर्वात वेगवान शिक्षा सुनावनी गेली आहे.

2017 मध्ये महाबळेश्वर येथे झालेल्या ब्रेन स्ट्रॉमिंग सत्राात मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य नागपूर यांनी वाईल्‌डलाईफ क्राईम सेल ला बळकट करण्याकरिता महाराष्ट्रासाठी एक सायबर सेल तयार करून ते सायबर सेल मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती येथे ठेवण्याचे निर्णय दिले. सदर सायबर सेलला नव्याने 6 वनरक्षकचे पदे निर्माण करून दिले.

# वाघ शिकार प्रकरण, चिखलदरा 31 डिसेंबर 2019

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वाईल्‌डलाईफ क्राईम सेलला असलेला गुप्तहेर कडून वाघाची कातडी काही शिकारी जमातीचे लोक विक्री करत असल्याची गुप्त माहिती मिळाली व सदर माहिती मिळताच गुप्तहेर यांच्या सोबत चर्चा करून डुप्लीकेट खरेदीदार बनून वाघाची कातडी विक्रेत्या सोबत बोलण्यात आले. या प्रकारे वाघ कातडी विक्रेत्या सोबत दोन – तीन वेळा बोलने झाले व विक्रेत्या कडून वाघ कातडीचा व्हिडीओ व काही फोटो मागण्यात आले. ते फोटो मिळताच वरिष्ठांशी सोबत चर्चा केली व वरीष्ठांनी केस करण्यास परवानगी दिली.

वाघ कातडी कोणत्या जागेवर खरेदी करायची ती जागा ठरविण्यात आली व सदर जागेवर वाईल्‌डलाईफ क्राईम सेल टिम व वनपरिक्षेत्र अधिकारी वन्यजीव चिखलदरा याची चमुने सापळा रचला. 31 डिसेंबर 2019 या रोजी मी व गुप्तहेर वाघ कातडी खरेदी करण्याकरिता चारचाकी गाडी घेवून विक्रेत्याला भेटण्याकरिता अचलपूर ते चांदुर बाजार या मार्गावर गेलो व विक्रेत्याला फोन करून वाघ कातडी घेऊन बोलावले सदर ठिकाणी दोन अज्ञात इसम वाघ कातडी एका पोत्यामध्ये टाकून आणली. त्यांना आम्ही आमच्या कारमध्ये बसण्यास सांगितले सदर इसम कारमध्ये बसल्यावर त्याच्या सोबत बोलून त्यांना सांगितले कि खेरदीदार हा धामणगाव ते चिखलदरा या रस्त्यावर आपली वाट पाहत आहे. असे सांगून आम्ही आमची कार चिखलदरा या रस्त्याने घेवून गेलो. काही अंतर गेल्यावर वाईल्‌डलाईफ क्राईम सेल टिम व वनपरिक्षेत्र वन्यजीव चिखलदरा टिम यांनी सदर आरोपीना वाघ कातडी सह पकडण्यात आले. सदर ठिकाणी 1 वाघ कातडी, 3 आरोपी व 1 मोटरसायकल ताब्यात घेवून वनपरिक्षेत्र कार्यालय वन्यजीव, चिखलदरा या ठिकाणी घेवून गेलो व त्या ठिकाणी सदर आरोपी यांना विचारपूस केले असता, त्या प्रकरणात आणखी काही इसम असल्याचे आढळून आले.

त्यानंतर सदर वाघ कातडी प्रकरणात धर-पकड सुरू केली. त्या प्रकरणात मध्यप्रदेश मधून आटनेर, साटनेर या गावातून 3 आरोपी पकडून आणले व सदर आरोपी कडून वाघ मिशा जप्त केल्या व सदर प्रकरणात एक वेळा रेंड करण्याकरिता गेलो असता, आटनेर या गावात वनविभागाच्या टिमवर दगड फेक झाली व सदर दगड फेकमध्ये वनविभागाची महिला कर्मचारी कु. नविता खिराडे, वनरक्षक यांना गंभीर दुखापत होवून सुध्दा वनविभागाच्या टिमने आरोपीला ताब्यात घेवून महाराष्ट्रात आणले. त्यांनतर महाराष्ट्रात मेळघाट व्याघ्र प्रकल्पामधील हरिसाल परिक्षेत्रात असलेल्या मालूर या गावात रेड केली असता 3 गवळी आरोपी ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपीच्या घरातून आणखी काही वन्यप्राण्याचे अवयव जप्त केले जसे वाघाचे नखे, वाघ दात, सांबर शिंगे, सायळचे काटे, मोरांची, पंख, इत्यादी जप्त बाबी करण्यात आले.

तपासा दरम्यान असे लक्षात आले कि, सदर वाघ शिकार ही मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील सिपना वन्यजीव विभाग मधील चौराकुंड परिक्षेत्रात काही गवळी लोकांकडून असे कडले कि, त्यांच्या म्हशीला वाघाने मारल्याने म्हशीवर विषबाधा करून वाघ मारल्याचे कबूली दिली. सदर वाघाचे कातडी, नखे, दात व मिशा त्यांनी काढल्यात.

**या प्रकरणात वाईल्‌डलाईफ क्राईम सेल टिम व वनपरिक्षेत्र अधिकारी, वन्यजीव चिखलदरा यांच्या टिमने 12 आरोपीना पकडले व सोबत 6 वाघ नखे, 4 वाघ दात, वाघ मिशा व 2 मोटरसायकल, इत्यादी जप्त करण्यात आले.**






## Milestone Development of Wildlife Crime Cell of Melghat Tiger Reserve

**"प्राणिनाम रक्षणार्थ समर्पित"**

**Wildlife Crime Cell Team**
**Melghat Tiger Reserve**

वने वा वन्यजीव तस्करी व शिकारी वरती आळा घालण्यासाठी मेळघाट व्याघ्र प्रकल्पा अंतर्गत २०१३ मध्ये Wildlife Crime Cell स्थापना करण्यात आले.

या वाईल्डलाईफ क्राईम सेल चे नोडल अधिकारी अपर प्रधान मुख्य वन संरक्षक हे मुख्य असतात. त्या नंतर नोडल पर्सन हे विभागीय वन अधिकारी असून सहायक नोडल पर्सन हे ६ असतात व या सोबत Special Tiger Protect Force (STPF) चे जवान ३ असून एकूण ११ लोकांना मिळून हे वाईल्डलाईफ क्राईम सेल परिपूर्ण झाले आहे.

या वाईल्डलाईफ क्राईम सेल ने २०१३ पासून तर चालू २०२० वर्षा पर्यंत १५० पेक्षा अधिक शिकारांना पकडून नायालयामार्फत शिक्षा थोटावली आहे.

वाईल्डलाईफ क्राईम सेल हे मेळघाट व्याघ्र प्रकल्प पुरते मर्यादित राहिले नसून महाराष्ट्र व भारतातील इतर ही व्याघ्र प्रकल्प, अभयारण्य, राखीव क्षेत्र व इतर ही वन विभागाला शिकारी पकडण्यात सहकार्य करून आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडतात.

या वाईल्डलाईफ क्राईम सेल विकासाचा वाढता ओघ बघता कर्तव्य पार पाडण्यासाठी आवश्यक व महत्वपूर्ण साहित्य, प्रशिक्षण खरेदी केले आहे. जे वन संवर्धन व शिकारीवर कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी उपयुक्त राहील.

### WEAPON & AMMUNITION PURCHASING PERMISSION

- THE UNDER SECRETARY GOVT. OF INDIA MINISTRY OF HOME AFFAIRS PERMISSION DT. 18/01/2019
- GOVT. OF INDIA MINISTRY OF DEFENSE ORDNANCE FACTORY BOARD, KOLKATA PERMISSION DT. 24/12/2019
- ASSIT. DIRECTOR / AMMUNITION FOR DIRECTOR GENERAL ORDNANCE FACTORIES PI PERMISSION DT. 02/01/2020
- WORKS MANAGER FOR GENERAL MANAGER ORDNANCE FACTORIES VARANGAON PI PERMISSION (SLR AMM.) DT. 03/01/2020
- WORKS MANAGER FOR GENERAL MANAGER ORDNANCE FACTORIES KOLKATA PI PERMISSION (INSAS RIFEL.) DT. 06/01/2020
- JT GENERAL MANAGER FOR SR. GENERAL MANAGER ORDNANCE FACTORIES KHADKI PUNE PI PERMISSION (INSAS RIFEL.AMM. & 9MM AMM) DT. 07/01/2020





# माझे पहिले व्याघ्र दर्शन

सुनीता हरिभाऊ रोगे
(वनरक्षक)
टिपेश्वर अभयारण्य, पांढरकवडा
✆: 8888417399

लहानपणीपासूनचं वन्यप्राण्यांविषयी आवड होती. त्यांना पाहण्याची मनात नेहमीच कुतूहल असायची, तशी संधी कधी येईल माहीत नव्हतं. परंतु 2015 ला अस झालं की, वन विभागाची जाहिरात आली व मी त्याच वर्षी वन विभागात वनरक्षक या पदावर नोकरी ला लागली व ते लहान पनीचे स्वप्न प्रत्यक्षात उतरले. व व्हाईल्ड लाईफ मध्ये काम करण्याची प्रत्यक्ष संधी प्राप्त झाली. अशातच माझ्या नोकरीच्या सुरुवातीच्या दिवसाला जंगलामध्ये लावून असलेला ट्रॅप कॅमेरा बद्दलविण्याची जबाबदारी माझ्याकडे आली. म्हणून मी तो बदलविण्यासाठी जंगलामध्ये जावू लागली. ट्रॅप कॅमेरा नाल्यामध्ये लागून असल्याने मी नाल्याच्या दिशेन निघाली पण काही वेळा नंतर मला वाघा चे पगमार्क दिसले, तेव्हा मनात थोडी भीती निर्माण झाली आणि वाटू लागलं की येथे वाघ असु शकते. कारण माझी ही पहीलीच वेळ होती आणि सोबत कोणी नव्हतं एकटीच होती. पण भीती बाजुला करून माझ्यावर असलेली जबाबदारी पूर्ण करणयासाठी ज्या नाल्यावर ट्रॅप कॅमेरा लावून होता तिथे पोहचली. व कॅमेऱ्याचे मेमरी कार्ड बदलवू लागले व काही वेळाने ते बदलवून झाले व मी मागे वळली. जशी मागे वळली तशी बघते तर काय अगदी जवळ काही अंतरावर माझ्या समोर वाघ उभा होता. वाघाला बघताच माझं शरीर थरकाप होऊ लागले व डोळ्यातून अश्रू बाहेर येऊ लागले. तोंडातून शब्दच बाहेर पडेना असे झाले. कारण या आधी इतक्या जवळून वाघ कधीच बघितला नव्हता. रडत रडत देवाला प्रार्थना करू लागली, कारण वाघ अगदी जवळ आला होता. वाघाचा तो रुबाब, मिश्या, दात व नखे बघून मी खूप घाबरली सर्व देव मला आठवायला लागले. वाघा कडे बघून देवाला प्रार्थना करत होती, की देवा मला वाघाच्या हातून मरायचं नाही, कारण वाघ मला आता खाणार. असच मला वाटत होत. माझ्यावर झेप घेणार. अश्या वेगवेगळ्या शंका मनात येऊ लागल्या पण वाघाने माझ्यावर झेप न घेता मागच्या दिशेने पलटून तेथून निघून गेला. तेव्हा वाघ गेल्या नंतर माझा जीवात जीव आला, आणि एक लक्षात आलं की, आपण जर वन्यप्राण्याला त्रास दिला नाही, काही केलं नाही तर ते पण आपल्याला कधीच काही करत नाही.

शेवटी हेच म्हणेल ,

**वन्यप्राण्यावर प्रेम करा वन्य प्राणी आपल्यावर प्रेम करेल, निसर्गाचं रक्षण करा तेव्हाच निसर्ग आपलं रक्षण करेल..!**



**मोनिका चौधरी**
वनरक्षक, गिरगुटी बीट,
मेळघाट वन्यजीव विभाग
: 9371080538

वन विभागत सेवा करत असतांना सर्वात महत्वाचा भाग असतो जंगलाचा जवळून आस्वाद घेणे. त्यामध्ये अनेक घटक येतात परंतु प्रामुख्याने प्रत्येकाचा प्रश्न येतो कि जंगलात फिरत असतांना तुम्ही वाघ नक्कीच बघितला असेल? त्यावेळी वाघ बघितल्याचा जो अनुभव येतो सांगण्याची उत्कंठा वेळोवेळी असते आणि मी वन सेवत रुजू झाल्यापासून नेहमी मित्रमंडळी तसेच कुटुंबाकडून येणारा हा प्रश्न मला नेहमी त्रासदायक वाटायचा कारण सेवेत ५.८ वर्ष पूर्ण होईपर्यंत मला वाघाचे दर्शन झाले नव्हते. त्यामुळे मी त्यांना माझा अनुभव सांगणे किवा मी अजूनही वाघ पहिला नाही हे सांगणे जरा मला लाजिरवाणे वाटायचे आणि मला हे ही वाटायचे कि, एख़ाद्या गोष्टीचे आपण जेवढी आतुरतने वाट पाहतो तेवढी ती गोष्ट आपल्यापासून दूर जाते. अस कदाचित माझ्या बाबतीत होत असेल असेही मला वाटायचे आणि काही लोक ज्यांची माझ्यापेक्षा वन विभागात जास्त सेवा झालेली आहे त्यांचापैकी अजूनही बऱ्याच लोकांनी आजूनही वाघ पहिला नाही. हे ऐकून मला जरा दिलासा मिळायचा परंतु खंत मात्र नेहमी वाटत होती.

आणि अखेरीच एक दिवस उजाडला कि ज्या दिवसी माझ्या नशिबात वाघ पाहणे होते आणि याला सुद्धा नशीब लागते, कारण ज्यांनी ही सेमाडोह संकुलला भेट दिली तेथील विश्राम गृहाजवळील लिहिलेले वाक्य निश्चित वाचले असेल किवा **वाघ पाहणे ही एक संधी आहे ती प्रत्येकाला मिळेलच असे नाही** त्यामुळे अशाच एका सांयकाळी धूळवाट येथून रानिगावला जात असतांना मनात केवली घरी पोहचण्याचा विचार असतांना सहज आरामत दुचाकी वरून आरामात जात होते तर अचानकपणे समोरून एकदम वाघाने गाडीसमोर उडी मारल्याचे समजले आणि मला गाडी एकदम थांबवणे कठीण झाले. त्यावेळेस सूर्य पूर्णपणे मावळला होता. परंतु मी इतक्या दिवसापासून ज्या सूर्याला पाहण्याची आतुरता ठेवून होती तो सूर्य आज माझ्यासमोर उभा होता. परंतु खरे सांगायचे झाले तर त्याला पाहण्यापेक्षा स्वताला त्याचापासून दूर नेण्याच्या प्रयत्नात मी होते कारण वाघाच्या अन अपेक्षित दर्शनाने वाटणारी भीती त्या दिवशी जास्त अनुभवली थोडा वेळ थांबून त्याला पहिल्या नंतर मी माझ्या मार्गने व तो त्याच्या पाउलवाटेने निघून गेला आणि मला सांक्षात देव दर्शनाचा अनुभव देऊन गेला. अश्याप्रकारे आयुष्यात घडलेले व्याघ्र दर्शन कधीही न विसरण्यासारखे आहे आणि मी वाघ पहिला हे ही तितकेच आनंददायी होते. आता मी पण मेळघाटत पहिला वाघ पाहण्याचा अनुभव सर्वांना सांगेल याची मला नेहमीच ख़ुशी राहणार आहे.





एन.बी. अंभोरे
वनरक्षक,
मेळघाट व्याघ्र प्रकल्प, वान परिक्षेत्र
✆: 7720862304

# मांडूळ साप (दुतोंड्या) समज / गैरसमज

Earth Boa/Redsand Boa (Non-Venomous)

मेळघाटाच्या निसर्गरम्य स्वप्नांच्या दुनियेत प्रत्येक वन्यजीव व जैवविविधता जाती एकमेकांशी निगडीत आहेत. एक जात नष्ट झाली तर त्याचा परिणाम इतर जातीवर प्रतिकुल होईल त्या करीता वन्यजीव सृष्टीचे संरक्षण करणे व त्यांचे संवर्धन करणे काळाची नितांत गरज आहे. यावर माणव जातीचे अस्तीत्वही त्यावर अवलंबुन आहे.

त्याच जैवविविधता अन्न साखळीमधील मांडूळ साप ज्याला आपण दुतोंड्या साप किंवा लोकल नाव डबल इंजिन व त्याचे शास्त्रीय नाव **Redsand Boa (Eryxjohnii)** या प्रचलित नावाने ओळखल्या जातो. मेळघाटातील उंच उंच डोंगर किणाऱ्याच्या पायथ्याशी तसेच शेत शिवार, वनतळे, नैसर्गिक पानवटे, कुरणविकास क्षेत्रातील परिसर व तसेच नदी नाल्याचे ओलसर क्षेत्र किंवा क्षेत्राच्या भागात, खताजवळील ओलसर भागात, काळ्याच्या व गाळाच्या भुसभूशित जमिनीत स्वतःला गाडून घेतल्यासारखा राहतो. पावसाळयात त्याचे बाहेर पडण्याचे प्रमाण अधिक असते.

हा बिनविषारी साप शांत स्वभावाचा, लाजाळू, मंद हालचाल करणारा, जाडसर शरीर, शेपुट व तोंडात जवळपास साम्य वाटत असल्याने याला दुतोंड्या असे नाव पडले आहे.

तसेच आपले भक्षक पकडण्याकरीता आपले शरीर लपवून व तोंड सुध्दा लपवून बाहेर फक्त त्याच्या तोंडासारखी दिसणारी शेपुट ठेवून त्यांच्या कडेला येणाऱ्या भक्षकास चकमा देतो. कारण हा साप मंदगती चालत असल्याकारणाने उंदीर, पाल, सरडे यांच्या मागे लागून पकडू शकणार नसल्याने त्याला निसर्गाने दिलेली ही एक शक्तीच समजावी असे वाटते.

शरीराची लांबी 75 से.मी. (2 फुट 6 इंच) किंवा 100 से.मी. (3 फुट) असते. त्याचे वजन अंदाजे 2 ते 3 किलो पेक्षा जास्त असू शकते. प्रजनन साधारणतः ऑगस्ट ते सप्टेंबर दरम्यान मादी एका वेळेस साधारणतः 6 ते 9 पिलांना जन्म देते. पिलांचा रंग लालसर, तपकिरी व त्यावर काळया रंगाची पुर्ण गोलाकार पट्टे हे कालांतराने नाहीसे होतात. मांडूळ सापाचा रंग **(Brown, Black, Chocolate Brown Black)** असतो. मुख्य खाद्य उंदीर, लहान सस्तन प्राणी, सरडे, पाली, छोटा पक्षी सुध्दा खाद्य आहे. भारतीय वन्यजीव संरक्षण कायदा 1972 च्या अनुसार मांडूळ साप हा **(Schedule 4)** मध्ये येतो.

नैसर्गिक महत्वः

मांडुळ साप हा निरूपद्रची असून शेतीसाठी अत्यंत उपयुक्त मानल्या जातो. उंदीर, पाल इतर किटक भक्षण करून त्यांच्या संख्येवर नियंत्रणात ठेवतो. त्यामुळे किटक व उपद्रव करणाऱ्या जीवांवर व त्यांच्या अमाप संख्येवर नियंत्रण राखले जाऊन नैसर्गिक अन्नसाखळी सुरक्षित राहते.

मानवामुळे मांडूळ सापाचे अस्तीत्व धोक्यात आले आहे. अलिकडच्या काळापर्यंत कोणत्याही गणतीत न येणारा हा मांडूळ साप आपल्या स्वतःला जमिनीत गाडून घेत असल्यामुळे तसेच जमिनीतुन थोडाफार फिरत असल्यामुळे काही मंडळी सदर साप जमिनीत गुप्त धन शोधुन देतो अशी चर्चा सुरू झाल्याने या अंधश्रध्देपाई व गैरसमजुतीमुळे मांडूळ ह्या बिनविषारी सापाची राज्यात बेसुमार तस्करी सुरू आहे. गेल्या काही वर्षात या सापाची मोठ्या प्रमाणात तस्करी होत असल्याने आणि इतरही राज्यात तस्करी होत असल्यामुळे त्याच्या अस्तीत्वाला धोका निर्माण झाला आहे.

त्याची तस्करी आणि अंधश्रध्देमुळे आजच्या शिक्षणाचा व ज्ञानाचा आपणच आपल्या हाताने केलेला पराभव मानायला हवा. वास्तविक कोणत्याही सापाला गुप्त धन ओळखता येत नाही. याला कोणताही वैज्ञानिक पुरावा सुध्दा नाही. मात्र अंधश्रध्दा व गैरसमज वाढले असून त्याच्या मोठ्या प्रमाणात राज्यात व इतर राज्य सुध्दा व तस्कर करण्याचे प्रमाण वाढलेले आढळून आलेले आहे. गेल्या काही वर्षात मांडूळ तस्करीचे अनेक प्रकरणे वनविभागामार्फत उघडकिस आली आहेत.



जादु टोना, वास्तुदोष, गुप्तधन, मटक्याचे आकडे, गुदव्दारातून निघणाऱ्या द्रव्यापासून सेक्स टॉनिक तयार होते असा गैरसमज असून मांडूळ सापाची तांत्रीक आणि मांत्रीकाने पुजा केल्यावर पैशाचा पाऊस पडतो अशा अनेक गैरसमज लोकांमध्ये पसरलेला आहे. तसेच त्याच्या दोन किलो पेक्षा जादा वजनाचे साप गुप्तधनामध्ये नेमतात अशी आणखी एक उप अंधश्रध्दा आहे. त्यामुळे या सापाची किंमत काही लाखाच्या घरात खरेदी विक्री केली जाते. अशा धक्कादायक माहित्या व मिडीयाव्दारे पुढे येत असून अशा प्रकारच्या अफवा परसरत आहेत.

या सापाची तस्करी मटक्यात, पेढ्यांच्या डब्ब्यात, माती टाकुन खोक्यात, पार्सल तसेच माती टाकुन पोत्यात व अनेक पध्दतीने त्याची तस्करी केल्याची उघडकिस आली आहे. काही रिकामी मंडळी मांडूळ सापाबाबत कोणतेही ज्ञान नसतांनाही याच्या खरेदी विक्रीतून शॉर्टकट मार्गातून मालामाल होण्याची स्वप्नं बघतात. त्यामुळे काही मंडळी या सापाच्या हात धूवून या सापाचा शोध शोध करीत असतात. काही तस्करांनी या बाबत पाय पसरल्याने साप नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. व लवकरच (Red Data Book) तसेच अत्यंत धोकाग्रस्त या गटात समावेश होण्याची दाट शक्यता नाकारता येणार नाही. सदरच्या गैरसमजुतीमुळे त्याचा उपयोग केला जातो. मात्र या सापाचा फक्त जीव जाण्यापलिकडे काहीही होत नाही.

उपाययोजना :

मांडूळ सापाचे संरक्षण करण्यासाठी प्रत्येकाने पुढे येणे काळाची गरज आहे. त्यामुळे आपल्या मेळघाटात प्रत्येक वर्षी वाघाचे पगमार्ग पासून अनेक पध्दतीने त्याची गणणा केली जाते व संख्या सांगता येते. परंतू सापांचा अद्यावत गणना केली जात नाही. तसेच मांडूळ सापांची मोठ्या प्रमाणात तस्करी होवून सुध्दा किती आहेत. या बाबत आपण निश्चित सांगू शकत नाही. त्यामुळे आपणच एक पाऊल पुढे टाकून जशी मेळघाट मध्ये सर्वत्र M Stripe गस्त करीत असतात. परंतु गस्ती दरम्यान आपण कधीही सदर सापाचा वन्यजीव दर्शन टाकत नाही. याला महत्व फार कमी देतो. परंतु प्रत्येक गस्ती प्रपत्रात कोठेही सदर सापचे दर्शन घडल्यास कोठेही मांडूळ सापाचे दर्शन घडल्यास त्याचा उल्लेख शेरामध्ये जरूर टाकावा जेणे करून आपल्याला याची जाण होईल. प्रत्येक वनविभागांतर्गत असून आपल्या मेळघाटातील गावालगतच्या भागामध्ये समित्यांमार्फत ग्रामीण जनतेमध्ये या सापाविषयी जनजागृती होणे तेवढेच गरजेचे आहे. तसेच प्रत्येक ग्रामीण भागात मांडुळ तस्करी मंडळी दिसतात. नजीकच्या वनविभागातील वन कर्मचारी यांचेशी संपर्क करावा अशा विश्वास त्यांच्यामध्ये पसरवणे जरूरी आहे.

मेळघाटाच्या ग्रामीण भागात मांडूळ तस्करी करणारी रिकामी टोळी, भोळया आदिवासी लोकांना थोड्या पैशाची लालसा दाखवून त्यांच्याकडून सदर सापाचा शोध घेवू शकतात. त्यामुळे या विषयाबाबत जनजागृती तसेच शिक्षेची तरतुदी बाबत माहिती पुरविणे तेवढेच गरजेचे वाटते.

अलिकडेच अकोट वन्यजीव विभागामार्फत मांडूळ सापाची तस्करी करून खरेदी विक्री करणारे दोन आरोपी दि. 17.11.2019 रोजी पकड्यात आले असून त्यांच्यावर कडक कार्यवाही करून जेरबंद करण्यात आले आहे.

त्यामध्ये एक आरोपी सर्पमित्र सुध्दा आढळून आला आहे!

आज रोजी प्रत्येक गली बोळीत सर्पमित्र दिसून येतो व त्याच्या नावाखाली सापांना त्रास देणे, त्यांचे विष काढून विकणे, त्याच्या सोबत सेल्फी काढून सोशल मिडीयावर टाकणे, असे अनेक प्रकारचे वन अपराध करीत असतात. यामध्ये काही जन दगावले सुध्दा आहेत. तरी सुध्दा असे कृत्य करण्यास त्यांना काहीही वाटत नाही.

त्यामुळे आपल्या प्रत्येक वन विभागाअंतर्गत येणाऱ्या परिसरातील प्रत्येक सर्पमित्रांची शहानिशा करून त्यांचे नाव रजिटर्ड करून घेणे. आवश्यक आहे. त्यांनीच संकटात सापडलेल्या सापांना पकडण्याची वेळ तसेच नजीकच्या वनक्षेत्रात सोडण्याच्या वेळाचे जीओटॅग फोटो मागवावे. त्याची रजिस्टर मेंटन करावे. त्यामुळे बरेच अनैतिक वन अपराधांवर नियंत्रण होवू शकते.

तसेच न्युज चॅनल मिडीया वाल्यांना सुध्दा विनंती आहे की, जर मांडूळ सापाची तस्करी पकडण्यात आली तर त्याची किंमत जसे 20 ते 30 लाख असे दाखवू नये. त्यामुळे सामान्य बेरोजगार व्यक्ती सुध्दा सदर गोष्टीवर विश्वास ठेवून अशा प्रकारे तस्करी करून मालामाल होण्यासाठी इतर लोकांना सुध्दा सांगून गंभीर स्वरूपाचा वन अपराध करण्यास प्रवृत्त होतो. त्यामुळे हे टाळाच असे वाटते. जेणे करून याला आळा घालण्यास सहकार्य होईल.


दैनिक आनंद नगरी
Thursday 2020/02/20
बाप रे बाप स्थानिक गुन्हा शाखेने पकडले तीन मांडूळ साप;आता नवीन अध्याय झाला सुरु

वनविभागामार्फत सदर मांडूळ सापाला त्याच्या अधिवासातून पकडणे, त्याला त्रास देणे किंवा त्यांची तस्करी करणे, भा.व.अ. 1972 चे कलम 9.2 (5), 16(बी), (सी), (17) (36), 37, 39, 44, 48, (ए), 49, (ए), 50, 51 तसेच 6 महिने ते 3 वर्षापर्यंत कारावास किंवा 10 ते 25 हजार रू. पर्यंत दंड अशी शिक्षेची तरतुद आहे. करीता मांडुळ साप आपल्या मेळघाटातील जैवविविधता मधील व अन्नसाखळी मधील एक अत्यंत महत्वाचा स्त्रोत आहे. त्या विषयी लोकांमध्ये पसरलेला गैरसमज दुर करणे काळाची नितांत गरज आहे.



मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील
सुरवळीहेंडा वनसंरक्षण कुटी

प्रफुल्ल सावरकर
(उपजीविका तज्ञ)
मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.
✆: 8928929920

# मेळघाटातील वन सैनिक

संध्या संपूर्ण जग lockdown आहे, सर्व सामान्य-असामान्य लोक आपल्या-आपल्या घरामध्ये कुटुंबासमवेत सुरक्षित आहे व कुटुंबाला वेळ देत आहे आणि T.V., सोशल मिडिया च्या माध्यमातून जगाशी घरीबासून connect आहे, नव नवीन खाण्याचे बेत आखले जात असतील, बाप मुला-मुली सोबत घरगुती खेळ खेळत असेल, त्यातून धमाल करत असेल, आणि घरची स्त्री म्हणत असेल बर झाल बापा हा कोरोना आला आणि यांना घरी राहयला वेळ मिळाला पण असे ही अनेक कुटुंब आहे, असे अनेक लेकर आहे ज्यांचे बाप-माय घराबाहेर आहे आणि महिनो गिनती ते घरी नाही येऊ शकणार आहे त्यातील एक म्हणजे वनसैनिक.

अनेकदा दौरावर गेलो कि मी वनसैनिका सोबत असतो आणि ते म्हणतात इतरांच बर आहे आम्हाला तर या वनाचे रक्षण करण्यासाठी इथे राहणे गरजेचे आहे, कोरोना असो व इतर काही आमच्या आयुष्यात बदल होत नाही, आता तर आम्हाला डोळ्यात तेल घालूनच राहावे लागणार, प्रचंड तापणारी उन आणि विविध मार्गे लागणारे वनवे आणि हे वनवे वेळ पाहून लागत नसतात रात्री- बेरात्री तर कधी भर उन्हात जीवाची लाहीलाही होते हे वनवे विजवतांना,अनेकदा कशाला नेहमीच एक वनवा विजवून होत नाही तर दुसरीकडून वायरलेस येतो इकडे वनवा लागला आहे, बऱ्याचदा उपाशी-तापाशी, नदी नाल्यातील पाणी पियुन हे वनवे विजवावे लागतात आणि ते अत्यंत गरजेचे असते नाहीतर भीषण परिस्थिती उदभवते आणि हे सर्व करायला आम्हाला कर्तव्यावर हजर व्हावेच लागते तरी आमचे महत्व सामान्य माणसापर्यंत पोहचत नाही. अशी व्यथा वनसैनिकाशी केलेल्या चर्चेतून मला कळाली.

आम्हा सर्वांची सर्वात महत्वाची गरज काय असेल तर पाणी आणि शुद्ध हवा आणि त्या शुद्ध हवा व पाण्याच्या संरक्षणाची जवाबदारी या वन सैनिकाकडे असते तरी तो उपेक्षित असतो, या वणव्यामध्ये त्यांना चटके बसतात अनेक जन भाजतात, जखमा होतात, कधी कधी मृत्यू डोळ्यासमोर असतो तरी तरी त्यांचे महत्व कुणला कळत नाही.कारण जगाशी फारसा connect राहत नाही त्यांची दुनिया म्हणजे जंगल आणि जंगल आणि तिथेल वन्यप्राणी. त्याचे संवर्धन व संरक्षण करणे हे त्याचे ध्येय आणि तेच त्यांचे दैवत.

त्या पलीकडे गावामध्ये विविध योजना राबवा त्या पूर्ण करा, गॅस वाटपाच्या उपक्रमापासून तर युवकांना रोजगार प्रशिक्षणाला पाठवा, महिलासाठी विविध रोजगार संदर्भात उपक्रम राबवा, नियमित मिटिंग घ्या, सर्वेक्षण करा,शिकारीची माहिती ठेवा, स्थानिक गावकरी जंगलात लाकडे आणायला गेली असेल तर त्यांना दाटून समज द्या, कधी आदेश आले तर कारवाही करा किवा त्यांची गुरे अतिसंरक्षित वनामध्ये गेली कि कायद्याने त्यांना पकडा कारवाही करा,अतिक्रमण केले तर ते काढा त्यांचा रोषाला समोर जा आणि त्याच गावकऱ्यांसोबत परत गुण्या-गोविदांने रहा आणि तेही त्याचाचं गावात रहा. शिकारीचे तर वेगळे प्रश्न. अशा विविध multipurpose भूमिकेमध्ये या वन सैनिकांना राहावे लागते आणि ते ही जंगलात. कुणाला नुकतेच झालेले बाळ असेल तर कुणाची आई-वडील आजारी असेल तर कुणाच्या घरचे लग्न असले तरी त्यांना ONDUTY २४ तास असावे लागते . यामध्ये केवळ पुरुषचं नाही तर महिला सुद्धा असतात, दुध पिणारी बाळ घरी ठेवून खाकी घालून कर्तव्य बजवाव लागत. किती ताण पडत असेल मनावर व शरीरावर, अनेकाचे बोलण्याचे घाव असेल, कधी वरिष्ठाकडून तर कधी घरच्याकडून. तरी तो आपले कर्तव्य पार पडतोय एका वेळेस अनेक भूमिका बजावतोय रंगभूमीवरील नटासारखा पण हा नट खोटा नसतो तो प्रत्यक्ष उन पाऊस, थंडी या सर्व रंगमचावर उभा असतो ताठ मानाने खाकी घालून, कधी काठी घेऊन तर कधी विविध योजनांचा डोंगर घेऊन आणि मनावर ताण असला तरी ही दाखवता येत नाही चेहऱ्यावर हसू व ओठावर गोड शब्द ठेवूनच उभ राहव लागत. डोंगर,नदी, कपारी,खोऱ्यातून गस्ती करावी लागते कधी प्रत्यक्ष जंगली श्वापदांसोबत नजरानजर होते तर कधी हल्ले सुद्धा तरी त्याला कर्तव्य पार पाडावे लागते.आपल्या उद्यासाठी त्यांना त्यांचा आज द्यावा लागतो.



सैनिक जसे सीमेवर परकीय शत्रू पासून आपले संरक्षण करते, पोलीस जसे आंतरिक सुरक्षा पाहते तसेच हे वन सैनिक आहे, त्यांचा ही आदर गौरव होणे गरजेचे आहे **आणि कधी तरी संध्याकाळी ५ वाजता या वन सैनिकाकरिता टाळ्या वाजवून हा आदर त्यांना देऊ या.**

**राम ध. उमेकर**
(सोशल वेलफेअर ऑफिसर)
मे.व्या.प्र., अम.
✆: 8208498824

# मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील आदिवासी महिला सशक्तीकरण

मानव व वन्यजीव संघर्ष कमी करण्याकरिता मेळघाट व्याघ्र प्रकल्पामार्फत रोजगार निर्मिती व महिला सशक्तीकरण करण्या करीता मा. रेडडी सर (अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक मेळघाट व्याघ्र प्रकल्प) यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांसाठी स्वंयमरोजगार उपलब्ध करण्यात यावे जेणे करुन स्थानिक आदिवासी महिलांना रोजगाराचे नवी साधन उपलब्ध होईल व त्यामुळे ते वनसंवर्धनासाठी जागरुकता निर्माण करतील असे मिटिंग दरम्यान चर्चा करतांनी मा. APCCF सरांनी सुचवले. त्याअनुषगाने प्रथम हरिसाल व सेमाडोह येथील महिलांच्या सभा घेण्यात आल्यात त्यामध्ये महिलांच्या जास्तीत जास्त शिलाई मशिन देण्यात यावी व आम्ही महिला घरी काम करु अशा प्रकारची त्यांच्या मार्फत विनंती करण्यात आली त्यावर मेळघाट टिमने प्रथम आपसात चर्चा करुन शिलाई मशिन प्रशिक्षण केंद्र उभारणी सुरु करण्यात आली. त्यातुन महिलांना वेगवेगळे प्रशिक्षण देता येईल व प्लाटिक बंदी असल्यामुळे पिशवी शिवुन रोजगार सुध्दा मिळविता येतील या संदर्भात महिलांशी चर्चा केली असता त्यांचा सहभाग असल्याचे आढळुन येत होता.

हालचालीना वेग आला प्रथम शिलाई मशिन प्रशिक्षण केंद्र उभारणी करणे म्हणजे त्या गावात जागा असणे व तसेच हॉल किंवा इमारत असणे महत्वाचे असणे गरजेचे आहे. त्या करिता हरिसाल येथील संकुल मध्ये एक हॉल वनविभागाचा आहे. असे कळल्यानंतर त्या हॉलची मेळघाट टिमनी शाहानिशा केली. महिलांची त्या ठिकाणी सभा घेण्यात आली व त्यावर महिलांचे काय म्हणणे आहे हे आम्ही ऐकुन घेउन कामाला लागलो अशाप्रकाचे सेमाडोह येथील वनविभागाची इमारत असलेले पण निकस्त झालेली इमारत APCCF सरांच्या आदेशानुसार दुरुस्ती करण्यात आली व अश्या प्रकारे शिलाई मशिन केद्राचा श्री गणेशा झाला.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील प्रत्येक केंद्रावर 10 मशिन दयायचे ठरले त्याप्रमाणे हरिसाल करिता व सेमाडोह करिता प्रत्येकी 10 मशिन केद्रावर व्यवस्थित पणे लावण्यात आल्या व याकरिता लागणारा कापड व प्रशिक्षक यांची आवश्यकता असल्यामुळे नागपूर येथील प्रशिक्षक बोलाविण्यात आले व प्रत्येक केंद्रावर 500 मीटर कापड व दोन ट्रेनर देण्यात आले. त्यांनी महिलांना पाच दिवसाचे पिशवी शिवण्याचे उत्तम प्रशिक्षण दिले. यामध्ये प्रत्येक केद्रावर 20 ते 25 महिलांना मशिन चालविण्याचे, कापड कापण्याचे, तसेच व्यक्तीमहत्व विकास व वनाविषय जिव्हाळा निर्माण होईल असे प्रशिक्षण देण्यात आले.प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर व त्यांना सांगण्यात आले की, हा घरगुती लघु उघोग म्हणुन तुम्हाला सुरुवात करायची आहे. यामध्ये दिलेल्या कपडयाची पिशवी शिवुन ती विकणे सुध्दा आहे म्हणजे मार्केटिंग करणे आहे. वितरित झालेल्या पिशवी जे काही रक्कम तुम्हाला मिळेल, त्या पैसाचे तुम्हाला नियोजन करायचे आहे. त्यामध्ये कोणत्या महिलेनी किती पिशव्या शिवल्या त्याप्रमाणे त्यांना मजुरी देणे व कापडया करीता लागणारा पैसे पण तुम्हाला त्यातुन काढायचा आहे. हे सर्व त्यांना प्रशिक्षण दरम्यान सांगण्यात आले. या प्रशिक्षण मध्ये त्यांना स्किन प्रिटिंग चे सुध्दा प्रशिक्षण सुध्दा देण्यात आले. हरिसाल, सेमाडोह, इतर ठिकाणी प्रशिक्षण केंद्राची उभारणी करण्यास सुरुवात झाली. त्यामध्ये शाहापुर (चिखलदरा) शाहानुर, दहिखेड फुटकर, वसाली, बोथा, कासमार (वाघा), कोईलारी, आमझरी अश्याप्रकारे 10 ठिकाणी शिलाई मशिन प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आले. या मध्ये काम करीत असतांना आम्हाला महिलांमध्ये सहानुभुतीची भावना निर्माण झाल्याचे दिसत होते. आम्ही त्यांची सभा घेत असतात. स्थानिक त्यामध्ये महिला सभेकरिता उत्साहाने उपस्थीत राहत असत. अश्याप्रकारे महिलां गटांना दिलेल्या 500 मिटर कापडयाचे प्रशिक्षण दरम्यांन 1500 पिशव्या तयार करण्यात आल्या होती.

आता खरा प्रश्न होता तो मार्केटिंग करणे, पण या महिला आदिवासी त्यांचा बाहेरील सबंध कमी होता. म्हणुन महिलांना पिशवी मार्केटिंग करण्याकरिता अडचण निर्माण होत असल्याचे पाहुन आम्ही महिला गटातील एक महिलेची व्यक्तीची निवड केली कि, ती आम्हाला सेंटर संदर्भातील माहिती देऊ शकेल व महिलांचा समुह चालवु शकेल जिला समन्वय साधने तिला जमेल अशा व्यक्तीची निवड करण्यात आली. तसेच अमरावती शहरामध्ये असणारे D-Mart, किराणा स्टोअर, कपडा मार्केट काही हॉटेलच व शॉपी अशा ठिकाणी मेळघाट टिम पिशवी मार्केटिग करीता फिरत होती काही मॉल कडुन ऑर्डर मिळत असत व आम्ही पिशवी साईज घेवुन महिलांना पिशवी ऑर्डर देत असो अशा प्रकारे पिशवी ऑर्डर मिळण्याकरिता अ.प्र.मु.सं. कार्यालय अमरावती येथे पॉपलेट तसेच माहिती पुस्तीका तयार करण्यात आली व त्यांची जाहिरात मोठया प्रमाणात करण्यात आली. त्या जाहिरातीचा असा फायदा झाला कि, मुंबई, पुणे, नागपुर, दिल्ली, बंगलोर, जयपुर अशा मोठया-मोठया शहरातुन पिशवीचे ऑर्डर मिळु लागलीत पिशवीची मागणी

देशातुनच नव्हे तर विदेशातुन सुध्दा यायला लागल्या व या मागणीला ला पुर्ण कसे करावे या करीता हरिसाल केंद्र वरील महिलांना सागण्यात आले कि, सकाळी येणा-या बस मध्ये पिशव्या अमरावतीला पाठविणे व त्या पिशवी मेळघाट टिम तर्फे गोळा करुन त्यावर मागणी प्रमाणे स्किन प्रिंटिग करणे व ती ऑर्डर मेळघाट टिम मार्फत पुर्ण करण्यात येत होती. तसेच काही वन्यजीव संवर्धनमध्ये कार्य करणा-या संस्था मार्केटिग करण्या मदत करत होत्या व यावर मा. रेडडी सरांनी (अ.प.मु.व.सं.तथा.क्षे.सं.मे.) एक आदेश काढले. त्यामध्ये मेळघाटातील नाक्या वर पिशव्या ठेवण्यात यावे व येणारे पर्यटक व जंगल सफारी जिप्सीमध्ये जाणा-या पर्यटकांना रुपये 15 प्रमाणे पर्यटकांना अनिवार्य करण्यात आले. पिशवी विकुन देण्याकरिता टिम प्रयत्न करीत आहे. मेळघाट जेणे करुन स्थानिक महिलांना रोजगार उत्तम मिळेल. अशा प्रकारे पुढील तक्ताप्रमाणे महिला गटाने आपल्या पिशव्या मार्केटिग केल्या आहेत.

| अ.क्र. | केंद्राचे नाव | मशिन संख्या | कपडा (मिटर) | विकलेल्या पिशव्या | उत्पन्न/रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सेमाडोह | 10 | 500 | 7444 | 58,346/- |
| 2 | हरिसाल | 10 | 500 | 18940 | 2,17,919/- |
| 3 | चिखलदरा | 20 | 500 | 1878 | 11,832/- |
| 4 | कोईलारी | 15 | 500 | 3000 | 20,000/- |
| 5 | शाहानुर | 15 | 500 | 500 | 5,000/- |
| 6 | दहिखेड फुटकर | 15 | 500 | 500 | 5,000/- |
| 7 | वसाली | 15 | 500 | 500 | 5,000/- |
| 8 | बोथा | 20 | 100 | 120 | 1,200/- |
| 9 | कासमार (बोथा) | 10 | 100 | 100 | 1,000/- |
| 10 | आमझरी | 10 | 500 | 500 | 5,000/- |

अशा प्रकारे वरील तक्तावरुन असे दिसुन येते कि, हरिसाल येथील महिलांनी सर्वांत जास्त पिशवीचे मार्केटिग केली. त्यांना लागणारे कापड करिता ब-हाणपुर (मध्यप्रदेश) मधील कापड मिल / फॅक्टी यांच्याशी चर्चा करुन कापड लागल्यास तुम्ही बसवर पाठविणे चा करार महिला गटाने मिल मालकाशी केला आहे. अशाप्रकारे महिला गटांना लागणारा कापड नियमित हरिसाल महिला गटाला मिळतो व अमरावती वरुन पिशवी ऑर्डर त्यांना मिळाल्यास पिशव्या त्या पॅक करुन बसवर अमरावतीसाठी पाठविण्यात येते व मेळघाट टिम पिशव्या गोळा करुन ऑर्डर पुर्ण करीत असते. अशा प्रकारे महिला गट पिशवी मधुन रोजगार मिळवित आहे.

महिला गटांना मेळघाट व्याघ्र प्रकल्प तर्फे ड्रेसकोट, जॅकेट, पंजाबी ड्रेस, सलवार सुट, पेटीकोट, ब्लाउज इत्यादी या सारखे अनेक प्रशिक्षण महिला गटाना देण्यात येते.

संध्या चालु असलेल्या कोविड-19 या विषाणुमुळे सेंटरवर पिशवी शिवणे जरी बंद असले तरी महिला गटांनी मास्क शिवुन धारणी येथील आदिवासी प्रकल्प अधिकारी कार्यालयास पुरवठा केला आहे तसेच वनकर्मचारी यांनी सुध्दा महिलांना कडुन शिवलेले मास्क विकत घेऊन आपल्या कर्मचारांना दिले आहे.

यावरुन असे दिसुन येत आहे कि, सदर कृतीशिल उपक्रमामुळे मानव व वन्यजीव संघर्ष कमी होण्यास मदत होत आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील गावामध्ये सहकार्यांची भावना निर्माण होऊन वनाविषयी सहानुभुती निर्माण झाल्याचे चित्र दिसुन येत आहे.



**प्रफुल्ल सावरकर**
(उपजीविका तज्ञ)
मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.
✆: 8928929920

# उन्नतीसाठी उपजीविका

मेळघाट व्याघ्र प्रकल्प ज्या प्रमाणे वने वा वन्यजीव संवर्धन व संरक्षणाकरिता तत्पर आहे तसेच मेळघाट व्याघ्र प्रकल्पा क्षेत्रा अंतर्गत येत असलेल्या गावातील युवक, युवती, शालेय विद्यार्थी, महाविद्यालियन विद्यार्थी यांच्या ही उज्वल भविष्यात साठी जागरूक असून स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा व ते स्वतः च्या पायावर ठाम पणे उभे राहून समाजात प्रतिष्ठाने जगावे व वनावरील त्यांच्या वाढता भार कमी व्हावा या तसेच स्थानिकांचे वन व वन्यजीव संवर्धनामध्ये सहभाग असावा अशा हेतूने बेरोजगार युवकांना विविध उत्तम रोजगार देऊ शकणाऱ्या प्रशिक्षणासाठी सहभागी होण्यासाठी पाठविण्यात येते, युवक त्यांना आवडले अशे प्रशिक्षण घेतात व त्यातून त्याना नोकरी पण लावून दिल्या जाते, या विविध प्रशिक्षणाचा सर्व खर्च मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान मार्फत केला जातो.


मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने राष्ट्रीय कृत व केंद्र सरकार मान्य अशा सीआईआई कोशल्य प्रशिक्षण केंद्र, छिंदवाडा, अशोका वाहन चालक प्रशिक्षण केंद्र, छिंदवाडा, प्रथम शैक्षणीक संस्था मार्फत राबवत असलेल्या प्रथम आदरतिथ्य केंद्र, सिल्लारी, मोंटफोर्ट शैक्षणीक संस्था या नामवंत संस्थाशी करार केला आहे. येथून युवकांनी प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना प्रमाणपत्र दिल्या जाते व प्लेसमेंट सुद्धा.

| अ.क्र. | प्रशिक्षण संस्था | अभ्यासक्रम | युवक संख्या |
|---|---|---|---|
| १ | सीआईआई कोशल्य प्रशिक्षण संस्था | जेसीबी | ७० |
| | | हिरो two व्हीलर रिपेरिंग व मेंटेनन्स | २० |
| | | L&T बार बेंडिंग | ०१ |
| २ | अशोका वाहन चालक प्रशिक्षण केंद्र | वाहन चालक प्रशिक्षण | ७० |
| ३ | प्रथम आदरतिथ्य प्रशिक्षण संस्था | फूड बेवरेज & हाउस कीपिंग | ५० |
| ४ | मोंटफोर्ट शेक्षणिक संस्था | हॉटेल व्यस्थापन | ०७ |
| | | शिलाई मशीन प्रशिक्षण | ०९ |
| | | मोटार मेकानिक | ०४ |
| | | वेल्डिंग प्राशिक्षण | ०७ |
| | | इलेक्ट्रॉनिकल फिटिंग प्रशिक्षण | ०१ |
| ५ | सातपुडा फौंडेशन | वाहन चालक प्रशिक्षण | १२३ |
| | **एकूण संख्या** | | **३६२** |



## CII Skill Training Center Chindwada



JCB CERTIFICATE OF TRAINING

S.No.: 1871/CHHINDWARA/19

Name : Arvind Gangaram Jamunkar

Father's Name : Sh. Gangaram Kalu Jamunkar

Date of Birth : 01.01.1997

Address : At - Ghana, Post - Mehariam, Chikhaldara, Amravati (MH.) Mob. No. 9423973519

Batch 09/2019

M/c. 3DX-BHL

Auth. Signatory

has been trained to operate the machine as specified.

JCB OPERATOR TRAINING CENTRE
CII Skills Training Centre
Imlikhera, Chhindwara, M.P.

Note : This certificate of training should not be considered/deemed to be a license under the Motor Vehicle Act, 1988 and the rules made thereunder.






## Ashoka Driving Institute Chindwada





## Computer Training Center Melghat






## Driving License Course






# रोजगाराची नवी दिशा

मेळघाट हे पूर्वीपासून वाघाची हक्काचे निवासस्थान म्हणून नावारूपाला आलेले आहे. मेळघाटच्या वनाची जैवविविधता अतिशय संपन्न असून संकटग्रस्त असलेल्या वाघाचे अस्तित्व या वनामध्ये पदोपदी जाणवते. २०१८ च्या व्याघ्र गणनेनुसार मेळघाट मध्ये ५० च्या जवळ वाघाची संख्या आहे व ही भविष्यात आणखी वाढण्याची क्षमता या जादुई मेळघाटमध्ये आहे. यासाठी तृणभक्षी प्राण्यांची संख्यामध्ये वाढ होणे गरजेचे आहे. वाघ व वनाचे अस्तित्व टिकून राहण्यासाठी मेळघाटातील अतिसंरक्षीत क्षेत्रामध्ये असलेली गावे यांचे तेथील स्थानिकांच्या स्वयंम इच्छेनुसार यशस्वी व शाश्वत पुनर्वसनकरून त्यांच्या जागेवर वन्यजीवन फुलवू शकते व वाघांची संख्या ही वाढू शकते. संध्या मेळघाटमध्ये वाढलेली वाघाची संख्य हे एकाप्रकारे पूर्वी झालेल्या पुनर्वसनाची देणगी आहे.

वने, वाघ व स्थानिक लोक यांचे भविष्य उत्तम व्हावे व त्यांच्या येणाऱ्या पिढ्या गुण्यागोविदांने नांदावे. ज्यातून देशाच्या उन्नतीसाठी हातभार लागेल या उद्देशाने सन २०११-१२ ते सन २०१८-१९ या कालावधीत आकोट वन्यजीव विभागातील एकूण १२ गावांचे तसेच गुगामल वन्यजीव विभागातील २०१८-१९ मध्ये पस्तलई व मेमना या गावातील लोकांचे उत्तम असे यशस्वी पुनर्वसन करण्यात आले. सदर सर्व पुनर्वसन या स्थानिक लोकांचा मागणीनुसारच करण्यात आले.

सदर गावातील युवकांना रोजगाराची नवीन साधने उपलब्ध व्हावी व त्यांच्या विकास व्हावा तसेच समाधान व प्रतिष्ठा मिळावी यासाठी **मेळघाट व्याघ्र प्रकल्प व आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे** यांच्या माध्यमातून पुनर्वसित झालेल्या गावातील आदिवासी युवकांना मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रकल्प या योजनेतून स्वयंम रोजगारासाठी चारचाकी वाहनासाठी ८० टक्के अनुदान किवा जास्तीत जास्त ५ लाख रुपये देऊन स्वयं व्यवसायासाठी दिले गेले आहेत. अकोट वन्यजीव विभागातील गुल्लरघाट, बारुखेडा, धारगड, तलई रेल्वे, सोमठाणा (बु) येथील एकूण ३५ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ आतापर्यंत घेतला आहे तर खूप लोकांचे प्रस्ताव आकोट वन्यजीव विभागाकडे प्रस्तवित आहे. गुगामाल वन्यजीव विभागातील पस्तलई गावातील १४ आदिवासी लोकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे आणि आणखी काही प्रस्ताव गुगामल वन्यजीव विभागाकडे आले आहेत.

या योजनेमुळे स्थानिकांना रोजगार मिळाला व ते स्वत: मालक झाले आहे. त्यांच्या माहितीनुसार महिन्याला बहुतांश लोक गाडी व ट्रक्टरच्या माध्यामातून किमान १५ ते जास्तीत जास्त ५० हजार रुपये उत्पन्न मिळवतात. यातून त्यांच्या घरची व गावाची परिस्थितीत सुधारणा झाली आणि वाघ व वनाविषयी आदर निर्माण झाला.



# मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पुनर्वसन एक नवसंजीवनी

**अतुल दि. तिखे**
सामाजिक समन्वयक (पुनर्वसन)
मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती
✆: 9420187357

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे नाव डोळ्यासमोर आले कि आठवते तेथील अतिदुर्गम भाग, डोंगरदऱ्या, हिरवळ, वन्यप्राणी, तेथील जैवविविधता व सातपुड्याच्या अतिदुर्गम डोंगराळ भागात पिढ्यानपिढ्या वास्तव्य करून असलेली कोरकू आदिवासी जमात व इतरही आदिवासी जमातीचे हक्काचे घर, त्यांची जीवनशैली.

अतिशय दुर्गम भागात राहत असल्यामुळे ते आजही विकासापासून कोसो दूर आहेत व दैनंदिन जीवन जगतांना त्यांना आजही खूप अडचणींचा सामना करावा लागतो आहे. यामध्ये प्रामुख्याने रोजगाराची उपलब्धता , शैक्षणिक सुविधांचा अभाव, आरोग्य सेवांचा अभाव, मागासलेले सामाजिक व आर्थिक जीवन अशा अनेक बाबीचा समावेश होतो. त्यामुळे त्यांचे सामाजिक व आर्थिक जीवन हे अंधकारमय होत आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील गाभा क्षेत्रातील होत असलेल्या पूनर्वसनामुळे त्यांच्या जीवनात एक नवीन उमेद येत आहे त्यामुळे व्याघ्र प्रकल्पात राहणारे नागरिक स्वेच्छेने पुनर्वसनाचा पर्याय निवडून आपले जीवनमान उंचावत आहेत.

केंद्र शासन व राज्यशासन यांचा निर्देशानुसार पुनर्वसनाचे दोन पर्याय नमूद केलेले आहेत. पर्याय क्रं १ मध्ये लाभार्थ्यांच्या पुनर्वसनाची कोणतीच जवाबदारी ही शासनावर अवलंबून नसते तर पर्याय क्रं २ मध्ये लाभार्थ्यांच्या पुनर्वसनाची संपूर्ण जवाबदारी ही राज्यशासनावर असते व त्यांना मूलभूत सोयी सुविधा पुरवायच्या असतात. ग्रामसभेचा पुनर्वसनासाठी ठराव प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या पुनर्वसनाची प्रकिया सुरु केली जाते.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातून पुनर्वसित होणारी गावे ही स्वेच्छेने पर्याय क्रं १ निवडत आहे , त्यांचे पुनर्वसन करून देण्याची कोणतीच जवाबदारी ही शासनावर नाही तरीही मेळघाट व्याघ्र प्रकल्पातर्फे त्यांना विविध सोइ व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात व त्यांचा पुनर्वसनासाठी तत्परतेने कर्तव्य बजावत आहे. यामध्ये प्रामुख्याने पुनर्वसित ठिकाणी शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय, अंतर्गत रस्ते, सोलर स्ट्रीट लाईट, विद्युत जोडणी, अंगणवाडी स्तानांतरण, पुनर्वसित ठिकाणी शासकीय रेशनची जोडणी, नमुना ८ मिळवून देणे, जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्र व मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचा आरोग्य चमू तर्फे आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करणे, आशा आरोग्य सेविकेची जोडणी करून देणे, आदिवासी विकास विभागाची असलेल्या शबरी घरकुल योजनेचा लाभ मिळवून देणे , गावातील नागरिकांच्या मागणीनुसार जात प्रमाणपत्र व इतर शिबिरांचे आयोजन करून घेणे तसेच पुनर्वसित गावातील युवकांच्या रोजगारासाठी वाहन वाटप, वाहन परवाना प्रशिक्षण उपक्रम युवकांसाठी रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम व गावातील



महिलांच्या रोजगारासाठी शिलाई प्रशिक्षण केंद्र अश्या विविध प्रकारची कामे ही मेळघाट व्याघ्र प्रकल्पातर्फे केली जातात. तसेच विविध शासकीय योजनांची माहिती व त्याचा लाभ पुनर्वसित नागरिकांना मिळवून देण्यासाठी मेळघाट व्याघ्र प्रकल्पातर्फे प्रयन्त केल्या जात आहे, तसेच मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे वन अधिकारी हे नियमित पुनर्वसित गावांना भेटी देत असतात व त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी नेहमी प्रयन्तशील असतात हे विशेष.

पुनर्वसन झाल्यामुळे पुनर्वसित नागरिकांच्या जीवनात एक नवीन आशेची किरण निर्माण झाली आहे, अतिदुर्गम भागात राहत असल्यामुळे त्यांच्या रखडलेला विकासाला चालना मिळाली आहे. अतिदुर्गम भागातील गावे ही शहराजवळ वास्तवास आल्यामुळे त्यांना रोजगाराच्या नवीन व नियमित संधी उपलब्ध होत आहेत ज्यामुळे त्यांच्या जीवनात आर्थिक सुबत्ता येऊन त्यांच्या जीवनमानाचा निर्देशांक उंचावत आहेत. चांगल्या शैक्षणिक सुविधा हाकेच्या अंतरावर उपलब्ध झाल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढत आहे ज्यामुळे त्यांच्या भविष्याला उत्तम चालना मिळेल यात नक्कीच शंका नसेल. परिसरामध्ये उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध झाल्यामुळे बालमृत्यू, मातामृत्यू, कुपोषण यातून त्यांची सुटका होत आहे व त्यांना शारीरिक व मानसिक स्वास्थ लाभत आहे. चांगल्या दळणवळणाच्या सोयी, माहिती संसाधनाची उपलब्धता यामुळे त्यांची सामाजिक, आर्थिक सांस्कृतिक व शैक्षणिक विकास होत आहे.

पुनर्वसनामुळे अतिदुर्गम भागात राहणारे नागरिक व मोकळ्या झालेल्या पुनर्वसित जागेवर वन्यजीवन वाढले असून यामुळे दोघांचाही फायदा होत आहे. तेथील आदिवासी नागरिक हे विकासाच्या मुख्य प्रवाहात येत आहे त्यामुळे त्यांची जीवनशैली उंचावत आहे तर दुसरीकडे तेथील उपलब्ध झालेली जागा ही तेथील वन्यजीवांना नवीन आश्रयाय स्थाने म्हणून उपलब्ध होत आहे, पुनर्वसनमुळे मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये नवीन गवती कुरण निर्माण होत असून त्यामुळे चितळ, सांबर, गवे व अन्य तृणभक्षी प्राण्याची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ज्याचा परिणाम स्वरूप मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये वाघांनाही नवीन आश्रयायस्थाने उपलब्ध होत आहेत व त्यांची संख्या वाढत आहे हे विशेष. वाढलेल्या वन्यजीवांच्या दर्शनामुळे निसर्ग पर्यटनाला चालना मिळत आहे. त्यामुळे रोजगाराच्या संधीत पण वाढ होत आहे.

पुनर्वसनाचा आदिवासी लोकांना व वन्यप्राण्यांना समप्रमाणात लाभ होत आहे. तसेच पुनर्वसित झालेल्या नागरिकांचे उंचावलेले जीवनमान बघून मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रात शिल्लक असलेली गावे त्यांच्या पुनर्वसनाची मागणी मेळघाट व्याघ्र प्रकल्पाकडे करत आहेत. २०१८ ते २०२० या काळात मेळघाट व्याघ्र प्रकल्पातून मांगिया, रोरा, पस्तलाई, डोलार व मेमना ही गावे पुनर्वसित झाली असून पिली व मालूर या गावांच्या पुनर्वसनाची प्रकिया सुरु आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील सर्व अधिकारी व कर्मचारी हे पुनर्वसित गावातील नागरिकांच्या उज्वल भविष्यासाठी व त्यांचे जीवनमान वाढविण्यासाठी सदैव तत्पर आहेत.





**धनंजय सायरे**
पानी फौंडेशन
समन्वयक-धारणी मेळघाट
✆: 9075716392

# अंगारमुक्त वनांचा मार्ग, लोक सहभागातून जातोय का?

मागील वर्षी अमेझॉन, ऑस्ट्रेलिया या देशातील आगीच्या घटनांनी सारे जग हादरले. हजारो वन्यजीवांना प्राण गमवावे लागले. चीन सारख्या देशात वन्य प्राण्यांना मारून खाण्याने कोरोना सारखे विषाणू आज जगभरात पसरत आहेत. त्यामुळे वन्यप्राण्यांना मारून खाण्यावर आज चीन देशात बंदी घातली आहे. या घटनांचे पडसाद जगभर उमटत आहेत. वने, वन्यजीव संर्वधना ला आज अनन्यसाधारण महत्व आहे. युनायटेड नेशन ने या वर्षी जागतिक वन्यजीव दिवसा निमित्य **"पृथ्वी वरील सर्व जीव टिकवणे"** अशी संकल्पना जाहीर केली. आज निसर्गा चा समतोल बिघडून त्याची फळे आज मानव भोगत आहे..वनांचे क्षेत्र कमी होत आहे. जैवविविधते चा ऱ्हास होत आहे. भारतीय वन सर्वेक्षण नुसार 21.67% क्षेत्र एकूण देशाच्या भौगोलिक क्षेत्राच्या शिल्लक आहे. हे क्षेत्र वाढवण्यासाठी आणि वाचवण्यासाठी विविध संकल्पना, उपक्रम जनजागृती करण्यात येत आहे.

**संशोधनाचे निष्कर्ष व पाणी फौंडेशन च्या संकल्पने चे फलित...**

महाराष्ट्र जैवविविधता बोर्ड चे सदस्य डॉ जयंत वडतकर व अलाहाबाद ऍग्रीकल्चर इन्स्टिट्यूट स्वायत्त विद्यापीठाचे विद्यार्थी श्री शिशिर कुलकर्णी 'स्टडी ऑफ फॉरेस्ट फायर इन मेळघाट' या मेळघाटा वरील शोध निंबधात लिहितात की, **"जंगलात वणवा लागण्याचे प्रमाण हे मानव निर्मित मोठ्या प्रमाणात आहे. जास्तीत जास्त आग ही गावा नजीक जंगलात, शेत शिवारात लागली असे दिसून आले आहे."** असे निष्कर्ष त्यांनी मांडले.

आणि मागील दोन वर्षांत अप्रत्यक्षपणे आग न लागण्यास, लोकसहभागाचा उपाय हा पानी फौंडेशन च्या आग पेटी मुक्त शिवार या संकल्पने तुन दिसून आला. आवागड, मेहरिअम, कुलंगणा, कोटमी, कण्हेरी, बोथरा, बामदेही या गावा नजीक च्या जंगलात आग लागण्याच्या घटना कमी झाल्या. गावातील शेतकऱ्यांनी शेतातील काडीकचरा, धुरे जाळणे थांबवले. मोहफुले वेचतांना झाडाखाली आग न लावणे. यातून अंगार मुक्त वनाची दिशा दिसली. या साठी लोकांच्या मानसिकते वर, जनजागृती वर भर ।देण्याचे गरजेचे आहे. लोकसहभाग वाढवणे हे महत्त्वाचे आहे.

**अंगार मुक्त जंगल स्पर्धा समजून घेतांना.**

**'लोकसहभाग वाढवून अंगार मुक्त जंगल करणे.'** हा उद्देश समोर ठेवून ३ मार्च रोजी जागतिक वन्यजीव दिवसाचे औचित्य साधत अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक मा. श्रीनिवासा रेड्डी यांचे हस्ते अंगार मुक्त स्पर्धे चे उदघाटन करण्यात आले. यावेळी निसर्गा फौंडेशन मेळघाट या संस्थे मार्फत माहिती व जनजागृती सहयोगी म्हणून तयार केलेली स्पर्धेची माहिती पत्रकांचे, फ्लेक्सचे विमोचन करण्यात आले.

या स्पर्धेत चिखलदरा धारणी तालुक्यातील १३३ गावे सहभागी करण्यात आले. मेळघाट मध्ये गावपातळी वर गावांची स्वतंत्र पारंपरिक निर्णय यंत्रणा आहे. तिला गाव पंचायत, गाव चावडी या नावाने ओळखले जाते. या स्पर्धेत अंगार मुक्त जंगलासाठी उत्तम करणाऱ्या गावांच्या गाव पंचायत ला सन्मानित करण्यात येणार आहे. आडा पटेल, गाव भूमका, गाव पड्याळ, गाव चौधरी हे पंचायत प्रमुख असतात. सर्वात मोठी वर्षातील गाव पंचायत ही होळी या सणाची असते. यामध्ये होणारे निर्णय हे वर्षभर पाळले जातात. हे लक्षात घेऊन गाव पंचायत च्या मार्गदर्शनात जंगलात शेती, वन शिवारात आग लागू नये या करिता गावातील सर्व लोकांची मीटिंग घेऊन आग नियंत्रणा साठी चर्चा करणे, नियम बनविणे. तसेच पंचायत समिती अंतर्गत सचिव, तलाठी,वनरक्षक,



पेसा मोबिलायझर, कृषिसेवक व गावकरी यांनी आग नियंत्रणाचे नियम करून ठराव पारित करणे. या मुद्यांचे आधारे गाव प्रशासन व शासकीय प्रशासन सर्व स्तरावर अंगार मुक्त जंगल विषयी चर्चा होणे अपेक्षित होते. कारण पर्यावरणाचे प्रश्न, समस्या ह्या सर्वांच्या आहेत. त्या कुणा एका विभागाच्या एका अधिकाऱ्यांच्या नाहीत. त्याचे परिणाम हे आपण सर्वाना भोगावे लागणार आहेत.

पर्यावरण संरक्षण कोणासाठी करायचे आहे? हे लक्षात घेऊन भावी पिढीचा सहभाग महत्वाचा आहे. म्हणून गाव पंचायत ने गावातील १०-15 युवकांची टीम बनविणे. गावा शेजारील जंगलात आग लागल्यास वनरक्षकांच्या मदतीला जाणे. आगीच्या घटनांवर लक्ष ठेवणे. गाव पंचायत ने बनविलेले नियमचावडी मुठवा बाबाया ठिकाणी लावणे. गावातील चौधरी याने नियमांची दवंडी गावात वेळोवेळी देणे. आग लागल्यास ती नियंत्रणात आणणे हे एकट्यादुकट्याचे काम नाही. बऱ्याचदा आग लागलेली दिसत असतांना गावकरी कधीच त्या आगी विझवण्यास मदत करत नाहीत. असे सर्रास दिसून आले आहे. अशा वेळी मदतीची गरज लागते. ज्या गावाजवळ आग लागली असेल तिथे गावकरी लोकांची जबाबदारी बनतेच तर हे लक्षात घेऊन गावाजवळ च्या जंगलात आग लागल्यास ती विझवण्याची जबाबदारी ही वन विभागाबरोबरच गावाचीही असेल.

वनरक्षकफायर ब्लोअर चालक यांना आग विझवण्यास मदत करणे. हे स्पर्धेतील लोकसहभागाचे गाव प्रशासनाचे काम म्हणून सर्वाधिक 50 गुण ठेवण्यात आले आहेत.

जंगलाला आग लागण्यास कारणीभूत **'वैयक्तिक लाभ'** हा मुद्दा लक्षात घेण्यात आला आहे. वनोपज, चारा यावर आधारित असलेले जीवन हे लक्षात घेतले गेले. तेंदूपत्ता संकलनासाठी आग लावू नये. मोहाची फुले वेचतांना मोहाच्या झाडाखाली आग लावू नये. मोहफुले जमा करण्यासाठी झाडाखाली पालापाचोळा झाडून, ताडपत्री, साडी याचा वापर करावा. प्रत्येक गावात पाळीव जनावरे लक्षात घेता गावातील जनावरांच्या चराई करिता चराई नियोजन क्षेत्र निश्चित करणे. खुली चराई बंदी, कुऱ्हाड बंदी या संबधी नियम करणे. कुकुरकोंडा, गाजर गवत अश्या अपचणीय गवताचे निर्मूलन हाती घेणे. वनशेती ही गावकऱ्यांचे लाकुडफाट्या करिता गरजेची आहे. वनावरील अवलंबित्व कमी करण्याचा महत्वचा उपाय आहे. त्या साठी गावातील खातेदारांनी वनशेती योजना, फळबाग लागवड योजना , बास लागवड योजना या करिता यादी वनरक्षक यांना द्यावी. मान्सून खरीप पिकाच्या तयारी करिता शेती साफ करण्याचे काम उन्हाळ्यात सुरू होते. एप्रिल मे महिन्यात ही कामे केली जातात. हे लक्षात घेऊन शेतातील काडीकचरा जमा करून न जळता धुऱ्या वर जमा करावा. प्रत्येक शेतकऱ्याने शेतात कंपोस्ट खड्डे करावे. धुरे जाळू नये. शहरातील जास्तीत जास्त रोजगार हा सेवा क्षेत्रातील झाला आहे. त्यामुळे शहरातील माणूस हानिसर्गा पासून दूर गेला आहे. निसर्ग आधारित सण परंपरा शहरातील माणसाने सोडल्या आहेत. परंतु आदिवासीनी अजूनही त्याचे निसर्ग केंद्रित समज टिकवून ठेवून आहे. त्यातील एक मेळघाटातील आदिवासी ची जंगलाची देवता काडीबुडी बाबाही आहे. गावातील भूमका हा त्याची पूजा करतो. प्रत्येक कुटुंबातून एक एक लाकुड गावा नजीकच्या जंगलात आणले जाते. त्याचा ढीगर चला जातो. भूमकाबाबा जंगलाच्या भल्यासाठी प्रार्थना करतो. झाड लावले जातात. पण बऱ्याच गावात आता ही पूजा केली जात नाही. हे लक्षात घेऊन आदिवासी समाजाची जंगलाची देवता काडीबुडी बाबा यांचे पूजेचे नियोजन करणे. या करिता गुण दिले आहेत. यातून ही मागे पडलेली पूजा पुनर्जीवित करून याला वन विभागाची जुलै महिन्यातील वृक्ष लागवडीची वन महोत्सव संकल्पना जोडून साजरा करता येईल. यातून लोकसहभागाची विश्वासाची भावना वाढीस लागेल. यातून वनांना आगी पासून वाचवण्याची जबाबदारी दृढ होत जाईल. अंगार मुक्ती करिता लोकांच्या मनात नवनवीन संकल्पना येतील. या करिता सुद्धा गुणांकन करण्यात आले आहे. अशा तर्हेने अंगार मुक्त जंगलासाठी ९ प्रकारची कामे करण्याचा कालावधी १० मार्च ते २५ जून असा ठेवला आहे. व १ जुलै रोजी उत्तम काम करणाऱ्या गावांचा सन्मान केला जाणार आहे.



## अंगार मुक्त जंगलाच्या वाटेवरचे प्रयत्न

मेळघाट वन्यजीव विभागाच्या विभागीय वन अधिकारी श्रीमती पियुषा जगताप, मेळघाट प्रादेशिक वनाचे उपवनसंरक्षक श्री. अविनाश कुमार यांचे मार्गदर्शनात गाव पातळीवरील वनरक्षक यांना या स्पर्धेतील कामाची जबाबदारी सोपवली आणि आजपर्यंत वनवणवा लागल्यास दोषींना दंड, तुरुंगवास ह्या भाषे बरोबर चांगले काम करणाऱ्या, साथ देणाऱ्या गावाला बक्षिसांची भाषा **अंगार मुक्त जंगल स्पर्धे निमित्य केल्या जात आहे.** वन विभागाचे कर्मचारी गाव पंचायतमध्ये सहभागी होत आहे. त्यातून एक विश्वास निर्माण होत आहे. गावागावात वनपाल वनरक्षक यांनी मीटिंग घेतल्या आहेत. होळी सणाच्या गाव पंचायत मध्ये अंगारमुक्त जंगलविषयी चर्चा झाली. रब्बी हंगामाच्या समाप्ती नंतर पिकांची धसकटे न जळता रोटाव्हेटर नांगरच्या माध्यमातून मातीत मिसळले जात आहेत. उन्हाळ्याच्या दिवसात काडीकचरा न जळण्याचे निर्णय घेतल्या जात आहे. धुऱ्यावर शेतात ठेवून कंपोस्ट खताची तयारी केली जात आहे. मोहफुले वेचतांना वनरक्षक टीम फायर ब्लोअर ने पालापाचोळा साफ करून देत आहेत. काही गावात साडी, ताडपत्रीचा वापर केला जात आहे. डॉ. शामा प्रसाद मुखर्जी जनवन योजनेतुन मोहफुले वेचण्याकरिता जाळी, ताडपत्री घेतल्या जात आहे. तसेच तूर पिकाच्या उरलेल्या तुरट्याचे खराटे करून मोहाच्या झाडाखाली वनरक्षक लोकांबरोबर खरट्याने झाडून दाखवत आहे. तेंदूपत्ता वेचण्याचे कामे आता ग्राम पंचायत, ग्रामसभामार्फत काढल्या जात आहे. त्यामुळे तेंदूपत्ता जास्त मिळावा, लवकर लवकर तोडता यावा, या ठेकेदार पद्धतीवर नियंत्रण आले आहे. आगीच्या घटनांवर लक्ष देण्यासाठी वनरक्षकांच्या मदतीला आग विझवायला १०-१५युवकांची टीम तयार झाली आहे. ही सर्व कामे अंगार मुक्त जंगलांच्या वाटेवर आता मेळघाटात सुरू झाली आहे. दिनांक २०/४/२०२० या तारखेपर्यंत अंगार मुक्त जंगल स्पर्धा यातील १३३ गावांपैकी फक्त ६ गावांच्याच बिटमध्ये आगीच्या घटना घडल्या आहेत. या घटना का घडल्या आहेत.? या कारणांचा अभ्यास जर केला तर या समस्येच्या मुळाशी जाऊन या आगी शून्यावर आणण्यास मदत होईल. यातून गाव आणि प्रशासन यामध्ये सहभागाची सहकार्याची भावना निर्माण करू शकतो. या लेखाच्या शिर्षकाचे हेच उत्तर होय. नाही का.?




लोकमत

Hello Amravati
Page No. 2 Mar 05, 2020
Powered by: erelego.com

# वनसुरक्षा जागृतीसाठी आता 'अंगारमुक्त जंगल' स्पर्धा

## गावांना ५0 हजारांचा पुरस्कार : जागतिक वन्यजीवदिनी परतवाड्यात घोषणा

**परतवाडा :** जंगलाला आग लागू नये, जंगल आगीपासून सुरक्षित राहावे, याकरिता मेळघाट प्रादेशिक वनविभाग व मेळघाट वन्यजीव वनविभाग (परतवाडा) आणि निसर्ग फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अंगारमुक्त जंगल स्पर्धेची घोषणा जागतिक वन्यजीव दिनी ३ मार्च रोजी परतवाड्यात घोषणा केली गेली.

जंगलाला लागून असलेल्या गावांतील लोकांचे सहकार्य मिळावे म्हणून आगीपासून जंगलाला वाचविणाऱ्या गावाला ५० हजार रुपयांचा पुरस्कार दिला जाणार आहे. द्वितीय पुरस्कार ३० हजार, तृतीय पुरस्कार २० हजार रुपये ठेवण्यात आला आहे. या स्पर्धेचा कालावधी १० मार्च ते २५ जून असा आहे.

दरम्यान, जागतिक वन्यजीवदिनी परतवाडा येथे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रसंचालक एम.एस. रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात 'अंगारमुक्त जंगल स्पर्धा २०२०' बाबत विस्तृत माहिती रेड्डी यांनी उपस्थित वनअधिकारी, आरएफओ, एसीएफ, वनपाल, वनरक्षक, वनसमितीचे अध्यक्ष यांच्यासमक्ष स्पष्ट केली. जंगलासह वन्यजीवांचे महत्त्व आणि संरक्षणविषयक जबाबदारीची जाणीवदेखील त्यांनी उपस्थितांना यावेळी करून दिली. याप्रसंगी मेळघाट वन्यजीव विभागाच्या विभागीय वनाधिकारी पीयूषा जगताप, मेळघाट प्रादेशिक वनविभागाचे उपवनसंरक्षक अविनाश कुमार उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांना जंगलाला लागणाऱ्या आगीमुळे होणारे नुकसान, आग विझविण्याकरिता करावयाचे प्रयत्न आणि वन्यजीव, वन्यप्रण्यांविषयी लघुपट दाखविण्यात आले. जंगलांमुळे पर्यावरण अबाधित राखण्यास मोठी मदत होते. त्यामुळे नागरिकांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे त्या म्हणाल्या.


माहिती देताना पीयूषा जगताप व अन्य

### गावपंचायतीला महत्त्व

- अंगारमुक्त जंगल ठेवण्याकरिता गावपंचायतीलाही महत्त्व देण्यात आले आहे. गावातील १0 ते १५ युवकांची चमू तैनात ठेवावी. त्यांच्यामार्फत घटनांवर लक्ष केंद्रित करावे. याकरिता गावपंचायतीने स्वत:चे नियम बनवावे. हे नियम गावातील चावडी, मुठवाबाबा या ठिकाणी लावावे लागणार आहेत. तेंदूपत्ता संकलनासाठी तसेच मोहाच्या झाडाखाली आगी लावू नये, असे निर्देशही या उपक्रमांतर्गत देण्यात आले आहे. गावपंचायतीला, गावाशेजारी जंगलातील आग रोखण्यासाठी नावीन्यपूर्ण संकल्पना तसेच चराईबंदी, कुऱ्हाडबंदीसह कुकुरकोंडा नियंत्रण कार्यक्रम हाती द्यावे लागणार आहेत.

दीपा जाधव
सिडनी, ऑस्ट्रेलिया
✆:8208707426

# "मेळघाट" धरतीवरील स्वर्ग...

जंगलात वेड्यासारखं फिरायचं, जंगल अनुभवायचं मनोमन ठरवलं होतं, आणि तसा तो योग चालून आला. माझ्याच सारखेच जंगल प्रेमी, वेडे म्हणा हवे तर सोबती उत्साहाने माझ्या सोबत सामील झाले आणि मेळघाट जंगलात जायचं ठरले. मग त्यांना मेळघाटमध्ये काय दाखवायचे न काय नाही असे मला झाले आणि यासाठी मेळघाटशिवाय पर्याय नाही हे मला माहीत होतं. पण खरे सांगायचे तर मीच जंगलात वेड्यासारखं नवनवीन निसर्ग शोधण्यासाठी निघाले होते, मुंबई ते अकोला आणि तिथून शाहनूर असा प्रवास करून आम्ही पोहचलो.

शाहनूर नांवाप्रमाणेच असणाऱ्या नरनाळ्याच्या पायथ्याशी, निसर्गाच्या कुशीत सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध असलेल्या टेन्ट/इकोहट आमचे स्वागत करत होता. आम्ही विसावलो, सुखावलो. हिरवी शाल पांघरून अलौकिक निसर्ग सौंदर्याने नटलेला मेळघाट अजूनच लुभावत होता. प्रत्येक वेळी ओळखीचा तरी ही नविन अनुभव देणाऱ्या मेळघाट... हा एक सृष्टी सौंदर्य, जैव विविधतेचा जणू खजिनाच! जिथे निसर्गाच्या प्रत्येक घटकांचे संरक्षण आणि संवर्धन केले जाते, अशा मेळघाटच्या जंगलात आलो असल्यामुळे माझ्या यादीत नाविन्यपूर्ण निसर्ग अनुभवांची भर पडत चालली होती.

### नरनाळा किल्ला!

किती इतिहास आहे ह्या किल्ल्याचा, पण तो ही विसर पडेल असे पावसाचे साम्राज्य पसरले होते. ढग तर जणू निवांत खाली उतरून आमच्याशी गुजगोष्टी करत होते. ते कमी म्हणून ओलेचिंब भिजलेले सांबार 'ईकडे कुठे' अशी नजरेने पाहत होते. काय नी किती साठवून घेऊ असे निसर्ग सौंदर्य पुरेपूर अनुभवत होतो. कधी दिवस संपून रात्र झाली कळले देखील नाही.

दुसऱ्या दिवशीची बोरी-गुल्लरघाट सफारी खुणावत होती. भल्या पहाटेच उठून तयार झालो. जंगल भटकंतीचे वेध लागले की, कधी जंगलात जाऊ कधी नाही अशी तळमळ सुरू होते.



जंगलाची ओढ झोपू देत नाही. तो जंगलाचा गंध मनात दरवळत राहतो. पालापाचोळ्याचा आवाज, पानांची सळसळ आवाहनही करत राहते. भटकंती साठी एक उर्जा संचारते, जंगलजंगल करण्याची ही इच्छा बोरी सफारी ने चालून आलेली.

पहाटेच्या अंधारलेल्या तरी ही आल्हाददायक वातावरणात सफारी ची मजा काही औरच.

पावसामुळे मेळघाटचे सौंदर्य अजून खुलून आलेले... हिरव्या गार झाडांमधून अचानक समोर आलेले ओले चिंब भिजलेले... चिखलात माखलेले सांबार, आमच्या अस्तित्वाने बावचळलेले हरणांचा कळप म्होरक्याच्या नेतृत्वाखाली सावध झालेले आणि आवाज सुरु झाले. कानोसा घेत आम्ही जिप्सीच्या दबेपाव निघालो. 'वाघोबा' जवळच कुठेतरी आमच्या वर नजर ठेवून निवांत विश्रांती घेत होते. आमची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. वाघोबांनी मात्र बहुतेक 'परत या' असे सांगितले. बघता बघता रविराज क्षितिज फाडून डोंगराच्या कडांवर अवतरलेला. सकाळचे जंगलातले वातावरण फार बोलके होते, आपोआप आपण जंगलात आत खेचलो जातोय. असे वाटत असतानाच मेळघाट हे अस्वलाचे माहेरघर असल्याने निवांत पाठीवर बच्चा घेऊन सावधानचा इशारा देत अस्वलीने दर्शन दिले. डोळ्यातून मनात साठवत होतो, तो पर्यंत इंडियन गौर फॅमिली 'आमच्या घरात आला आहात'ची जाणीव देत होते. नीलगायींचा कळप पाहणं ही जणू पर्वणीच होती.

ते कमी म्हणून बार्किंग डिअर... जंगल कॅट...पक्षी... वेगवेगळ्या प्रकारचे साप... कोळी...किटक... काय आणि किती असं नयनरम्य अनुभव.

***मेळघाटचे मोठं विशेष म्हणजे दर महिन्याला येणारे मचाण थ्रील!***

ह्या मचाण थ्रील अनुभव म्हणजे स्वतःला विसरून पूर्ण पणे जंगलमय होणे. इतक्या जवळून तूम्ही जंगल फक्त मचाणावरूणच अनुभवू शकता. तो अनुभव खुप थ्रीलींग असतो. तुमचा प्रेझेन्स न जाणवू देता प्राण्यांच्या, पक्षांच्या सवयी, त्याच्या वावर पहाणे अवर्णनीय असते. अजून आम्ही मचाणावर स्थिरस्थावर होतं होतो तो पर्यंत मंकी कॉलिंग चालू झाले, घनदाट जंगलात 'कॉलिंग' चा आवाज़ अंगावर शहारे आणणारा होता. जवळ जवळ अर्धा तास... अधिरता वाढवत होता...जंगलाचा राजाच तो...आणि...आणि मोठा नर आमच्या मचाणावरूण दिसायला लागला 20 फूट अंतरावर असलेल्या पाणवठ्यावर साक्षात आपली तहान भागवण्यासाठी आला होता. चंद्र प्रकाशात त्याच्या सोनेरी पिवळा रूबाबदारपणा डोळ्यात भरत होता, तोंडातून शब्द फुटत नव्हता कि डोळ्याची पापणी लवत नव्हती. पण त्याला आमच्या अस्तित्वाची जाणीव झाली. अजून त्याची आठवण डोळ्यात साठवून घेत होतो तोपर्यंत आला होता. तसाच तो दिसेनासा झाला... आम्ही अजून भानावर येत होतो, तो पर्यंत मोर तहान भागवण्यासाठी थबकत आला. आता पाणवठ्यावर चितळ, सांबार, मोर येऊन पाणी पिवून गेले. डोळ्यादेखत अख्खी रात्र कधी नी कशी सरली कळले देखील नाही. मचाणावरील अनुभव अचंबित करणारा होता. "आवरा स्वतःला" असे सांगत कसे तरी सावरले.

निसर्ग सौंदर्याची खान हाती गवसली होती. मन भरत नव्हते... निसर्गातल्या ह्या अगणित गोष्टीं माझा पाठपुरावा करतात...माझ्या मनाला भिडतात आणि त्यात स्वतःला हरवते.. .मी पणा विसरून जाते ... प्रसन्न आणि शांत...
हा सुंदर अनुभव साठवून घेण्यासाठी... वेळ पुरत नव्हता...

ह्या अशा किती छान आठवणी... सोबत घेऊन निघाले खरी पण परत येण्याचा स्वतःहाशी निश्चय करून !!!



मीना जाधव
मुंबई
✆:8208707426

# "निसर्ग अनुभव", "मचानवरील थरारक रात्र"

**18 मे 2019 बुध्द पौर्णिमा!**

मेळघाट जंगलात निसर्ग अनुभव, म्हणजे प्राणी गणना साठी जाणे हे फिक्स ठरलेले, मेळघाट पहिल्यांदा पाहिला तेव्हा पासून मेळघाटच्या प्रेमात पडलेले. प्रत्येक वेळी मेळघाट आधिक जवळचा तरीही नविन भासणारा वाटतो. मेळघाट म्हणजे अलौकिक असे नयनरम्य निसर्ग सौंदर्य आणि विविध प्रकारचे प्राणी-पक्षी, जैव विवीधतेचा खजिना.

वर्ष भर आतूरतेने वाट बधून आलेला दिवस! माझ्या सारखे अनेक जंगल प्रेमी एकत्र येणार. नवनवीन अनुभव ऐकायला मिळणार. ही जंगलाची ओढ, जंगल भटकंतीचे वेध लागले कि भटकंती साठी एक उर्जा संचारते.

मुंबई ते अकोला आणि तिथून शहानूर असा प्रवास करून आम्ही पोहचलो. नरनाळा किल्ल्याच्या जवळ अगदी पायथ्याशी निसर्गाचा कुशीत असलेल्या शहनूर मध्ये सर्व सुविधा उपलब्ध असलेल्या इकोहटचे ऑनलाईन बुकिंग केलेले. मन आधीच पोहचलो. त्यामुळे प्रवासाचा शीण तर राहू द्या उलट तिथल्या वातावरणामुळे मचाणाचे वेध लागले होते. लकी ड्रॉ काढले, सर्वांना योग्य ती माहिती, खाण्याची पॅकेट दिले गेले.

जंगल वाटेने आम्हाला लकी ड्रॉ ने मिळालेल्या मचाणावर बसण्यासाठी आम्ही निघालो. जिप्सी धावत होती. पण त्याहीपेक्षा पुढे मन पळत होते. आम्ही जंगल अनुभवत होतो. जंगलाचा एक वेगळाच गंध असतो, भाषा असते ती समजून घ्यायची असेल तर जंगलाशी एकरूप व्हावे लागते तेव्हा कुठे तूम्हाला जंगल बघायला, अनुभवायला मिळते आणि आपण त्याच्या प्रेमात कधी पडलो हे ही आपल्याला कळत नाही. जंगल वाटेने जाताना प्रत्येक वेळी नवनवीन काही बघायला मिळतेच आणि ही ओढ एक एक गूढ वाढवत जाते हे गूढ पाहण्यात वेगळाच आनंद मिळतो.

मला धारगड रेंज मधील गुल्लारघाट मधील मोह २ हे मचान मिळाले होते. सगळे कसे शिस्तबद्ध. ही माझी चवथी वेळ होती मेळघाट मध्ये प्राणी गणनेला येण्याची. जंगल खात्याने बारकाईने तयारी केलेली दिसत होती. जंगलं खात्याच्या मदतीने सर्व तयारीनिशी दिड वाजता आम्ही मचाणावर बसलो, आणि जसे काही एकरूप झालो. फक्त डोळे आणि कान इतकेच काय ते काम करत होते. आपल्या अस्तित्वाची जाणीव होवू न देणे हे इतकं अवघड असते हे मला मचाणावर बसायला लागल्यापासून कळत होते.



अनेक प्राणी, पक्षी पाणवठ्यावर पाणी पिण्यासाठी येत होते. तहान भागवण्या साठीची त्यांची ती कसरत, त्यांच्या डोळ्यातील भीती स्पष्ट दिसत होती, एक एक पाऊल विचारपूर्वक टाकले जात होते. मध्येच जंगली कुत्र्यांचा ओरडण्याचा आवाज जवळच ऐकू येत होता. बाजूच्या मिडो मध्ये पंधरा/सोळा पांढरे पाय असणारे इंडियन गौर सावधपणे आपल्या पिलांना घेऊन चरत होते.

बघता बघता सुंदरसा चंद्र डोकावून पाहू लागला हे सौंदर्य फक्त इथेच डोळ्यात भरभरून साठवू शकता. हळु हळू रात्र डोके वर काढू लागली. पण चंद्र ही काहीं कमी नव्हता लखं प्रकाश पडला होता सगळे कसे स्पष्ट दिसू लागले होते. आजूबाजूला वेगवेगळे आवाज येत होते, पानांची सळसळ, आणि वरून भिरभिरत पडणाऱ्या सुकलेल्या पानांचा आवाज कानालाच काय मनालाही ह्या अनोख्या दुनियेत कानोसा घेण्यासाठी  तयार करत होता. झाडाच्या उंच सावल्या भिववत होत्या. त्यातच काय कमी म्हणून रातकिड्याची जोरात चर्चा चालू होती, मग बेडूक तर कसे मागे राहतील पाणवठ्यावर त्यांनी ही स्पर्धा चालू केली नि नकळत आम्हाला सोबतही. पावलाचा जोरजोरात आवाज येऊ लागला, आम्ही सावध झालो... पहाता पहाता मोठे अस्वल पाणी पिण्यासाठी आले होते आम्ही स्थिर स्तब्ध...पण त्याला वास आला होता मचानाला गोल चकारा मारून बहुतेक माफ करून पाणी पिवून निघून गेले असे चालू असताना कॉलिंग चालू झाले, सतत कॉलिंग जवळ जवळ येत होते, आता कोणत्याही क्षणी वाघ किंवा बिबट्या येणार...कान टकारून बसलो होतो. आमचीच धडधड आम्हाला स्पष्ट कळत होती त्यातच जोराच्या वाऱ्या मुळे झाडांची पाने गळून पडतांना होणारा आवाज...मनात भिती निर्माण करत होता... डोळ्यात तेल घालून ह्या सगळ्याचे निरीक्षण करत होतो...कॉलिंग अजूनही चालू होते कधी सांबरचे तर कधी हरीणाचे.

निसर्गातील या प्राण्यांना त्यांच्या न कळत बघणे यासाठी काय काय करावं लागू शकते हे जंगलात राहील्यावरच कळत. आपली एक छोटीशी चुकीची कृती प्राण्यांना तहान भागण्यापासून रोखू शकते किंवा त्यांचा जीव जावू शकतो ह्याची पूर्ण जाणीव ठेवून विचारपूर्वक वागत होतो. चंद्राचा प्रकाश इतका प्रखर असतो हे जंगलात कळत होते मला.. रात्री परत दूसरे अस्वल आले आता ते थेट आमच्या कडे पाहत होते तेव्हा भीतीने  तोंडातून शब्द फुटत नव्हते मी  तयारीनिशी बसले... पण त्यालाच  दया आली असणार ..'पाहुणे चांगले आहेत' असे वाटले असणार जंगलातील प्राणी खूप बुद्धीमान असतात याची प्रचीती जंगलात राहिल्यावरच येते. वाघ/ बिबट्या जो कोणी जवळपास होते. त्यांनी आम्हाला फसवल होते.. एकतर आम्हाला न दिसता पाणी पिवून गेले तरी होते नाहीतर दुसऱ्या पाणवठ्यावर गेले होते.. पण जे काही मिळाले होते ते ही खूप चित्तथरारक होते. अविस्मणीय होते.

पहाटे रविराजाकडून जंगलाच्या सौंदर्य त अजूनच भर पडली होती. अशा निसर्ग रम्य वातावरणात पक्षांचे सुंदर निरनिराळे आवाज कान सुखावत होते. त्यांचे स्वच्छंदी बागडणे मनाला वेड लावत होते. आपले डोळे, कान किती तीक्ष्ण आहेत हे जंगलात राहिल्यावर कळते...


मोर, लांडोर, इंडीयन गौर, सांबर, चितळ, अस्वल (तीन), रानडूक्करं, रानमांजर, जंगली कुत्री, अनेक पक्षी, न दिसलेला पण आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देणारा आमचा वाघ, धडकी भरवणारी कॉलिंग... अनुभवाची आणि कागदावर ची लिस्ट संपत नव्हती.

हे वर्णन कमी पडेल असा अनुभव. डोळ्यादेखत अख्खी रात्र कधी सरली हे कळले देखील नाही. निसर्गातल्या ह्या अगणित गोष्टीचा अनुभव, एक अनोखी आठवण मनात साठवत होते. सकाळचे ८ वाजायला आले होते. जड मनाने मचानावरून खाली उतरलो. ते खूप काही अनुभव सोबत घेवून पण मन अजून भरले नव्हते. सगळे निसर्ग प्रेमी आपआपले रोमांचक अनुभव शेअर करत होते. अनुभव खूप थ्रीलींग होते पण मला वेध लागले होते 'मचाण थ्रीलचे'.

मेळघाट चे वैशिष्ट्य असलेल्या  मचाण थ्रीलचे बुकींग केले होते सगळ्यांचे निरोप घेवून मचाण थ्रील च्या तयारी केली शहानूरच्या आसपासच्या बफर झोनमध्ये असलेल्या मचाणावर परत एकदा स्थिरस्थावर झालो. जंगलातल्या निरव शांततेत येणारा प्रत्येक आवाज कानाला एक वेगळा अनुभव देत होता. एक निराळे विश्व, अलगद बाजूच्या झाडातून मोर लांडोर पाणवठ्यावर आले आणि पाठोपाठ सांबरची जोडी अजून पाणी पिताहेत. तोच माकडांचा आवाज येऊ लागला. सांबर अदृश्य झाले होते...आमची अधिरता शिगेला पोहोचली होती. बहुतेक सात वाजायला आले होते त्यामुळे ना उजेड ना अंधार... मंद वारा सुटला होता... पानांची सळसळ देखील अंगावर शहारे आणत होता... धडधड स्पष्ट जाणवत होती... आम्ही स्थिर-स्थब्ध, फक्त डोळे आणि कान.... कॉलिंग जसे जवळ येत होते... आणि माझ्या उजव्या बाजूने हळूहळू लक्षात येऊन मेंदूला कळेपर्यंत एक विशाल काय आकृती पाणवठ्यावर येत होती...डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता, ज्याची आतुरतेने वाट पाहत होतो. तो काही फुटांवर पाणी पीत होता...पाणी पिऊन तृप्त झालेल्या जंगलातल्या ह्या राजाने आम्हाला अचंबित सुखी केले होते...सगळ्यां जगाचा विसर पडला होता.

स्वतः चे अस्तित्व देखील जाणवत नव्हते...हे अनुभवण्यास नजरेस एक कौशल्य निर्माण व्हावे लागते इतकं मात्र निश्चित. त्यांचे आपल्या वर लक्ष असते पण आपल्याला त्याची जाणीव नसते आणि तो आला होता तसाच दिसेनासा झाला... ज्याला बघण्यासाठी तडफडत होतो तो साक्षात आमच्या समोर होता.. आम्ही स्थिर...मनात आठवणी अजून साठवत होतो... मन तृप्त झालं होतं भानावर आलो तेव्हा लक्षात आले कोणीतरी पाणी पित आहे..'मॅडम अस्वली' गाईड दबक्या आवाजात सांगत होता, आणि खरेच एक मोठा काळा गोळा पानांचा आवाज करत नाहीसा झाला. हा जंगलाचा छंद खूप काही शिकवून जातो. जंगलाचे, वन्यजीवांचे म्हणजेच मेळघाटचे नाते निर्माण झाले आहे ह्याची जाणीव होत होती. पहाटेचे चार वाजायला आले होते हे अंधारलेल्या वातावरणात आल्हाददायक वाटत असते. निसर्गाने जणू काही ए.सी. सुरू केला होता, थंड वाऱ्याबरोबर जंगलातील अनोखा सुखद गंध जाणवत होता आणि हाच गंध मनात दरवळत राहातो एक ओढ निर्माण करतो..सकाळ होत होती जंगलातले सकाळचे वातावरण फार बोलके असते. पक्षांची किलबिलाहट सुखावणारी होती. पूर्वेला आलेल्या रविराजांच्या किरणांनी मनातला पालापाचोळा दूर केला होता इतकं प्रसन्न वातावरण... मुंबईला कधी ही अनुभवायला मिळाले नव्हते... मॅडम निघायचे ना! गाईडच्या आवाजाने भानावर आले. जंगलाची ओढ, गंध,आवाज आठवण कानात - मनात साठवत मचाणावरूण खाली उतरले ते खूप काही अनुभव सोबत घेऊन आणि पुढच्या वर्षी परत येण्याचे पक्के ठरवूनच...

हे सगळे प्रत्यक्षात अनुभवायचे असेल, तर तुम्हीही मेळघाटचे मचाण अनुभवाचं...!



सतीश अनसिंगकर
पुणे
✆:9730127950

# मनस्वी मेळघाट आणि नरनाळा

घाटांचा मेळ म्हणजे मेळघाट..... इतके सुंदर नाव धारण केलेल्या या निसर्गसंपन्न डोंगर दऱ्या आणि घाट आणि सर्वार्थाने निसर्ग आणि प्राण्यांना अभय देणाऱ्या अभयारण्याचे माहेरघर म्हणजे मेळघाट. वाघाचे निवासस्थान म्हणजे निसर्गाचा "Top Down Pyramid"..... मेळघाट इथे आता तो दोन भागात आहे. अलीकडे हिल स्टेशन्स म्हणजे तोबा गर्दी, झुंबड, मनाला शांतत्ता नसणे... याला पर्याय अभयारण्य ठरले. ताडोबा ने, पेंच ने विदर्भात सुरुवात केली आणि मेळघाट जो थोडासा मागे राहिला होता, आता तो दोन विभागात निसर्गाच्या खऱ्या रुपात नांदतोय.

ज्या लोकांना व्यावसायिक पर्यटनाचा कंटाळा आणि ठराविक धाटणीची सुट्टी सहल नको असते... त्यांनी या मॅजेस्टिक "मेळघाट" कडे जरूर वळावे. अकोला आणि अमरावती जिल्ह्याच्या उत्तरेला मेळघाट हा सातपुड्याच्या कुशीतला बराच मोठा भाग आहे ज्याचा पुर्व भाग चिखलदरा, गाविलगड किल्ला, सेमाडोह Tiger Core Area आहे जो परतवाडा विभागात येतो तर नरनाळा Tiger Fort, बोरी Tiger Core Area आणि धारगड असा पश्चिम मेळघाट हा अकोट येथे विभागला आहे.

फक्त आणि फक्त निसर्ग, प्लास्टिक चा अंश नाही, गाड्यांचे प्रदूषण नाही, उंच डोंगर, दऱ्या, झरे, धबधबे, त्यात अस्वले, वाघ, बिबटे, गवे, सर्प, पक्षी आणि सागाचे मौल्यवान जंगले असलेला हा भाग आहे. दोन मोठे डोंगरी किल्लेआणि एक बैठा किल्ला मेळघाटात आहेत.

मेळघाट हे नाव बरेचदा फक्त चुकीच्या कारणांनी घेतले गेल्याने निसर्गप्रेमी जे दूर अंतरावर आहेत, त्यांना कल्पनाच येणार नाही की इथे निसर्ग काय भरभरून देतोय. अकोट या अकोला जिल्ह्याच्या तालुका ठिकाणी याची कल्पना सुद्धा येत नाही की इथून फक्त २५ किमीवर पूर्व पश्चिम सात रांगांचे डोंगर सातपुडा बनून समोर येतील. चिखलदरा बऱ्याच लोकांना पाहून, ऐकून माहिती आहे....परंतु पश्चिम मेळघाटातील नरनाळा Tiger Fort, बोरी अभयारण्य हा वेगळा आणि तेवढाच आनंद देतो. शहानुर या खेड्यात सातपुड्याच्या पायथ्याशी base camp केला गेला आहे. तो पूर्णपणे फक्त फॉरेस्ट Departmentच्या नियंत्रणात आहे.आम्ही २०१७ ला मुद्दाम दिवाळी सुट्टीत ठरवले आणि आमच्या कार ने पुण्याहून आलो. जस जसे अकोट मागे पडले समोर सातपुडा क्षितिजावर मोठामोठा होत गेला. प्रसन्न संध्याकाळी आणि टिपूर शांततेत घाटांच्या वळणा वळणात आणि घनदाट झाडीत हरवलेल्या शहानुर कॅम्प ला



पोचलो. त्या वेळचे RFO श्री सुनील वाकोडे यांनी अगदी मनापासून स्वागत तर केलेच आणि काय काय आणि कसे कधी बघावे हे ही सुचवले. इथे स्वतंत्र cottages आणि dormitory ची व्यवस्था तसेच restaurant आहे. शहानुर ला पोचलो की सर्वात आधी नजरेत भरतो तो भव्य देखणा आणि बुलंद नरनाळा किल्याचा डोंगर आणि त्याच्या पूर्व पश्चिम रांगा. ३ मोठ्या डोंगरी किल्यांनी मिळून हा खरे तर किल्ला complex आहे. नरनाळा हा किल्ला १० व्या ते ११व्य शतकात नरनाल सिंग यांनी बांधल्याची माहिती मिळते ...म्हणून नरनाळा. नंतर आक्रमणात तो आणि गाविलगड हे बहामनीकडे आले, नंतर ते मुघलशाही आणि पेशवे काळात ते मराठ्यांच्या ताब्यात आले.

शहानुर येथील सकाळ म्हणजे अक्षरशःस्वप्नवत असते. आवाज येतात ते फक्त पक्षी प्राण्यांचे. जाग येते तीच कोंबड्यांच्या आरवण्याने. गाव अगदीच लहान आहे आणि तेही निसर्गाशी एकरूप आहे. लख्ख कोवळ्या सूर्यप्रकाशात दिसतो तो हिरवाकंच निसर्ग, मागे धिप्पाड डोंगर रांगा आणि नि:शब्द शांतत्ता... जुलै ते नोव्हेंबर दरम्यान या basecamp मधूनच वाहणारा ओढा जिवंत असतो आणि नुसत काठाशी बसलो तरीही थकवा दूर होतो.नरनाळा हा किल्ला ३००० फुट उंचावर आहे ...पण त्याला elevation ( थेट जमिनीपासून वर जाणे ) हे पुष्कळ आहे. आणि वर जीप ने जायला किमान अर्धा तास लागतो कारणरस्ता नागमोडी आणि चढण खडतर आहे. येथे स्वत: गाडी चालवत जाण्यापेक्षा Forest Dept च्या जीप ने गेलेले केंव्हाही चांगले कारण Open Roof Gypsy तयारच असतात. त्यातून निसर्ग चौफेर बघता येतो. आणि फोटोग्राफीही करता येते. नरनाळा किल्याला महाकाली गेट नावाचे सुस्थितीतले महाद्वार आहे तसेच तेथेच महाकाली मंदिर होते असे सांगितले जाते. बहुधा मुघल काळात ते उध्वस्त करण्यात आले. गडाचा विस्तार बराचमोठा आहे आणि पुष्कळ बांधकामे अजून आहेत. किमान ७ तलाव आहेत आणि एक मस्जिद आणि एक बेगम महाल आहे. सगळ्यात वैशिष्ट्यपूर्ण येथील तोफ आहे. १९ फुटइतकी अवाढव्य तोफ इथे आहे. फार कमी जणांना या बद्दल माहिती आहे. हिची तुलना जंजिर्याच्या कलाल बांगडी किंवा विजापूरच्या मुलुक ए मैदान शी सहज होऊ शकेल. या किल्यावर औरंगजेबच्या नातवाचा जन्म झाला होता, ज्यावेळी तो अहमदनगर येथे मुक्काम ठोकून होता. नरनाळा किल्ल्यावरून दूरपर्यंत सातपुड्याच्या रांगा आणि त्यातील पहुडलेली खेडी येथून दिसतात.



नरनाळा किल्ला ट्रीप आणि बोरी धारगड गुल्लरघाट अभयारण्य अशा दोन स्वतंत्र ट्रीप कराव्या लागतात, कारण किल्ला हा मागचे जे अभयारण्य आणि खोरे आहे त्यासमोर तो एखाद्या पहारेकऱ्यासारखा उभा आहे. त्यामुळे उरलेल्या त्याला खूप मोठा वळसा घालूनच जावे लागते.

या अभयारण्यातील जवळपास ८ ते १० खेडी आता पुनर्वसित करण्यात आली आहेत आणि त्यांना मोबदला दिला गेलाय. ती ओकी ओकी गावे बघताना मन खिन्न होते. त्यांची जी शेती होती ती आज वन्य प्राण्यांसाठी कुरणे आहेत. परंतु वाघासारखा प्रलुप्त होत जाणारा प्राणी वाचवायचा असेल तर हे जरुरी होते. जुलै ते फेब्रुवारी या काळात ५ ते ६ फुट उंच गवत असते जे गवे, सांबर, चितळ आणि त्या प्रकारच्या प्राण्यांना उपयुक्त ठरते आणि त्याचबरोबर त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या प्राण्यांनाही.

बोरी हे अभयारण्याचे शेवटचे ठिकाण आहे. त्यापुढे फक्त अति संरक्षित भाग सुरु होतो जिथे फक्त वन विभाग आत जाऊ शकतो. बोरीला जाताना गुल्लरघाट, धारगड अशी ठिकाणे लागतात. आणि सर्वात आनंदी धक्का देणारा सूर्या नावाचा धबधबा हा आजवर लपून राहिलेला खजिना आहे. जवळपास ३०० मीटर्स उंचीवरून ३ टप्प्यात हा दुधसागर धबधबा खाली आदळतो आणि तोच वान नावाच्या नदीला जन्म देतो. अक्षरश: तिथे जाईपर्यंत कल्पनाच येत नाही की हा असा धबधबा इथे असेल. निवळशंख पाणी कड्यांवरून, झाडांमधून खाली डोहात कोसळत असते. तिथून निघवत नाही. आम्ही कुटुंबच नव्हे तर आमची छोटी puppy ने देखील खाली झऱ्यात धमाल केली.

तिसऱ्या दिवशी आम्ही बोरी हे अभयारण्याचे शेवटचे गाव किंवा टोक इथे निवांत गेलो. हिवाळा आणि पाउस भरपूर येऊन गेला असल्याने दोन्ही बाजूस अक्षरशः हिरवा शालू नेसून फक्त निसर्ग मांडलेला होता. त्यात दऱ्याखोऱ्या आणि निबीड शांती. बोरीला आम्हाला तिकाडीचा हर्बल चहा दिला गेला ... आजही चव आठवते.

ना प्लास्टिकचे प्रदूषण, ना आवाजाचे, ना कृत्रीम दिव्यांचे..... उघड्या जीपमध्ये आपण डोळे निवतील असा निसर्ग, दऱ्याखोऱ्या, किर्र जंगल बघत असतो.... गाड्या फक्त वनविभागाच्या असल्याने आपण फक्त निसर्गात असतो. सगळी गावे पुनर्वसित केल्याने माणूस सुद्धा कमी दिसतो. फक्त वन विभागाची चेक पोस्ट्स आणि बोरी इथे त्यांचीच काही कुटुंबे एवढाच माणूस नावाचा प्राणी दिसून येतो. बाकी आपण आणि खरा निसर्ग असतो. बरेच लोक अभयारण्यात वाघाला बघणे हा एकच target ठेवून जातात. अभयारण्य हा काही झू नव्हे की अमुक ठिकाणी तो दिसेल. तेंव्हा माणसाच्या हस्तक्षेपा पासून अदूषित असा निसर्ग बघायचे ठरवून जावे. तिथे शांत मनाने मुक्काम करावा. मेळघाट आपल्यात झिरपत जातो.

मेळघाट ला जायला अकोला आणि अमरावती ही दोन मोठी शहरे आहेत, जी रेल्वे आणि highway वर आहेत. तिथून अकोटला जाऊन शहानुर गाठले की नरनाळा-बोरी आणि परतवाडा (आणि अचलपूर) गाठले की चिखलदरा-सेमाडोह असे करता येते.चिखलदरा येथे खाजगी हॉटेल्स आहेत परंतु शहानुर (नरनाळा) येथे वन विभागाच्या cottages आहेत. Booking online किंवा फोन करूनही होऊ शकते.

वन विभागाचे येथील ऑफिसर्स, कर्मचारी, वनरक्षक आणि सर्वच जण जातीने tourist ना आरामदायी वाटेल यासाठी प्रयत्न करतात.

कोरकू भाषा बोलणाऱ्या, मनाने अगदी सरळ आणि भोळे असणाऱ्या स्थानिक लोकांचा निरोप घेतांना मन जड होते........ मे महिन्यात येथे उन्हाचा तडाखा असला तरीही त्याचा उपयोग मचाण Census साठी आणि रात्रीच्या अवलोकना साठी वन विभाग करते. वेगळा अनुभव देणारा हा मेळघाट जरूर करा....... तो तुम्हाला निसर्ग आणि आपलेपण देऊनच परत धाडील तेही "पुन्हा या" असे सांगत......

आणि म्हणूनच आम्ही परत २०१९ ला इथे आलोच.... आणि परत कर्मचाऱ्यांनी अगदी आल्या आल्या विचारपूस केली की २०१८ ला का नाही आला??.... याचसाठी तर आपण Nature trip काढतो. नरनाळ्यावर आणि गुल्लरघाट येथे Restrooms (स्त्रियांसाठी विशेष करून) केले तर आणखी महिला सुद्धा उत्सुक असतील.



**Pratiksha Ingle**
Partawada
✆:8788417990

# MY DAD IS GREEN HERO

"The heart of father is The masterpiece of nature"



No doubt this world is a beautiful part of life as this world gives us life but to conserve this beauty there are some people who sacrificed their life. And my dad is of those lionhearted people. He cares for the nature like his house, he protects the flora and fauna like his family and provides the facilities like his children. He usually has to care everywhere just because he feels his responsibilities. He has to look around every now and then.

My father Mr. Tejrao ingle is really a green hero. He has to check for the forest fire in the forest, he has to take care that he could not do any mistake. He has to struggle out day and night so that he could save the nature. But amazingly his desire to serve the nation never ends. My father, Tejrao ingle working in the forest department, Jamali has always wished to serve the nation hence he was initially working as an army officer and he had even owned many medals and brought glory in his work.

After working befriending the army for about 17 years now he is passionate to save the forest. He generally has workload, panic about the number of loans taken and worried about my and my sister's studies but still, he always keeps smiling as if he is living a very luxurious life.

When I and my sister were too small we could not get the time to spare with my father as he used to be busy serving the Indian army. I can not get the love of my father even on my birthdays he just calls and gives the wishes and blessings many times my parents anniversary is celebrated without my father. In school whenever a parent's meeting is announced I discover that my all friends bring their parents to hear the appreciation from the teacher but in my case, it's just my mother who comes. I miss my father on the annual day, in parents sports league where all the parents participate.

But still, I feel proud for my father is the person who is striving there so that I, my family, nature, and my nation could sleep happily. Writing about my father has no word limit and it's not particularly possible because it's too difficult to define him in words. His charming smile is not the truth because we know how his life is. He never takes a single dress on any occasion and wears the typical shirt-pant every now and then. No matter how he looks but if we don't have any new dress on any occasion, he himself feels guilty.

My father doesn't have electricity available at Jamali quarters nor do he have a network to call us but yes, of course, he has a beautiful family photo with which he communicates with us. I really feel to meet him, to be with him, to be daddy's girl, to play ludo and Badminton but them my heart tells me that he has his responsibilities too, with which I feel proud of being the daughter of an amazing green hero-my dad. So my dear green hero, don't worry and my family is always with you and your responsibilities.




The god is really creative............ I mean just look at my father.

भुषण अ. कुळकुर्णी
(लिपीक) मुख्य वनसंरक्षक, (प्रा)
अमरावती वनवृत्त, अमरावती
✆:9405814058

# "मेळघाट" एक अविस्मरणीय अनुभव

मेळघाट व्याघ्र प्रकल्प हे मध्य भारतातील सातपुडा पर्वत रांगाच्या दक्षिण भागात स्थित आहे. या सातपुडा पर्वतातील डोंगर दऱ्यात मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्रात निसर्गाचा भरणरून आशीर्वाद मिळालेले एक पर्यटन स्थळ "चिखलदरा" (Hills Station) वसलेले आहे. योगा योगाने मी वनविभागात कार्यरत असल्याने, मला माझ्या नोकरीतील पहिली नियुक्ती रेंजर्स कॉलेज, चिखलदरा येथे भेटली. मग काय पुढील काही वर्षे मी चिखलदरा येथेच मुक्कामी होतो. वारंवार अमरावती ते चिखलदरा प्रवासाचे योग आले. नोकरीच्या निमित्याने मला विदर्भाचे हे नंदनवन फार जवळून अनुभवायला मिळाले. त्याचे बरोबर पाहूणे मंडळी आणि मित्रांसोबत बरेच वेळा चिखलदरा सहलीचा आनंद घेतांना नाही म्हणण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. त्यावेळेस मेळघाटातील अनेक बारकाचे व अतुलनिय गोष्टी मनात घर करून गेल्या त्यापैकी या मेळघाटातील काही सुखकर अनुभव मी या माध्यामातून प्रिय वाचकांना सांगू इच्छितो.

"चिखलदरा" हे पर्यटन स्थळ समुद्र सपाटी पासून अंदाजे एकूण 1100 मीटर पेक्षा जास्त उंचीवर आहे. प्रामुख्याने या ठिकाणी सागवानचे वृक्ष मोठ्या प्रमाणात आढळतात. या क्षेत्रामध्ये भिमकुंड, वैराट देवी, पंचबोल पॉईट, देवी पॉईंट, सनसेट पॉईंट, शक्कर तलाव, गोराघाट, मोझरी पॉईंट, हेलीपॅड पॉईंट, आमझरी, जत्राडोह इत्यादी पर्यटन स्थळे पर्यटकांना पाहाण्यासाठी शासकीय यंत्रणे कडून उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. तसेच "गाविलगड" गवळयानी बांधलेला किल्ला या निसर्ग वनसंपदेत कित्तेक दशकापासून मानाने उभा आहे. गाविलगड हा वैभवशाली बांधकाम असलेला किल्ला विदर्भाचे भूषण आहे. त्या ठिकाणी वनविभागाकडून तयार करण्यात आलेले सुंदर वनउद्यान देखील आहे. पर्यटकांना राहण्यासाठी वनविश्रामगृह किंवा वनकुटी सुध्दा उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. पर्यटकांकरीता अलिकडे एडव्हेंचर स्पोर्ट्स (Adventure Sports), व जंगल सफारीची सुविधा सुध्दा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. चिखलदरा या गावापासून 10 किलोमीटर अंतरावर असलेले "वैराट" हे स्थळ समुद्र सपाटी पासून एकुण 1178 मीटर पेक्षा जास्त उंचीवर आहे. वैराट क्षेत्र हे वाघांचे मुख्य निवासस्थान म्हणून ओळखले जाते. तसेच त्या ठिकणी प्रामुख्याने वाघ, बिबट, कोल्हे, अस्वल, हरीण, रानमांजर, ससे, रानकुत्रे, खवल्यामांजर असे विविध प्रजातीचे जंगली प्राणी व मोर, लडोंर पोपट, कोकीळा, मैना, मत्स्य व विविध पक्षी वास्तव्यास आहेत. तसेच सदर क्षेत्रातून खंडू, खापरा, सिपना, गडगा व डोलार या तापी नदीच्या उपनद्या सुध्दा वाहतात. चिखलदराच्या पायथ्याशी सेमाडोह, कोलकास, हरीसाल इत्यादी निसर्ग पर्यटन स्थळे व लोकवस्ती आहे. त्या ठिकाणाहून सिपना नदी वाहते. या ठिकाणी जाण्याकरीता शासकीय परिवहन मंडळाच्या बसेस व वनविभागाच्या पर्यटन वाहनांची व्यवस्था आहे. त्याशिवाय या ठिकणी खाजगी वाहनाने सुध्दा प्रवास करता येतो.



अमरावती जिल्हयातील मेळघाट स्थित "चिखलदरा" या क्षेत्राला निसर्गाने भरभरून निसर्ग सौंदर्य अर्पण केलेले आहे. चिखलदऱ्याच्या उंच ठिकाणाहून चहू बाजूने नजर फिरविल्यास मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे निसर्गरम्य रूप डोळयांचे पारणे फेडते. चारही दिशेने घनदाट वन, वृक्ष संपदेने व्यापुन टाकलेला हा परिसर निसर्गाच्या किमयेचे दर्शन घडविण्यारा आहे. या निसर्गाचे कुशीतून वाहणाऱ्या छोटया छोटया ओढयांमधून खळखळणाऱ्या पाण्याचा आवाज, विविध पक्षांचे ध्वनीसूर हे मधुर संगीताप्रमाणे भासतात. पावसाच्या सरी पडताच मोर पिसारा फुलवुन नाचू लागतात. हरणांचे थवे आपल्याला मृगजळासारखे आकर्षित करीत असतात. प्रत्येक ऋतूत हे निसर्ग सौंदर्य वेगवेगळया छटा उमटवत असते. उन्हाळयात वृक्षांची पानझड व वन्यजीवांचे सहज दर्शन, हिवाळयात गुलाबी थंडी तर पावसाळ्यात निसंकोचपणे वाहणारे मनमोहक धबधबे, याचा कोणताही मोबदला मनुष्य अदा करून शकत नाही. धनदाट जंगलाचा मधुन गेलेल्या नागमोडया वळणाच्या पाऊलवाटा आपल्याला आतमध्ये खेचत नेतात. पहाटे असो व संध्याकाळी आकाशात नवनवे रंग डोळ्यांचे पारणे फेडतात. विविध प्रकारचे किटकं आवाज करून काहीतरी गुणगुणत असतात. तो आवाज मानवाच्या कल्पनेच्या वा समजण्याच्या पलीकडे आहे. मोठ-मोठी वृक्ष निरंतर काळापासून पासून या सर्व नैसगिक वनसंपदेची साक्ष देत मोठया डीलाने वनात उभे आहेत. या वृक्षांच्या फांदयावर अनेक पक्षांची निवाऱ्याची घरे आहेत. वानर सेना या वृक्षांच्या फाद्यांवर आराम करत असतात. ही सर्व प्राणीमात्रा निस्वार्थीपणे, अविरतपणे वनामध्ये वास्तव्य करत आहेत व निसर्गाची साखळी पुढे नेत आहे. एका वृक्षाच्या गळालेल्या बियांमुळे दुसरी रोपे उगवत असतात. व त्या रोपांची पाने खाऊन इतर जीव सुध्दा जगत असतात. एकाच पाणवठयावर मिळून सर्व प्राणी, पक्षी पाणी पित तृष्णा भागवत असतात.

पशुपक्षांना लागलेल्या चाहुलची माहिती विशिष्ट आवाजात इतर प्राणी मात्रांना सुध्दा देत असतात. या सर्व बाबी बारकाईने अनुभव हे स्वप्नातील कल्पनेप्रमाणेच अविस्मरणीय आहेत. हा अनुभव मला या प्रवासात घेता आला हे मी माझे भाग्य समजतो.

मेळघाटातील चिखलदऱ्याचा परिसर हा उंचावर असल्याने, साधारण:त जून ते सप्टेंबर महिन्यापर्यंत त्या ठिकाणी भरपूर प्रमाणात पाऊस पडतो, त्यादिवसात मेळघाटाचा परिसर अतिशय बहरलेला असतो. उन्हाळयातील सागवनाच्या वृक्षांची पानझड थांबून साधारणः जून महिन्यापासून झाडांना नविन पालवी फुटली असते, दऱ्या खोऱ्यातील दगडांना पाझर फुटला असतो, डोंगर कपाऱ्यातून अनेक नाले ओढे वाहायला लागतात. मोठ मोठे धबधबे खळखळणाऱ्या पाण्यासोबत उंचावरून पडायला सुरवात होते. पर्जन्यामत थंडगार होऊ लागते. क्षणा क्षणात हवामान बदलत असते. चहू बाजूने गवताचे व जंगली वनस्पतीची रोपे उगवायला सुरूवात होते. सर्वत्र मेळघाटाने हिरावा शालु परिधान केल्यासारखे वाटते. या दिवसात मेळघाटातील चिखलदरा येथे सहलीचा एक विलक्षण प्रवास अनुभवायला भेटतो. सकाळचे कोवळे ऊन, क्षणात पावसाच्या सरी तर क्षणात धुक्याच्या चादरी डोंगर रांगात पसरत असतात. धुक्यामुळे डोंगर रांगात जणु काही बर्फ पसरला की काय याचा आभास होतो. फुलपाखरे झाडांवर उडू लागतात. मोर लांडोर आनंदाने नाचत असतात. पक्षांच्या किलबिटाने वनात सुरांच्या शर्यती सुरू होतात. पशु पक्षी सैरा वैरा पळू लागतात वनातील ही वसंत ऋतुतील अदभुत दृश्ये पुस्तकातील कविते प्रमाणे आनंद देतात.

या मेळघाटातील डोंगर दऱ्या "कोरकु" लोकांचा समुह प्राचीन काळापासून वास्तव्य करीत आहे. वनविभागाप्रमाणे हे कोरकु लोक या वनसंपदेचे रक्षणकर्तेच आहेत. पाऊस पडताच हे कोरकु लोक उदर निर्वाहासाठी शेतीची छोटी छोटी पिके घेतात. डोक्यावर पोत्याची घोंगडी घेवून, गुरे ढोरे चरण्यासाठी ते जंगलात भ्रमंती करीत असतात. त्यांनाच या वनावतील वनऔषधींची खरी ओळख असते. या विज्ञानाच्या युगातही ते लोक जखम झाल्यावर अथवा प्रकृती अस्वस्थ झाल्यावर वनातील वनऔषधींचा उपयोग करून, उपचार करतात. यावरून या वनऔषधीचे महत्व कळते. या मेळघाटाच्या वनामध्ये तुळशी, मोहफुल, कुडलिंब, आवळा, पेरू, खंडुचक्का, आंबा, कोरफड, गोडलिंब, सिताफळ, कॉफी, रायमुनिया, अजंन, रक्तचंदन, अमलतास, बेहडा, हिरडा इत्यादी अनेक औषधी वनस्पती उपलब्ध आहेत. या वनवैभवामुळे मेळघाट हे संमृध्द वन असल्याचे स्पष्ट होते. वने नैसगिक स्त्रोतांचा अविभाज्य भाग असून, त्यास अनन्य साधारण असे महत्व आहे. खरे पाहिले तर या वनांच्या कुशीमध्येच मानवनिर्मित शहरे बसलेली आहे. या मानवी वस्तींना ही वनसंपदा नैसर्गिक सुविधेचा पुरवठा अविरतपणे करते असते. त्यामुळे त्यांचे संरक्षण व संवर्धन करणे ही मनुष्याची नैतिक जबाबदारी आहे. हे विसरून चालणार नाही.

अशा या मेळघाटातील वनामध्ये वनस्पती, वनऔषधी, वन्यप्राणी, पशुपक्षी व पाण्याचा मुख्य स्त्रोत असलेले झरे, ओढे, धबधबे ही उपलब्ध नैसर्गिक वनसंपदा सृष्टीचा समतोल राखण्यासाठी चिरंतर काळापासून अनमोल योगदान बजावत आहे. तसेच या वनांचे संरक्षण, संवर्धन केल्याशिवाय (Global warming) जागतिक तापमानवाढीला आळा घालण्याकरिता दुसरा पर्याय नाही. चला तर मग निश्चय करूया, या स्वर्गासारख्या मेळघाटाला भेट देवुन अलौकिक, अदभूत निसर्गोचे दर्शन घेवुया. व ही वनसंपदा पुढील पिढी साठी जतन करून ठेवण्याचा व अशी संमृध्द वने निर्माण करण्याचा निश्चय करूया.

# मेळघाट आणि प्रवासातील जैवविविधता

भरत पाटील
मुंबई
✆:7039228710

महाराष्ट्रातील महत्वाच्या व्याघ्र प्रकल्पांपैकी 'मेळघाट व्याघ्र प्रकल्प' हे लोकप्रिय आणि वाघांच्या संरक्षणाच्या दृष्टीने सुद्धा महत्वाची भूमिका बजावणारे व्याघ्र प्रकल्प! अनुकूल परिस्थितीतही वातावरणाची योग्य ती बाजू स्थिरावत येथील जैवविविधता विविध प्रकारांनी नटलेली आहे. इथले प्राणीजीवन, विविध प्रकारचे वृक्ष, पाणथळ जागा, स्थानिक आदिवासी यांचे जीवन व इथला प्रत्येक घटक एकमेकांवर अवलंबून आहे.

या संपूर्ण प्रदेशात वाकडी तिकडी वळणे असलेला घाटप्रदेश आहे. एकमेकांना जोडणाऱ्या या घाटरस्त्यांचा मेळ अद्भुत आहे. म्हणून कदाचित या प्रदेशाला 'मेळघाट' असे नाव पडले असावे.

मेळघाट हे नुसते वाघांसाठीच आकर्षणाच स्थान नसून येथील जैवविविधता ही तेवढीच आकर्षक आणि महत्वपूर्ण आहे. विविध प्रकारची झाड, सरिसृप, वनस्पती, विविध प्रकारच्या वेली, वन्यप्राणी, पाणथळ जागा, पूरातन काळापासून आदीवासींनी सांभाळलेल्या देवराया आणि अशा बऱ्याच गोष्टी आहेत ज्या इथल्या नैसर्गिक जैवविविधतेत महत्वाची भूमिका बजावतात.

येथील हवामान हे जैवविविधतेच्या दृष्टीने अनुकूल आहे. वातावरणातील गारवा, उन्हातील तापमान आणि आजूबाजूच्या पर्यावरणातील आल्हाददायक नैसर्गिक सहवासामुळे शरिरावर आणि मनावर तेथील वातावरणीय परिणाम भासू लागतो.

व्याघ्र प्रकल्पाला सिमा ठरवलेल्या असल्या तरी वन्यप्राण्यांसाठी हे जंगल जेवढ एकमेकांत डोंगरदऱ्यात पसरून पूढे गेलय तेवढ फिरण्याची व स्थलांतरीत होण्याची नैसर्गिक मुभा असते. वाघांसाठी सुद्धा व्याघ्र प्रकल्पाच्या सिमा या बांधील नसतात. त्यामुळे स्थलांतर करणे या नैसर्गिक स्वभावामध्ये वाघांची होणारी हालचाल आपल्याला मेळघाटातही जाणवते.

सदाहरित प्रकारात मोडणाऱ्या या जंगलात नेहमीच पर्यटकांची चेलपेल असल्याने या व्याघ्र प्रकल्पांमुळे इथल्या स्थानिकांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध झाल्या आहेत. इथे विशेष आकर्षण म्हणजे या जंगलातील 'वाघ'. जंगल भ्रमंती करीत असताना दिवसभर पर्यटकांची वाघाच्या एका झलकेसाठी चांगलीच उत्सुकता ताणावलेली असते. वाघांना आणि वन्यप्राण्यांना सुद्धा इथल्या या सर्व नेहमीच्याच हालचालींची सवयच झालेली असावी.

पर्यटकांच महत्वाच आकर्षणाच आणि अभ्यासाच स्थान असणार हे मेळघाट अनुभवण्यासारख आहे. बरिच हौशी पर्यटक मंडळी, निसर्ग अभ्यासक यांनी सोशल मीडिया द्वारे विविध समाज उपयोग माहिती उपलब्ध करून या प्रदेशाबद्दल वाचकांच्या मनामधे एक वेगळी जागा निर्माण केली आहे. बऱ्याच निसर्ग अभ्यासकांनी इथल्या विविध घटकांच्या आपल्या अभ्यासाच्या आधारे विविध पुस्तके सुद्धा लिहून प्रकाशित केलेली आपल्याला मिळतात.

सद्या महाराष्ट्र वन विभागाच्या वतीने आणि विविध सामाजिक संस्थांद्वारे मेळघाटातील प्राणीसृष्टी आणि जैवविविधतेच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी विविध पातळीवर प्रयत्न चालू असलेले दिसतात. सोशल मिडीयावरही विविध माध्यमातून चालू घडामोडींची योग्य ती माहिती मिळत असते. त्यामुळे मेळघाटाच्या विविधते बद्दल स्थानिक आणि राष्ट्रीय पातळीवर वाचक वर्गाला योग्यती माहिती मिळत रहाते.

मेळघाटात जिप्सी ने फिरण्याची मजा काही वेगळीच असते. तिन्ही ऋतूत इथल्या जंगल भटकंतीचा प्रवास अनुभवता येतो. विविध प्रकारचे हॉटेल्स येथे उपलब्ध असल्याने राहण्याची आणि खाण्या पिण्याची उत्तम प्रकारे सोय इथे होते.

बरीच गाईड मंडळीसुद्धा इथे आपल्याला भेटतात. त्यांच्या अनुभवाच्या आणि मार्गदर्शनाच्या निसर्गमय प्रवासात येथील विविध गोष्टींचा आणि प्रदेशातील जैवविविधतेचा आढावा घ्यायला फारच रोमांचक अनुभव मिळतो. पहाटे इथल्या कच्या रस्त्यांवरून जसजशी जिप आतमधे प्रवास करते तशी येथील जैवविविधता आपले विविध रूप दाखवायला सुरुवात करते. मधेच एखाद वन्यप्राणी रस्ता ओलांडताना नजरेस पडतं किंवा आजूबाजूच्या परिसरातील फिरत असणारे प्राणी आपल्या असण्याची कसलीही भीती न बाळगता पण लांबूनच छान फिरत असताना नजरेस पडतात. इथल जंगल प्रत्येक क्षणाला त्या जागेवरच वेगळं रूप दाखवत उभा असतो. त्यामुळे मेळघाटात आपण जेवढे दिवस रहातो त्यातला प्रत्येक दिवस आणि क्षण वेगळी अनुभूती आपल्याला देत असतो.

इथे भटकंती, फोटोग्राफी आणि निसर्ग अभ्यासकांची ये आणि जा नेहमीच चालू असते. शिवाय विविध अॉनलाइन माध्यमातून किंवा फोन वर परवानगी प्राप्त करून निसर्ग भटक्यांना मेळघाटात येता येतं. इंटरनेट द्वारे आणि तेथील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून योग्य ती माहिती सुद्धा उपलब्ध होते.

आपण आयुष्यात एकदा तरी या निसर्गरम्य 'मेळघाटात' येऊन जैवविविधतेचा अनुभव घ्यायला हवा...



# मॅजिकल मेळघाट एक विलोभनिय प्रवास वर्णन

नारायणी नि. चौधरी
इ. 11 वी
अकोला
✆:8263042479

मेळघाट मधे प्रवास मी अनेकदा केला आहे. किती वेळा ते सांगता येणार नाही. मेळघाट चे सौंदर्य माझ्या मनाला नेहमीच मंत्रमुग्ध करते आणि नकळत मेळघाटच्या प्रेमात पडते. मेळघाट मधे भेट देण्याची तीव्र ओढ नेहमीच असते. प्रस्तुत लेखात मेळघाटच्या या विविध प्रवास वर्णनांचा अनुभव लिहीता आहे. अकोल्याहून, अकोट वनविभागाचा प्रवेश व्दारा तुन प्रवेश केल्यावर वेगळ्याच विश्वात प्रवेश केल्याचा अनुभव येतो.

मला आठवतात ते मेळघाट चे दिवस मेळघाट हे अतिशय सुंदर मेळघाट व्याघ्र प्रकल्प (Melghat Tiger Reserve) आहे. ते सातपुडाच्या कुशीत विसावलेले आहे.

त्याच्या प्रत्येक ऋतुचा आनंद व सौंदर्य वेगळे आहे. पावसाळयात पाहटे पाहटे मधूर चिमण्याचा आवाज, हिरवगार रान, थंड वातावरण, सळसळणारी वारा, वाहण्याच्या धबधबाचा मधूर आवाज जणू आपण या वातावरणाच्या आधिन होतो.

तो मंचानवरचा अनुभव आणि ते मंचानवरून रात्री झाडावर दिसणारे काजवे अप्रतिम दृश्यचा अनुभव देतो. पावसाळात रस्तायावरून जातांना ते धुके मनाला आनंद देऊन जाते. आणि त्या धूक्याच सौंदर्य बघून आनंद गगनात मावत नाही.

मेळघाट मधले काही पॉईंटस जसे=

कोलकस, वेलकुंड, कोहा, कोकटू, धारगड, तारूबांदा, काद्रीबाबा, कुंड ही पॉईटस अतिशय मनाला आनंद देणारी आहे. जणू आपण स्वर्गात आलो आहो.

आपल्या रोजच्या जीवना पेक्षा वेगळे जग म्हणजेच मेळघाट.

या मेळघाटच्या सुंदर निसर्ग वर्णनाच्या आठवाणीतून मला कवितेच्या ओळी सुचतात.

मला आठवते ती रम्य पहाट
पानांचा सळसळाट
पाखरांचा चिवचिवाट
पाण्याचा खळखळाट
माती रानफुलाच्या दरवळाट आणि
धूक्यात हरवलेली पाऊलवाट...

मला आठवते ती रम्य पहाट
हिरव्या वनराईट धूके दाटले दाट
पाना फुलांतर दवबिंदूची पडसाद
कुठून दूरून येते वन्यजीवांची साद
मनामधे डोकावतो व्याघ्र थरथराट
असे हे माझे मॅजिकल मेळघाट
मला आठवते ती रम्य पहाट...




या निसर्ग सौंदर्य बरोबरच विविध वन्यजीव मेळघाटात आहे. या विविध प्रवासात आम्हाला हाय पॉईंट, कोहा व कुंड जवळ बिबटया, रक्षा गावाजवळ अस्वल, धारगड रोडवर कोल्हा, मोर आणि कोलकस जवळ गवा, चिखलदऱ्याजवळ रानडुक्कर, वैराट मधे सांबर, चितळ, भेंडकी आणि वाघाच्या पाऊल खुणा दिसल्यात.

मेळघाट मधे मुख्यते सागवान, वड, पिंपळ, अंबा, चिंच, जांभूळ हे वृक्ष व तसेच विविध प्रकारचे गवत, रानकेळी, रानफुले व विविध औषधी वनस्पती आढळले. मेळघाट मधे जास्तीत जास्त पानझडी चे जंगल आहे. या वनातून सिपना, तापी, गडगा, डोलार या नद्या वाहतात.

मेळघाट मधे मुख्यत्वे कोरकू ही आदिवासी जमात व गवळी लोक राहतात. आम्ही तारूबांदा मधे गेलो असतांना तिथे राहाणाऱ्या आदिवासी लोकाच्या गावात गेलो व घरात पण भेट दिली. घर मातीचे सारवलेले होते. समोरचे दार ठेंगणे होते. शेतातून आलेले धान्य ठेवण्यासाठी मातीची कोठी बनविली होती. त्याच्या घराची विशेषता अशी लक्षात आली कि उन्हाळयात त्या घरात थंड वाटते व हिवाळयात उबदार वाटते. कोरकू लोकांचे शेतात पण भेट दिली व शेती करण्याचे तंत्र बधितले हाताने बनवलेले शेतीचे अवजार बधितले.

आशा या मेळघाटची नेहमीच ओढ लागते. या मॅजिकल मेळघाट व माझे हृद्याचे नाते आहे. तर चला मग या स्वर्गासारखा मेळघाटचा आनंद घ्यायला.

# Sambar of Melghat

(The favorite food of Tiger)



अंगुल खांडेकर
मुर्तीजापुर
✆:9423051206




# अद्‌भुत जादुई मेळघाट

**'सौंदर्य'** अपरिहार्य आहे, सामान्य व्यक्ती त्याच्या मोहात पडल्यागत राहणार नाही आणि का बरे राहू नये...!! एकदा का त्या सौंदर्याची भुरळ पडली की, तुम्ही वेडेपिसे होणारच आणि असाच सौंदर्याचा एक अलौकिक, सोज्वळ, निर्मळ आणि प्रेमळ भाग म्हणजे मेळघाट.

मेळघाटचे जंगल हे फार विस्तृत व दाट असून उंच आणि गहन दरी-खोऱ्यानी आणि अनेक नदी-नाले... तृणभक्षक - मांसभक्षक - सर्वभक्षी अश्या प्राणी आणि पक्ष्यांनी... अनेक झाडे आणि औषधी वनस्पती... आदिवासी आणि त्यांची संस्कृती... किल्ले - मंदिरे - लेण्या अश्या इतिहासाचा वारसा जपून सार्वभौम व्यापलेले आहे.

निसर्गाला बघण्याचा दृष्टिकोन हा प्रत्येकाचा आपापला वैयक्तिक आहे परंतु माझ्या मते हाच दृष्टिकोन आपली वैचारिक दिशा ठरवतो. जसे भारतात साधरणतः तीन हंगाम (ऋतू) आहेत आणि तिन्ही ऋतूंचे वैशिष्ट्य हे अवलोकन करणाऱ्याच्या दृष्टिकोनात सामावलेले आहे. ह्या तिन्ही ऋतूंचा आस्वाद घेणारा म्हणजे निसर्गवेडा किंवा निसर्गप्रेमी संबोधूया.

चला तर आरंभ करूया आणि **किमयागार निसर्गालानमन** करून या जादुई मेळघाटचा उंबरठा ओलांडून आत शिरुया. हिरव्यागार झाडांचा पोषाख, फळ-फुलांचे आभूषण आणि हिरव्या गवतांचा गालिचा अशा नानाविध स्वरूपात नटलेला आपल्याच ऐटीत वाऱ्याच्या समवेत खेळणारा स्वछंद आणि पुर्णतः मुक्त श्वास घेणारा, स्वतःचे अस्तित्व उगवणार्या सूर्याच्या प्रकाशाएवढे कणखर सत्य आहे याचे प्रमाण कित्येकदा मानवाला देतो आणि सांगण्याचा प्रयत्न करतो की, त्याच्या कुशीत मिळणाऱ्या प्राणवायू व पाण्याचे स्रोत प्रत्येक सजिव-निर्जीव आणि बुद्धिवंत मानवाला जिवंत ठेवण्यासाठी रक्ताच्या पाटासारखे खडकरूपी नद्यांतून खळखळ वाहत राहतात. इतके उदार आणि विशाल मन असणारे हे जंगल आपला मायेच्या पदरासारखे सांभाळ करते आणि प्रेमाची उब देत राहते तेही कसलीही अपेक्षा न करता. पण जंगल म्हटले की, लहान मुलं ते मोठ्यांना ओढ असते ती जंगलात आढळणारे प्राणी आणि पक्षी बघण्याची. मग उशिर कश्याचा...!! हो हो त्या अगोदर जंगलांचे नियम आणि अटी-शर्ती आहेत तितक्या समजून घेऊ यात मग



दर्शनाला निघूया. जंगलाचा पहिला आणि शेवटचा नियम असा की इथे तुम्ही आत शिरल्यावर कोणत्याही प्राण्याला कसलाही नियम लागू होत नाही त्यामुळे आपण स्वतः स्वतःची काळजी आणि बचाव कसा करू शकतो हे शिकणे अत्यंत महत्वाचे आहे जेणे करून आपल्याला आणि कोणत्याही प्राण्याला किंचित सुद्धा त्रास होऊ नये कारण आपण त्यांच्या घरी पाहुणे आहोत ते आपले घर नाही. त्यामुळे जंगलात गेल्यावर वनविभागाने सांगितल्या प्रमाणे वागणे हेच नियम महत्वाचेअसतात. स्थानिक मार्गदर्शक आपल्याला वेळोवेळी माहिती देत राहतो ते अगदी निमूटपणे ऐकावेत.

जंगलबद्दल **आत्मीयता** असणे फार गरजेचे असते जेणे करून जंगलाची दिलेली हाक ही आपल्या श्रवणेंद्रियपर्यंत पोहचली पाहिजे, त्यासाठी आपली शरीरस्थिती नीट असणे, कोणतीही हालचाल आणि आपल्या बोलण्याचा गोंगाट नसावा प्रगाढ ईच्छाशक्ती, आपली वागण्याची वृत्ती यावर आपल्याला दिसणाऱ्या प्राण्याचे दर्शन अवलंबून आहे. ज्याप्रमाणे आपण आपल्या आवडीच्या किंवा प्रेम असणाऱ्या व्यक्तीबद्दल आदरभाव आणि प्रेम-जिव्हाळा दाखवतो त्याचप्रमाणे आपण दुरूनच प्राण्यांसाठी सौम्य असणे महत्वाचे असते.





जंगल म्हटले की **प्राण्यांचा नैसर्गिक अधिवास** आहे, त्यामुळे ते प्राणी वागतात कसे, राहतात कसे, सर्वात महत्वाचे जगतात कसे हे सर्वस्वी त्यांच्या दक्षतेववर अवलंबून आहे... तृणभक्षक प्राण्यांमध्ये जर आपण बघितले तर ते नेहमी सावधतेने-सतर्कतेने पाऊल टाकतात, त्यांचे कान सतत काही तरी ऐकत असतात आणि नाक काहीतरी हुंगत असतात, डोळे बारकाईने लक्ष ठेऊन असतात, आवाज इतरांना सतर्कतेचा इशारा देत असतात आणि पाय धावण्यासाठी सज्ज असतात इतके काळजी करणारे सूचक त्यांच्या जवळ आहेत पण जेव्हा त्यांना वानरांची साथ मिळते तेव्हा ते सुद्धा काही वेळेसाठी निष्काळजी होतात आणि मोकळेपणाने वागतात कारण वानरे ही हरिणांची फार जवळची मित्र आहेत ते झाडांवर बसून हरिणांसाठी झाडाची ताजी कोवळी पाने तोडून जमिनीवर फेकतात आणि झाडाच्या खाली असणारी हरिणे ती खातात हे दृश्य बघणारे नेहमीच अचंब्यात पडतात पण प्राण्यांमध्ये सुद्धा मैत्रीचे सुंदर बंधन असतात ते एकमेकांना सहकार्य करतात. झाडावर बसलेल्या वानराला वरून हरिणांच्या मागावर असलेल्या वाघ, बिबट आणि रानकुत्री यांची चाहूल लागताच तो त्यांना सतर्क करतो, सतर्क करतांना वानर जे आवाज काढते त्याला 'कॉलिंग' असे म्हणतात, ती ऐकल्यावर आपल्याला हे कळते की, आजूबाजूला कोणतातरी मांसभक्षक प्राणी आपल्याजवळ पास आहे. असे अनेक प्रकार आपण जंगलात गेल्यावरच आपल्याला बघायला मिळतात. नुसतं जंगलात जाऊन फक्त प्राण्यांना बघणं आणि त्यांची छायाचित्रे किंवा चित्रफीत काढणे या व्यतिरिक्त त्यांच्या जीवनशैली कशी आहे याची माहिती छायाचित्रे किंवा चित्रफीत यांच्या सहाय्याने मिळवणे हे महत्वाचे असू शकते. प्राण्यांची वैशिष्ट्ये म्हणजे त्यांना निष्काळजी होऊन चालत नाही त्यामुळे ती सतत स्थलांतर करत असतात, कारण असे न झाल्यास तो त्याच्या जीवाला मुकू शकतो म्हणून प्राणी मुख्यत्वे '**तृणभक्षक**' ही घोळक्यात-समुदायात राहतात जेणेकरून त्यांचा बचाव होईल. एका समुदायात एक नर आणि तीन ते चार मादया आणि त्यांची पिल्ले असतात, काही वेळा ती कमी किंवा जास्त पण असू शकतात

या विपरीत '**मांसभक्षक**' प्राणी हे एकटे राहतात, ज्यामध्ये वाघ आणि बिबट समाविष्ट आहेत. रानकुत्री आणि तडस ही समूहात राहण्यात आणि शिकार करण्यामध्ये विश्वास ठेवतात कारण ती एकटी पडली तर त्यांना शिकार मिळणे अवघड जाते आणि जगण्याला संघर्ष करावा लागतो. परंतु वाघ आणि बिबट हे दोघेही स्वतःच्या बळावर शिकार करतात, म्हणूनच यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे त्यामुळे सर्व प्राणी यांना भितात आणि यांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी जीव मुठीत धरून जगण्यासाठी धडपड करतअसतात. किती संघर्षमय आणि केवीलवाने जीवन आहे जंगलाचे, **"एक जगण्यासाठी प्रयत्न करतो तर दुसरा त्याचा जीव घेऊन स्वतः जगण्यासाठी प्रयत्न करतो"**.





**वाघ** आणि **बिबट** हे मांजर कुळातील प्राणी आहेत, हे फक्त समागमाच्या वेळेला एकत्र येतात. नंतर त्यांची मादा एकते पाच पिल्लांना जन्म देऊ शकते. पिल्लांना जन्म दिल्यावरत्यांचा सांभाळ करणे हे फार अवघड काम असते हे आपण तेव्हा समजू शकतो जेव्हा आपण त्यांना प्रत्यक्ष धडपड करतांना बघू शकू. पण ते आपल्यासारख्या सामन्यांना शक्य नसते त्यामुळे आपली विचारशक्ती ही केवळ आपल्या पूर्ती मर्यादित होऊन जाते आणि जगाला वाघांची आवश्यता कशासाठी आहे...!! वाघ का हवे आहेत...!! यावर आपण जास्त लक्ष देत नाही. पण वाघच कश्याला **'पृथीतलावर असणारे प्रत्येक प्राणी हे निसर्गचक्रात त्याची महत्वाची भूमिका पार पाडत आहेत त्यामुळे या सर्वांचा आदर आणि काळजी प्रत्येक एका मनुष्याने घेतलीच पाहिजे.'** असो यावर खूप मोठ्या मोठ्या यंत्रणा कार्यरत आहेत.पण वाघ या सर्वांच्या वर उच्चतम स्थानी येतो ज्याचे महत्त्व अधिकच वाढले आहे, कारण जंगलांचे प्रमाण कमी होत चालले आहे, मानव विकासात मानव स्वतःच्याच थडग्याची सोय लावत असल्यासारखे झाले आहे.

**"वाघ"** हा प्राणी फार लाजाळू पण न भिणारा निर्भीड आहे तो काही क्षणातच होत्याच नव्हतं करू शकतो परंतु मेळघाटात सहजच याचे दर्शन होईल असे नाही म्हणून त्याकरिता आपल्याला त्याला समजून घ्यावे लागेल. प्राणी हे आपल्या मागे स्वतःचे अस्तित्व असल्याचे पुरावे त्याच्या पायांच्या ठश्यांच्या द्वारे जमिनीवरील मातीवर नकळत सोडून जातात. काही वेळा त्यांची विष्ठा देखीलआपल्याला बघायला मिळते त्यावरून आपण अंदाज लावू शकतो की, तो कोणत्या दिशेने गेला आहे आणि केव्हा गेला आहे. आपण हा अंदाज जर अचूक लावण्यात यशस्वी झालो तर तो प्राणी दिसण्याचे शक्यता वाढते. आणि वाघाला बघायला गेल्यावर आपले कान, डोळे आणि नाक तीक्ष्ण असणे गरजेचे आहे. आणि अश्यात **"मेळघाटच्या वाघाचे दर्शन होणे म्हणजे दैवयोगच मानावा, मेळघाटचा वाघ हा अतिशय सशक्त आणि दणकट अश्या स्वरूपाचा पहाडी वाघ आहे. याची सुंदरता आणि दाहकता आणि दरारा काही औरच आहे."**

मेळघाटात नव्हे ते शक्य होत असते आणि निसर्गाचा एक अनोखा आणि विलक्षण अश्या लक्षणीय घडामोडी बघायला मिळतात. आपल्याला हे माहित झाले की वाघ हा एकटा राहतो पण कधी-कधी असेही बघायला मिळाले की, नर वाघ आणि वाघिण आणि त्यांची पिल्ले ही सोबत दिसतात म्हणजेच सर्व **कुटूंब** एकत्र दिसणे नवलच आहे, काही वेळा तर नर वाघ आणि पिल्ले सोबत असतात तो त्यांची काळजी घेतो आणि वाघिण त्यांच्या सोबत नसते. असे अनेक विलक्षण क्षण आणि वाघांचे अस्वाभाविकगुण आश्चर्यचकित करणारे आहेत त्यामुळे अश्या गूढ निर्माण करणाऱ्या अनाकलनीय गोष्टींचेकुतूहल मला नेहमीच राहणार आहे.

म्हणून कदाचित याला **"जादुई मेळघाट" (Magical Melghat)** हे नाव योग्यच असल्याचे वाटते.



अमोल सावंत
अकोला
✆:9822728823

# मेळघाटातील आधुनिक भागीरथ

मेळघाट म्हणजे जिथे घाटांचा मेळ होतो ते मेळघाट. निसर्ग संपन्न जैव विविधतेने समृद्ध असलेला या प्रदेशामधून अनेक गाव व शहरांना पाणी पुरवठा करणाऱ्या नद्यांचा उगम होतो. मेळघाट मध्ये सरासरी ९५० ते २५०० म.मी. वार्षिक पर्जन्यमान असून या पावसामुळे मेळघाटात खंडू, खापरा, गाडगा, डोलार व सिपना अशा प्रमुख पाच नद्या प्रवाहित होऊन त्या मेळघाटच्या पश्चिमेत्वर सीमेवरून वाहणाऱ्या पूर्व वाहिनी तापी नदीस जाऊन मिळतात. तापमान जास्तीत जास्त ४५ से.व किमान १२ से.इतके आहे. समुद्र सपाटीपासून या प्रदेशाची उंची ११७८ मीटर आहे.याच मेळघाटात वाघांच्या संवर्धनासाठी डी. २२ फेब्रुवारी १९७४ रोजी महाराष्ट्रातील पहिला व्याघ्र प्रकल्प कार्यन्वित झाला. आज सिपना, आकोट, गुगामल, व मेळघाट असे चार विभागाच्या माध्यमातून मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे संवर्धन, संरक्षण व व्यवस्थापन कार्य चालत आहे.

मेळघाटटात उन्हाळा, पावसाळा ही हिवाळा या तीनही ऋतूमध्ये सर्वात कठीण काळ तो उन्हाळाच्या. प्रंचड पाउस पडून गेल्या नंतर साधारणत: डिसेंबर-जानेवारी पर्यंत येथील नद्या -ओढे व नाल्यांमध्ये पाणी असत, मात्र फेब्रुवारी मार्च नंतर मेळघाटातील नद्या नाले सुखायला लागतात. पावसळ्यात दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या -नाले उन्हाळात मात्र कोरडे असतात. त्यामुळे येथील वन्यजीवांची पाण्यासाठी भटकंती सुरु व्हायची.एप्रिल, मे व जून मेळघाट व्याघ्र प्रकल्पासाठी अत्यंत कठीण काळ असायचा. पाण्याची उपलब्धता कमी त्यात वणव्यांची टांगती तलवार या दृष्ट चक्रात मेळघाट अनेक वर्षापासून अडकला होता.डोंगर दऱ्या असलेल्या भागामध्ये कुत्रिम पाणवठे तयार करायला पण मर्यादा होत्या. त्यामुळे दृष्ट चक्रातून बाहेर निघण्यासाठी दीर्घकालीन शाश्वत उपाय-योजना करणे गरजेचे होते.उन्हाळात पण मेळघाट व्याघ्र प्रकल्पाला "पाणीदार" करायचे म्हणजे निसर्गाने मानवाला दिलेले चालेंज होते.सन २०१७ मध्ये मा. श्री एम. एस. रेड्डी (भा.व..से.) यांना मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक तथा मुख्य वनसंरक्षक, अमरावती म्हणून पदभार स्वीकारला आणि त्याच वेळेला त्यांनी व त्यांचा मेळघाट टीमने मेळघाट व्याघ्र प्रकल्पला पाणीदार करण्याचा संकल्प केला.

संपूर्ण मेळघाट टीम युद्ध स्तरावर कामाला लागली. मेळघाटची भौगलिक परिस्थिती, उपलब्ध निधी व व्याघ्र संरक्षणाचे कडक नियम यांना डोळ्यासमोर ठेवून कामाची आखणी करायची होती.श्री. रेड्डी सरांना छोट्या-छोट्या प्रकल्पातून पाणी साठविण्याची योजना तयार केली. त्यासाठी त्यांनी मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वन मजुरापासून तर उपवन संरक्षकापर्यंत सर्वांना या पाणीदार मेळघाट, मिशन मध्ये सहभागी केले.कुठे छोटे बंधारे बांधता येतील, कुठे ना दुरुस्त



बंधारे आहे याची माहिती गोळा केली. सोबतच मेळघाट मध्ये रस्त्याचे नेटवर्क तयार करता रस्त्यात जे छोटे मोठे नाले लागायचे त्यावर सिमेंटचे रपटे बांधले हे रपटे पण विशिष्ट पद्धतीने बांधले.ज्या भागातून पाण्याचा प्रभाव वाहत येतो त्या भागात रपट्यांच्या लांबीची व साधारण २ फुटांची कोन्क्रीटची भिंत बांधली त्यामुळे पावसाळ्यात जास्त पाणी झाले कि या भिंतीवरून वाहून जायचे व जसा पाण्याचा प्रवाह कमी होत गेला कि त्या भिंतीला पाणी अडून राही. त्यामुळे तिथे छान छोटेसे तले तयार झाले, पावसाळ्यात त्यावरून पाणी वाहतांना फार मनोहरी दिसत होते. सफरीच्या वाटेवरील रपट्यावर त्र प्रतेक पर्यटक गाडी थांबवून या छोट्या नायगारा धबधब्याचे फोटो घेत. उन्हाळाच्या सुरवातीला या छोट्या बंधाऱ्याजवळ स्वर्गीय नर्तक, नाचण, निलपरी,सामन्य धीवर, खंड्या व कवड्या, धीवर असे पक्षी हमखास दिसतात.शांत थांबलेल्या पाण्यामध्ये डुबकी मारतांना खंड्या व स्वर्गीय नर्तक पाहतांना मन हरवून जाते.


सन २०१७ पासून सर्व विभागातील प्रत्येक रेंजमधील सर्व नद्या-नाले व ओढ्याचे सर्वेक्षण करण्यात आले. या मध्ये जिथे खळगाळ भाग आहे. पाण्याचा प्रवाह चीचोळ्या भागातून वाहतो वट्या भागात पाणी  जमिनीत मुरणार नाही अशा जागा निश्चित करण्यात आल्या.सन २०१८ मध्ये सेमाडोह रेंज निवडलेल्या जागावर मेळघाट बंधारे (सिमेंट प्लंग) पहिल्यांदा बांधण्यात आले. सिमेट कोन्क्रीट व लोखंडी सळ्यांचावापर करून नाल्याच्या प्रवाहात व खडकाळ भागात, उपलब्ध खडकांच्या साह्याने साधारणपणे २ फुट उंचीची आडवी भिंत बांधण्यात आली. या मेळघाट बंधारांच्या निर्मिती खर्च देखील कमी होता, २०१९ मधील उन्हाळ्यात मेळघाट बंधारयात पाणी साठलेलआढळले व मेळघाटातील पाणी साठविण्याचा पहिला प्रयोग यशस्वी झाला होता.या यशाने मेळघाट टीमचा उत्साह द्विगुणित झालाव सर्व मेळघाट व्याघ्र प्रकल्पात, काटेपुर्णा, ज्ञानगंगा अभयारण्य हे मेळघाट बंधारे कार्य युद्ध पातळीवर सुरु झाले.या बंधारांच्या महत्वाचा फायदा म्हणजे जो अवकाळी पाउस पडतो तेव्हा वाहून जाणारे पाणी या बंधाऱ्यात अडून राहते व वन्यप्राण्यांची तहान भागते. आज रोजी मेळघाट व्याघ्र प्रकल्पात, काटेपुर्णा, ज्ञानगंगा अभयारण्यत जवळपास ५,५०० मेळघाट बंधारे बाधण्यात आले आहेत.

ज्या भागत जमिनीत पाण्याची उपलब्धता आहे व जवळपास नदी नाले नाहीत अशा क्षेत्रात बोरवेल खोदुन सोलार लावून त्या आधारे एकावेळी तीन ते चार कुत्रिम पाणवठे भरण्याची व्यवस्था करण्यात आली. वन्यजीवांना सर्वत्र पाणी उपलब्ध झाले आहे. त्यामुळे उन्हाळ्यात पाण्याच्या शोधता वन्यप्राणी जंगलाच्या बाहेर जात नाही. या कारणानी मानव प्राणी     संघर्ष टाळल्या जातो आहे,

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे पूर्वीचे चित्र व आत्ताचे चित्र यामध्ये बराच फरक पडला आहे.आता मेळघाट पाणीदार झाले आहे.त्यामुळे वन्यप्राण्यांची संख्या वाढली आहे. त्यांचे दर्शन पण सहज होते. पूर्वी लोक मेळघाटात वन्यप्राणी आहेत, दिसत तर नाही अशा खोचक टीका करायचे. आज सफारीसाठी दुरून-दुरून लोक येतात व वन्यप्राणी पाहून सुखवतात. वन पर्यटनामुळे स्थानिकांना रोजगार प्राप्त झाला आहे.योग्य संरक्षण व जल व मृद संवर्धनामुळे मेळघाट आता जादुई मेळघाट म्हणून नवा रुपाला आला आहे.

आज मेळघाटच्या दुर्गम भागात सुद्धा इंटरनेट पोहचले आहे. त्यामुळे प्रत्येक रेंजचा व विभागाचा whatup ग्रुप आहे. या ग्रुपवर जंगलातील गस्ती, कार्यपद्धती याची माहिती देण्यात येते.संपर्क मध्यामाचा योग्य वापर मेळघाटात होतांना दिसत आहे.या रणरणत्या उन्हाळ्यात जेव्हा वनरक्षक व वनमजूर आपल्या भागात गस्त करीत असतात, तेव्हा त्यांचा भागातील त्यांनी बांधलेल्या मेळघाट बंधाऱ्याला ते भेट देतात. त्यात साठलेले पाणी बघून व पाण्याच्या अवतीभवतीमातीत उमटलेले वन्यप्राण्यांच्या पायांचे ठसे पाहून ते सुखवतात.मग त्या वनरक्षकाचा हात नकळत मोबाईलकडे जातो.व तो वन माजुरासोबत त्या पाण्याने भरलेल्या मेळघाट बंधाऱ्याचा सर्व माहिती सह एक सेल्फी घेतो व ग्रुप वर सेंड करतो, तो फोटो पाहून त्यांचे वरिष्ठांच्या चेहऱ्यावर समधानाची स्माईल येते व goodwork चा रिप्ल्याय त्या वन रक्षकाला येतो.ही शाबासकी मिळ्याल्यानंतर तो पण सुखावतो.मग ती सेल्फी पुढे अनेक मेळघाट प्रेमीच्या ग्रुप वर जाते वनमजुरापासून मुख्य वन संरक्षक पर्यंत सर्वाना ती सेल्फी म्हणजे रणरणत्या उन्हात मिळालेल्या सुखद गारवा असतो.

पुराणात भगीरथाने गंगा पुर्थ्वी वर आणून भारत सुजलाम सुफलाम बनविला तर आताच्या आधुनिक युगात  वन मजुरापासून तर क्षेत्र संचालकापर्यंत सर्व आधुनिक भगीरथांनी मेळघाटातील पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे रुपांतर छोट्या-छोट्या जीवनदायनी गंगेत करून व मेळघाटाला पाणीदार केले.त्यांचा या अथक प्रयत्नांना कोटी-कोटी प्रणाम.



वनाचे व वन्यजीवचे संवर्धन व संरक्षण करणारे
वन कर्मचारी चा धनदाट वनतील कुटीवर राहतात.
पार्तुडा वनसंरक्षण कुटी
मेळघाट व्याघ्र प्रकल्प

# वन है हमारी असीम धरोहर

**अभय चंदेल**
वर्तुळ अधिकारी
मेळघाट व्याघ्र प्रकल्प
✆: 9422890353

वन है हमारी असीम धरोहर
हम सब कर्तव्य निभाएंगे
वन्य जीवो का करेंगे संरक्षण
हम सब वृक्ष लगाएंगे,

वनराई की ठंडी छाँव मे
जीवन ज्योत जलाएंगे
विपदा मुक्त करेंगे धरा को
हम साथी हात बढाएंगे,

उंचे पर्वत वृक्ष पेड मा धरती के आभूषण है
रोको इनकी काँट-छाँट की बढ रहा प्रदुषण है
जंगल की सुरक्षा का हम मिलकर संकल्प उठाएंगे
मा भारती के लाल हम माटी का कर्ज चुकाएंगे,

भिन्न-भिन्न जाती जीवो की दुनिया से विलुप्त हुई
जंगल की जीवनगाथा जीव रक्तपात से युक्त हुई
हम सब वनसेवक अपना सेवाधर्म निभाएंगे
वन की आभा संकट मे है, मिलकर लाज बचाएंगे,

वन है हमारी असीम धरोहर
हम सब कर्तव्य निभाएंगे
हम सब वृक्ष लगाएंगे
हम वन की लाज बचाएंगे...



# निसर्ग अनुभव

**संदीप महादेवराव खंडारे**
वनरक्षक
मेळघाट व्याघ्र प्रकल्प
✆: 7218090470

या वनात या नभात गाणे गाऊ या
मेळघाटच्या जंगलात निसर्ग अनुभव घेऊ या.

बेधुंद वाहणाऱ्या नदयांचे हे पाणी,
गोड मधुर आवाजात पक्षांची ही गाणी,

चला या आनंदात निसर्ग खेळ खेळुया,
मेळघाटच्या जंगलात निसर्ग अनुभव घेऊ या.

पाऊलवाटेमध्ये फुलला मोरांचा पिसारा,
हिरवेगार वन हे, किती उंच हा डोलारा,

अमूल्य या वनसंपदेचे रक्षण करूया
मेळघाटच्या जंगलात निसर्ग अनुभव घेऊ या.

घनदाट जंगलात या आहे कुलाचा दरारा,
किल्ले, उंच दऱ्या आहेत त्यांचा निवारा,

वन्यप्राणी संरक्षणात योगदान देऊया,
मेळघाटच्या जंगलात निसर्ग अनुभव घेऊ या.

# प्राण्यांतील शैली

**श्री. एस.एस. सोळुंके**
वनरक्षक,
मेळघाट वन्यजीव विभाग

प्राण्यांची पण एक वेगळीच शैली असते
न बोलता ही समजेल अशी त्यांची भाषा असते

शब्दांचे पण त्यांचे असे एक अबोल कोडे असते
समजते त्यांनाच ज्यांचे नाव कोल्हे असते

त्यांच्या चालण्याची ही एक वेगळीच शैली असते
कारण त्यांना पावलो-पावली जीवाची भीती असते

काहींच्या चालण्यात पण रुबाबच असतो
कारण तो सर्वांचा बाप (वाघ)असतो

मोरांची पण एक वेगळीच ओळख असते
कारण त्याची सुंदरता मन मोहक असते

कुत्र्यांची पण एक वेगळीच दहशत असते
कारण एकीच बळ त्यांचा रक्तात असते

आवाजात पण तिच्या एक वेगळीच जादू असते
कारण तिचे नाव कोकिळा उर्फ कवी असते

# काटेपूर्णा

**श्रीराम कुरवाडे**
वनमजूर
अकोला
✆: 9881765820

काटेपूर्णामध्ये विज वाकून नाचते
आकाशात मेहा नगारे वाजविते.
कोकीळांची गाणी ऐकली सगळयांनी
आनंदात होते तेव्हा वन्यप्राणी
मग वानरांनी जल्लोष केला.
आरती ओवाळा म्हणे मेघराजाला
थेबांचे स्वागत मुक्या प्राण्यांनी केले
गहिवरून मेघराजे बरसले.
मेघांचे पाणी  आणा उजेड विजांचा
सुवर्ण उत्सव म्हणे मुक्या प्राण्यांचा
उत्सवात सहभागी डोंगरराजा
थेंबे थेंबे पावसा गर्जना त्यांची
मान्सुचा वारा होता एवढा गार
फांद्यावर करूनी नाचती झाड
मग मोर आले सगळे मिळूनी
नाचतील किती म्यावू म्यावू करूनी
काटेपूर्णा, माई आहे पोशिदी सगळयांची
खर सांगतो वाणी आहे टकाचोरांची
सळसळा करूनी नाचे बाबुंची झाडे
शेजारची चिचं मावशी आरती ओवाळे
पाण्याचे स्वागत असे मुक्या प्राण्याने केले
प्राण्यांसाठी पाणी मेघराज आले.
प्राण्यांसाठी पाणी मेघराज आले...

# प्रिय वनरक्षकास

**पियुषा जगताप**
उपवनसंरक्षक
मेळघाट वन्यजीव विभाग
✆: 9552355707

**तुझ्यासाठी असेल ते**
**वन जमिनीवरील अतिक्रमण,**
किवा शिकारीसाठी घातलेला घाट
तोडलेली झाडे किवा विनाशाची वाट
घोटीव रस्ते, इमारती,धरण
दुभत्या म्हशीसाठी चराई, कुरण
वन प्राण्यांचा संपणारा अधिवास
जंगलांचा माणसाने चालवलेला सततचा ऱ्हास..
कुणासाठी असेल तो एक जमिनीचा तुकडा
झाडं साफ करून पेरलेले परीश्रम
भुकेसाठी शिकार हा नित्याचाच कर्म
चुलीसाठी लागणारे लाकूड, फाटा
कागद, फर्निचर,घरासाठी विटा
शहराकडे जाण्याचा एकमेव रस्ता
ताहनलेल्या पिकांसाठी पाण्याचा वास्ता...
तुला पडतील प्रश्न, मनात होतील द्वंद
भरावे माणसांचे पोट
कि वांधावी जंगलाची मोट
माणूसपण येईल उफाळून
कर्तव्य जाईल झाकोळून
तेव्हा, मरण पावलेल्या त्या हरणीला आठव
जवळ उभ्या तिच्या पाडसाचे डोळे मनात साठव..
माणसासाठी बोलणारी माणसं हजारो आहेत
पण यांच्यासाठी भांडणारा तूच एक आहेस.
तूच एक आहेस !!!

# मृगजळ

**एस.एस.धवसे**
वनरक्षक
मेळघाट व्याघ्र प्रकल्प
✆: 9307960400

तहानलेले कासावीस मृग
सैरावैरा धावत होते
उन्हाच्या दिवसात निखाऱ्यात लोळत होते
ओल्याव्यचा पाठलाग करीत
कित्येक मैल चालत होते
पाण्याच्या थेंबासाठी आयुष्य
आपले वेचत होते
रखरखत्या उन्हात
अंगाची होळी होत होती
तरीसुद्धा पाडसाची टोळी
धावत होती
कुठेतरी हरणीला पाणी
दिसले होते
सोबतच कंठातले प्राण
जात होते
जिकडे पहावे तिकडे
पाणी उथळ
होत होते
डोळे मिटल्यावर कळाले
ते तर मुर्गजळ
पाणी जपा वने वाढवा
वन्यजीव आपले मित्रच
झाडे, वन्यजीव
जंगल दाखवा

अनुप पुरोहीत
अमरावती.
✆: 9766616379

डोंगर दऱ्यांनी सजला साज जंगलाचा
प्रत्येक ऋतूत निराळा बाज त्याचा
पशु पाखरे लता झाडे यांची असे संगत
ह्या सगळ्यां सोबत राहण्याची आहे खरी गंमत
चौफेर धगधगती ज्वाला,
ऊष्णतेचि ही काया
मृगास हिरवे गवत न बसण्यास छाया
आटले तळे,
मृगजलाचा भास, तृष्ण तृप्तीची आस
ऋतू हा रुक्ष तरी शोभा याची खास
आल्या आल्या सरी,
घालून हिरवा शालू धरा सजली
ऐका झऱ्यांची मधुरवाणी,
कधी विद्‌युल्लता शीळ घाली
दाट धुके पसरले,
नभ धरा जसे मिठीत भासे
उन सावल्यांचा खेळ चाले या श्रावण मासे
नका भिऊ कोणी ऐका पाखरांची गाणी
सोबतीला त्यांच्या खिदळत नद्यांचं पाणी
वाट वळणाची जरा अडचणींची
घाटांच्या वाटेला साथ दऱ्यांची
खिळवून टाकते हे सुंदर वन
असे मेळघाट निसर्ग निर्मित नंदनवन
निसर्ग निर्मित नंदनवन।

## मी सुध्दा रंक्षक


डॉक्टर व पोलिसांचे तर
योगदान आहेच महान
पण वनविभाग कर्मचाऱ्याची
सेवा ही नाही लहान।।

लॉकडाऊन असून ही
देत आहेत आपली सेवा
शासनाचे म्हणणे आहे
आत्यावश्यक सेवा सुरु ठेवा।।

त्यांच्यामुळेच आज राज्यात
सुरु आहेत वनांचे संरक्षण
कोणी ही करीत नाही
त्याचे परीक्षण।।

ना जाण्यास वाहन ना सरंक्षण
तरीही पोहोचतात कर्तव्यावर
खडतर सेवा देत आहेत सारे
उदार होऊन आपल्या जीवावर

आपल्या समस्त वन अधिकारी
व कर्मचारी बंधू व भगिनींचे करतो
हार्दिक अभिनंदन



आभार फेसबुक

Lokmat Times

Nagpur First
Page No. 5 Feb 12, 2020
Powered by: erelego.com

# Tribals from computer centre in MTR pass MH-CIT exam with flying colours

**LOKMAT NEWS NETWORK**
**AMRAVATI, FEB 11**



APCCF and field director of Melghat Tiger Reserve M S Reddy addressing the students at computer training centre at Harisal in Amravati district.

The computer training centre was inaugurated at the hands of field director of Melghat Tiger Reserve (MTR) and additional principal chief conservator of forests at Harisal in Melghat. The centre provides computer free training to youths and school children required for government, semi-government and other sectors.

Around 70 aspirants had applied for three month training batch out of which 24 boys and 14 girls were selected. Full time teachers were appointed by Melghat Tiger Conservation Foundation for training these participants on handling of computers, MH-CIT and others. After completion of three month training, these students appeared for government MH-CIT exam and 99 per cent of them cleared the exam. Amit Bhilawekar got 99 per cent marks while Mamta Jagtap got 98 per cent marks. 17 students secured more than 90 per cent marks while remaining students got 75 per cent to 90 per cent marks. All students are enthusiastic and gave credit of their success to APCCF M S Reddy. They also thanked deputy conservator of forests Vinod Shivkumar, ACF Patwai, range forest officers Dipali Chavan and Suhas More, trainer Roshan Pandole, forest guard Jyoti Bisen and Gopal Moyine.

According to livelihood expert Prafulla Sawarkar, 70 youths have applied for next batch which will begin soon.

Lokmat Times

Nagpur First
Page No. 5 Dec 31, 2019
Powered by: erelego.com

# Driving training for Melghat youths begins

**LOKMAT NEWS NETWORK**
**AMRAVATI, DEC 30**



The forest officials of Melghat Tiger Reserve and villagers during opening of four-wheeler driving training programme at Hatru village in Amravati district.

The vehicle driving training in Hatru village coming in Melghat Tiger Reserve was inaugurated at the hands of deputy conservator of forest Dr Shivbala of MTR. The four wheeler driving training will be given for the development of youths in Hatru and Jarida Range Forests and 79 youths have got registered themselves for the same.

The objective behind this training is that youths from tribal and other communities face many difficulties in getting this training. For the benefit of these youths, additional principal chief conservator of forests and field director of MTR M S Reddy took initiative in starting four wheeler driving centres at Hatru and Jarida. As these villages are connected with other tribal villages, youths from there have also got registered for free training. Their training fee will be paid by Melghat Tiger Conservation Foundation. The youths after completing this training will get permanent driving permits and they will be able to get jobs. In his address, DCF Shivabala explained objective behind starting of this training to villages and youths. He said that this training was possible due to tigers in Melghat. He said, "Four wheeler driving training has been started from funds received under Human Development Programme and Skill Development Programme of District Planning Committee, Amravati.Tiger is main centre of forest and this free training is available due to tigers only."

The youths from villages also said that they needed such training and it would give them new avenues of employment. They thanked MTR for providing this opportunity for their better future.

Livelihood expert Prafulla Sawarkar made introductory remarks and proposed a vote of thanks. Deputy chairperson of Chikhaldara Panchayat Samiti Nanakram Thakre and sarpanch of Hatru village Kalu Belekar were present as chief guests. Assistant conservator of forests Prafulla Nirmal was also prominently present. The programme was organised by range forest officer Amit Shinde and his team and was attended by villagers and youths in large numbers.

लोकमत
Hello Amravati
Page No. 3 Apr 12, 2020
Powered by: erelego.com

# कोरोना : वाघाचा दवाखाना सज्ज

## वाघासह वन्यजिवांचा स्वॅब घेण्याची सोय । ऑक्सिजन सिलिंडरसह औषधी उपलब्ध

अनिल कडू ।
लोकमत न्यूज नेटवर्क

परतवाडा : कोरोना विषाणूच्या अनुषंगाने परतवाड्यातील वाघाचा दवाखाना सज्ज ठेवण्यात आला आहे. अमरावती विभागातील हा एकमेव दवाखाना आहे.

या दवाखान्यात उपचारार्थ दाखल होणाऱ्या वाघ, अस्वल, बिबट, हरिण यासह अन्य वन्यजीवांचे नोज, थ्रोट स्वॅब घेण्याची सोय आहे. गरज भासल्यास कोविड-१९ च्या अनुषंगाने हे नमुने मध्य प्रदेशातील भोपाळ, हरियाणातील हिसर आणि उत्तर प्रदेशातील ॲनिमल हेल्थ इन्स्टीट्यूटमध्ये पाठविले जातील. देशपातळीवर या तीन संस्था मान्यताप्राप्त आहेत.

दवाखान्यात ऑक्सिजन सिलिंडर तैनात ठेवले आहे. वन्यजीवांची रोगप्रतिकारशक्ती वाढविण्याकरिता 'व्हिटॅमीन सी'च्या इन्जेक्शनसह मल्टी व्हिटॅमीनचे इन्जेक्शन आणि औषधी उपलब्ध आहेत. वन्यजीवांना क्वारंटाईन करण्याकरिता आयसोलेशन वॉर्ड म्हणून सात पिंजरे तैनात केले आहे. निर्जंतुक पिंजऱ्यातील एक पिंजरा वाघाकरिता, एक बिबट, एक अस्वलीकरिता, दोन माकडांकरिता व एक हरणाकरिता ठेवण्यात आला आहे.



परतवाड्यात वाघाच्या दवाखान्यातील आयसोलेशन कक्ष असे सज्ज ठेवले आहे.

बाहेरच्या व्यक्तीला, वनकर्मचाऱ्यांना प्रवेश बंद केला आहे. वन्यजीव उपचारार्थ दवाखान्यात उपचारार्थ आणणाऱ्याला बाहेरच थांबवून त्या प्राण्याला बाहेरूनच स्वतंत्र पिंजऱ्यात घेण्यात येईल. कोरोना विषाणूचा धोका आणि अमेरिकेतील प्राणी संग्रहालयात ठेवलेल्या वाघाला कोरोनाची बाधा बघता या दवाखान्याला (ट्रान्झिस्ट ट्रिटमेंट सेंटरला) पूर्णत: सॅनिटाईज केले आहे. संपूर्ण ऑपरेशन थेटरचे फ्युमिगेटरच्या सहाय्याने निर्जंतुकीकरण केले जात आहे.

दवाखान्याच्या दोन्ही प्रवेशद्वारावर स्वतंत्र फुटपाथ ठेवले आहे. वन्यजीवांकरिता आयसोलेशन वॉर्ड म्हणून निर्जंतुक पिंजऱ्यात उपचारार्थ ठेवलेल्या वन्यजीवांवर चार सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून पशुवैद्यकीय अधिकारी लक्ष ठेवणार आहेत. औषधोपचारादरम्यान होणारे बदल या कॅमेऱ्याच्या माध्यमातून नोंदले जाणार आहे. दवाखान्यात मास्क व ग्लोव्ज बंधनकारक आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्प अपर प्रधान मुख्यवनसंरक्षक एम.एस. रेड्डी यांचे मार्गदर्शनात मेळघाट व्याघ्र प्रकल्प, टिपेश्वर अभयारण्य आणि ज्ञानगंगा अभयारण्यातील वाघ आणि वन्यजीवांवर कॅमेरा ट्रॅपच्या माध्यमातून क्षेत्रीय वनकर्मचारी व अधिकारी लक्ष ठेवून आहेत.

दैनिक आनंद नगरी
Thursday 2020/02/20

# बाप रे बाप स्थानिक गुन्हा शाखेने पकडले तीन मांडूळ साप;आता नवीन अध्याय झाला सुरु

नांदेड (प्रतिनिधी) - मटका,जुगार,अवैद्य पकडून अत्यंत जोरदार कामगिरी करणाऱ्या नांदेड जिल्ह्याच्या स्थानिक गुन्हा शाखेने आता आपल्या अभिलेखात नवीन अध्याय जोडला आहे.मांडूळ जातीचे तीन सॉप पकडले आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार या तीन मांडूळांची किंमत ४ लाख ५० हजार रुपये आहे.

स्थानिक गुन्हा शाखेच्या भारदस्त पथकाचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांनी काढलेल्या गुप्त माहिती आधारे आज आसना नदीकाठी काही लोक साप विक्री करण्यास येणार होते.पोलीस अधीक्षक विजयकुमार मगर आणि अपर पोलीस अधीक्षक दत्ताराम राठोड यांच्या कुशल मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर,सुनील नाईक,सहायक पोलीस उप निरिक्षक चव्हाण, पोलीस जमादार भानुदास वडजे, मारोती तेलंग, दिनानाथ शिंदे,दशरथ जांभळीकर, विष्णु इंगळे, तानाजी येळगे, देवा चव्हाण, बजरंग बोडके, विलास कदम, राजु पुलेवार यांचे अत्यंत जाणकार पोलीस पथक सांगवी,आसना नदीकाठी पाठवण्यात आले.तेथे पोलिसांनी भिमराव उर्फ संतोष पुजाराम बि-हाडे (२९ ),रा.कापला ता.हिमायतनगर जि. नांदेड, ह.मु. संतोष अप्पा नागझरे यांचे घरी छत्रपतीनगर, रांजनगाव (शेनपुंजी) ता.गंगापूर जि.औरंगाबाद, शेख सलमान शेख आजीम (२४) रा-टाटीगुडा साईबाबा मंदिराजवळ, वार्ड-२३, आदिलाबाद (तेलंगाणा)



सय्यद मुसा सय्यद ईसुफ (४२) रा.सय्यद किराणा व घरकुल बिल्डींग जवळ, तेहरानगर नांदेड, अजमतखान समंदरखान पठाण (५० ) रा. माजलगांव जि. बिड,या चार जणांना ताब्यात घेतले. पकडलेल्या मांडूळांची किंमत ४ लाख ५० हजार रुपये आहे असे प्रेस नोट मध्ये लिहिलेले आहे.मांडूळ जातीच्या सापांचा उपयोग अंधश्रध्देत सुद्धा केला जातो.यातील दुतोंडी तोंडी साप कोटींच्या किमतीत विक्री होतात अशी खात्रीलायक माहिती आहे. या प्रकरणात पंटर जो कोणी आहे त्याने निभावलेली भूमिका सर्वात मोठी आहे. आता नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या अभिलेखात नवीन साप पकडण्याचा अध्याय जोडला गेला आहे. पुढील कायदेशिर कार्यवाहीसाठी वन विभागाच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

लोकमत
Hello Amravati
Page No. 3 Apr 10, 2020
Powered by: erelego.com

# मेळघाटात कोरकू भाषेत जनजागृती

## व्याघ्र प्रकल्पाचा प्रयत्न : कोविड-१९ विषाणूशी शासनाचा लढा

लोकमत न्यूज नेटवर्क

परतवाडा : मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत मेळघाटातील आदिवासी गावांमध्ये कोरोनाच्या अनुषंगाने कोरकू भाषेत जनजागृती केली जात आहे.

व्याघ्र प्रकल्पातील अधिकारी व कर्मचारी गावागावांत जाऊन कोविड-१९ विषयी माहिती देऊन आदिवासींना जागृत करण्याचा प्रयत्न करीत आहे. वन आणि वाघांचे संवर्धनासोबतच स्थानिक गावकऱ्यांविषयी आस्था बाळगून सामाजिक बांधिलकी यात त्यांनी जपली आहे.

कोरोना व लॉकडाऊनच्या अनुषंगाने त्या आदिवासी बांधवांना त्यांच्याच भाषेत जंगलात न जाता घरातच राहण्याचे आवाहन केले जात आहे. वन व वन्यजीव कायद्यासह



आदिवासीबहुल भागात कोरोनाविषयी जनजागृती करताना अधिकारी, कर्मचारी

आपत्ती व्यवस्थापन कायदा आणि संचारबंदीतील नियमांचे उल्लंघन होणार नाही, याकरिता सतर्क राहण्याच्या सूचनाही ग्रामस्थांना देत आहेत. कोरकू भाषेसोबतच मराठी व हिंदी भाषेतूनही जनजागृती केली जात आहे. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक एम. एस. रेड्डी यांच्या मार्गदर्शनात मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत चिखलदरा, ढाकणा, तारुबांदा, हरिसाल, अकोला वन्यजीव विभागांतर्गत ज्ञानगंगा, काटेपूर्णा, कारंजा सोहळ अभयारण्य व वनपरिक्षेत्रातील गावांमध्ये वन कर्मचारी जनजागृती करीत आहेत. गावकऱ्यांचा याला प्रतिसाद मिळत आहे.

# Coronavirus: MTR supplies masks, soaps to front line staff

■ Special Correspondent

MELGHAT Tiger Reserve (MTR) has taken an initiative in distributing facial masks for every field staff member, including daily wagers and fire watchers and to provide soaps and handwash to protection camps, fire watchers camps, wireless stations, offices and other establishments of forests where staff members stay, as part of protecting them from coronavirus pandemic.

M S Reddy, Addl Chief Conservator of Forest and Field Director, Melghat Tiger Reserve, Amravati, said that many Deputy Conservators of Forest/Divisional Forest Officers have already supplied masks and handwash, sanitisers to field staff. So far, the officials distributed 1,688 masks and 606 soaps to front line staff members from Chikhaldara, Dhakna, Harisal, Tarubanda, Jarida, Chaurakund, Hatru, Raypur,



Field Staff members seen by wearing facial masks given to them through Melghat Tiger Conservation Foundation.

Semadoh, Sankul forest ranges plus to office staff. The materials are being supplied through Melghat Tiger Conservation Foundation as part of taking care of the staff to protect them from COVID 19. Reddy asked officers to ensure that each and every staff member gets these masks and other materials without fail in the next two days. He is also planning to give ration worth Rs 1000 to every guide from foundation budget. Some guides also agreed for this donation in kind.

Meanwhile, tourism activity is closed in Melghat till April 30 to reduce man wildlife contact.

# करोनाच्या लढाईत मेळघाट व्याघ्र प्रकल्पाची तयारी अव्वल

## इतर व्याघ्र प्रकल्पांसाठी मार्गदर्शक

लोकसत्ता खास प्रतिनिधी

नागपूर : वन्यप्राण्यांच्या अधिवासाला करोनाची झळ पोहचू नये म्हणून मेळघाट व्याघ्र प्रकल्प प्रशासनाने विविध स्तरावर केलेल्या उपाययोजनांचा 'पॅटर्न' राज्यात सर्वोत्कृष्ट ठरला आहे. वन्यजीव आणि जंगलाच्या सुरक्षेसह, त्यांचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षेच्या सर्व उपाययोजना इतर व्याघ्र प्रकल्पांसाठी मार्गदर्शक ठरणाऱ्या आहेत.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या अकोट, गुगामल, सिपना, मेळघाट, अकोला, पांढरकवडा या वन्यजीव विभागासह अमरावती येथील अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेकरिता सुमारे तीन हजार ६७८ मास्क, ३७९ सॅनिटायझर आणि ९३६ साबणांचे वाटप करण्यात आले.

### 'फायर सेल' तयार केले

उन्हाळ्यात जंगलाला लागणाऱ्या आगी आणि वन्यप्राण्यांना त्याची झळ पोहचू नये म्हणून 'फायर सेल' तयार करण्यात आले आहे. या विभागामार्फत उपग्रहाद्वारे मिळणाऱ्या माहितीच्या आधारे अद्ययावत नकाशे तयार करण्यात येतात. जंगलात लागलेल्या आगीची माहिती तात्काळ क्षेत्रीय कर्मचाऱ्यांपर्यंत पोहचवली जाते. पाण्याअभावी वन्यप्राणी बाहेर पडू नये म्हणून जंगलातील सर्व पाणवठ्यांची दररोज तपासणी करण्यात येत आहे.

या व्याघ्रप्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये स्थानिक भाषेतून जनजागृती अभियान राबवण्यात आले. तब्बल २१३ गावांमध्ये ही जनजागृती करण्यात आली. सुमारे ५० गावांमध्ये २७ हजार ३७८ मास्क आणि आठ हजार १८९ साबणांचे वाटप करण्यात आले. या गावांमध्ये विविध गैरशासकीय संस्थांच्या मदतीने किराणा वाटप करण्यात आले. गुगामल वन्यजीव विभागातील हरिसाल, मंगीया, रोरा आदी गावातील २५० आदिवासी कुटुंबांना प्रती कुटुंब ८०० रुपयांचा किराणा वाटप करण्यात आले.

हरिसाल व आमझरी येथील महिला शिलाई केंद्रामार्फत सुमारे ११ हजार मास्क तयार करण्यात आले. त्यासाठी वनविभागाने त्यांना कापड उपलब्ध करून दिले. त्याची खरेदी व्याघ्र प्रकल्प प्रशासनाने केली आणि गावकऱ्यांना त्याचे मोफत वाटप करून दिले. सिलेंडर संपले म्हणून सरपणासाठी गावकऱ्यांनी जंगलात जाऊ नये म्हणून सुमारे १५४ कुटुंबांना मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानमार्फत एलपीजी सिलेंडरचा पुरवठा करण्यात आला. करोनाच्या पार्श्वभूमीवर टाळेबंदी करण्यात आल्याने पर्यटन बंद झाले असून त्याचा परिणाम पर्यटक मार्गदर्शकांच्या उपजीविकेवर झाला आहे. त्यांची उपासमार होऊ नये म्हणून १३० पर्यटक मार्गदर्शकांना एक महिन्याचा किराणा वाटप करण्यात आला. दुर्गम भागातील १६२ संरक्षण कुटी व तपासणी नाक्यावरील स्थानिक रोजंदारी मजुरांना किराणा वाटप करण्यात आले.

करोनाच्या संसर्गाचा धोका लक्षात घेता क्षेत्रीय कर्मचाऱ्यांसाठी सेमाडोह, हरिसाल व ढाकणा येथे वैद्यकीय तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. यात २५० क्षेत्रीय कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

लोकसत्ता Thu, 23 April 2020
https://epaper.loksatta.com/c/51229368

नियंत्रणाकरिता लोकसहभाग आवश्यक : रायपूर, बोराट्याखेडा ठरले उत्तम उदाहरण

लोकमत

# मेळघाटातील वणव्यावर 'सॅटेलाईट'ने लक्ष ठेवले जाणार

लोकमत न्यूज नेटवर्क



वनविभागातर्फे ग्रामस्थांना वनसुरक्षेच्या दृष्टीने बक्षीस देण्यात आले, तो क्षण.

परतवाडा : मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचा अतिसंरक्षित जंगलांमध्ये दरवर्षी उन्हाळ्यात वनवणवा पेटतो. ते थांबवण्यासाठी स्थानिक लोकसभाग आवश्यक असून, सिपना वन्यजीव विभागांतर्गत बोराट्याखेडा व रायपूर परिसरात ६० दिवसांत आगीची एकही घटना घडली नाही. लोकसहभागाचे ते एक उत्तम उदाहरण ठरले आहे. दरम्यान मेळघाटातील वणव्यावर 'सॅटेलाईट'ने लक्ष ठेवले जाणार आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या ८३९ चौरस किलोमीटर क्षेत्रावर सिपना वन्यजीव विभागाचे क्षेत्र आहे. त्यापैकी ७९३ चौरस किलोमीटर वनक्षेत्र आहे. त्या भागात चराई करणे, मोहफुले वेचणे, तसेच द्वेषभावनेतून वणवासारख्या मोठ्या घटना घडल्याचे अनेकदा उघडकीस आले आहे. हा वन वणवा लोकसहभागाशिवाय नियंत्रणात आणणे शक्य नाही. गतवर्षी सिपना वन्यजीव विभागात वन वणव्याच्या २१८ घटना घडल्याची नोंद आहे. त्यामध्ये २२०६ हेक्टर क्षेत्र जळून राख झाले. हे मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या एकूण क्षेत्राच्या २.७८ टक्के क्षेत्र आहे.

वनवा नियंत्रणात आणण्यासाठी शासनाच्या विविध योजना आहेत. त्यानुसार सिपना वन्यजीव विभागामध्ये ग्राम परिस्थिती विकास समितीची आढावा बैठक घेण्यात आली. त्यामध्ये परिसरातील आदिवासींनी मोठ्या प्रमाणात सहभाग दर्शविला. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन योजनेअंतर्गत गाभा क्षेत्रात १५ फेब्रुवारी ते १५ एप्रिलपर्यंत वन वणव्याची एकही घटना न घडल्यास १० हजार रुपये, १५ फेब्रुवारी ते १५ मेपर्यंत वणव्याची घटना न घडल्यास ३० हजार रुपये, तर १५ फेब्रुवारी ते वन हंगाम संपेपर्यंत एकही न घटना घडल्यास ६० हजार रुपये, असे बक्षीस घोषित करण्यात आले आहे.

**बोराट्याखेडा, रायपूरचे ग्रामस्थ सहभागी**

- सिपना वन्यजीव विभागाच्या रायपूर परिक्षेत्रातील बोराट्याखेडा व रायपूर या गावांनी व्यापक प्रतिसाद दिला. ही दोन्ही गावे अतिसंरक्षित क्षेत्रात आहेत. गावारोजारी जंगलामध्ये उन्हाळा सुरु झाल्यापासून १५ एप्रिलपर्यंत एकही आगीची घटना घडली नाही. आगीपासून जंगलाचे संरक्षण करण्याचे काम लक्षात घेता या दोन्ही गावाच्या ग्रामस्थांना प्रत्येकी दहा हजार रुपयांचा धनादेश वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी दिला.

**असे ठेवले जाते आगीवर नियंत्रण**

- फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया (नासा) या वेबसाईटवर क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचे प्रमाण नोंदविण्यात आले आहे. सिपना वन्यजीव विभागांतर्गत पाच परिक्षेत्रात मोक्याच्या १७ ठिकाणी आग निरीक्षण टॉवर लावले आहेत. आगीवर नियंत्रण ठेवण्यासाठी बिनतारी संदेश यंत्रणा कर्मचारी तैनात आहेत. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रसंचालक उपवनसंरक्षक शिवाबाला, वनपरिक्षेत्र अधिकारी व क्षेत्र कर्मचारी लक्ष ठेवून आहेत

# 'Walker' C-1 tiger from Tipeshwar finally settles down in Dhyanganga

■ The radio collared tiger covers 3,020 km in 13 months ■ Collar removed using remote drop-off option on March 28

**LOKMAT NEWS NETWORK**
**NAGPUR, APRIL 1**

As a part of the tiger dispersal project titled 'Studying Dispersal of Tigers Across The Eastern Vidarbha Landscape, Maharashtra' of Wildlife Institute of India, Dehradun, a sub-adult male tiger C-1 nick named 'Walker', one of the three cubs of T-1 tigress was radio collared on February 27, 2019 at Tippeshwar Wildlife Sanctuary in Yavatmal district.

The cub was radio-collared to study the dispersal of the tigers in the Eastern Vidarbha Landscape. When the animal was captured for radio collaring, it had a wire snare around the abdomen which was hindering the movement and normal growth of the animal.

The snare was removed and injuries of the animal were treated. The animal recovered over a month and regained health after which he began dispersing.

According information received, the tiger continued to use the forest area of Tippeshwar Wildlife Sanctuary till the inception of monsoon - June 2019. During this period, he extensively explored the wildlife sanctuary but could not find a suitable free unoccupied area to settle. Finally on June 21, 2019, the tiger started dispersing out of Tippeshwar Wildlife Sanctuary and since than it had traversed through two states and eight districts of Maharashtra. The big cat was jointly tracked by Maharashtra forest department and Wildlife Institute of India, Dehradun teams through GPS satellite tracking and VHF ground tracking. The tiger had moved through different forested areas including protected areas like Painganga Wildlife Sanctuary and other territorial forests and corridor areas. On November 29, moving through human dominated landscape including agriculture



Lokmat Times

fields and canals, it finally managed to enter another protected area namely Dnyanganga Wildlife Sanctuary in the Buldhana district. Currently, his home-range includes the sanctuary and forested areas outside the sanctuary.

Since the radio-collaring in February 2019, the tiger was tracked for 13 months and received a total of 6240 GPS locations. The tiger has established its territory in the sanctuary and adjoining area. The battery of the collar was almost drained and was at its last level. Considering the battery issues and risk of collar getting tight around the neck in the coming days, a decision was taken to remotely remove the collar using remote drop-off option. The collar was finally removed on March 28, 2020 inside the Dnyanganga Wildlife Sanctuary.

Till November 5, 2019, the tracking teams had received received 5049 locations from the collar. After November 2019 till March 2020, 1191 additional locations were receive. Based on movement behaviour, the animal was found to be using Dnyanganga Wildlife Sanctuary as a core habitat and surrounding forest areas as a buffer to exploit the landscape.

Over the time the animal has achieved all the skills to survive and avoid humans. The animals has also been found to have normal predation pattern in the sanctuary.From the date of collaring till March 28, 2020, the tiger (C1) traversed a distance of 3020 km. Presently, an area of 52 sq km is being intensively used by the tiger inside the sanctuary.

On March 31, 2020, a report in this regard was submitted to the principal chief conservator of forests (wildlife) and chief wildlife warden of Maharashtra Nitin Kakodkar. The report has made a recommendation that "based on continuous monitoring and GPS data, the tiger seems to have established its territory in Dnyanganga Wildlife Sanctuary. The tiger is using entire sanctuary and also the adjacent territorial forest patches. The tiger will now be monitored using camera traps.

The movement of C1 has opened new conservation challenges for the dispersing tigers in the state of Maharashtra. It has also shown the abilities of the dispersing individuals to traverse through human dominated landscape without any conflict."

The report was submitted by Wildlife Institute of India's Dr Bilal Habib, Dr Parag Nigam, Pallavi Ghaskadbi and Zehidul Hussain.

CityLine

The Hitavada

# 35 tigers, 45 leopards sighted during 'Nisarganubhav' in Melghat unified area

■ **Special Correspondent**





One of the wooden structures constructed in Melghat Tiger Reserve for 'Nisarganubhav' exercise conducted on Thursday. (R) A leopard was sighted by field staff sitting on a *machaan* in Melghat.

MORE than 17,542 wild animals, including 35 tigers, 45 leopards, 352 sloth bears, 172 wild dogs and 752 Indian gaurs were sighted during 'Nirsarganubhav', an exercise carried out on *Buddha Pournima* on Thursday by sitting on 'machaans' near waterholes in Melghat Tiger Reserve and Protected areas under the Field Director of the reserve.

The census was carried out by field staff members of wildlife wing like forest guards, round officers, guides and forest labourers sitting on 547 wooden structures constructed near waterholes in Sipna, Gugamal, Akot, Melghat, Akola and Pandharkawda Wildlife Divisions. The whole Melghat Tiger Reserve, Katepurna, Karanja Sohal, Dnyanganga, Lonar, Tipeshwar and Painganga Wildlife Sanctuaries were also covered.

The exercise is conducted every year on the full moon night of *Buddha Pournima* to count the wild animals and get direct/indirect evidences in the full moon light. Every year, nature lovers and volunteers take part voluntarily in this exercise but this time it was limited to forest staff due to COVID-19 pandemic and as per the order from the Principal Chief Conservator of Forest (Wildlife) not to involve others. These six wildlife divisions come under the administration of M S Reddy, Additional Chief Conservator of Forest and Field Director, Melghat Tiger Reserve.

The staff members sat on 140 machaans constructed in Sipna Wildlife Division, 95 in Gugamral division, 140 in Akot division, 58 in Melghat division, 56 wooden structures in Akola division and 70 in Pandharkawda division.

The activity had been carried out by forest officials including Shiv Bala, DCF, Vinod Shiv Kumar, DCF, Piyusha Jagtap, DCF, Manoj Khairnar, DFO, Subhash Puranik, DFO and Vishal Mali, DFO under the guidance of Reddy. The field staff also recorded sightings of 3,318 wild boars, 727 sambar/deer, 879 spotted deer, 433 barking deer, 10 four horned antelopes, 75 porcupines, 67 civet cats, 15 hyena, 1,685 blue bulls, 5,763 Hanuman langur, four pangolins, one honey badger, 30 mongoose, 72 wild cats, 492 grey jungle fowl, 17 jackal, 58 hare 2136 peacocks, 398 black bucks etc.

# निसर्ग सृष्टीवर आधारीत कलाकृती


सृष्टी किशोर रिठे


निसर्ग संरक्षण संस्था, अमरावती.

✆: 8830733480












**पियुषा जगताप**
उपवनसंरक्षक
मेळघाट वन्यजीव विभाग
✆: 9552355707


# निसर्ग सृष्टीवर आधारीत कलाकृती









प्रफुल्ल सावरकर
(उपजीविका तज्ञ)
मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.
✆: 8928929920



# पांढरकवडा वन्यजीव विभाग

महाराष्ट्र शासन निर्णय महसूल व वनविभाग यांच्या मार्फत ३/९/२०१३ ला पांढरकवडा वन्यजीव विभागाची निर्मिती करण्यात आली. पूर्वी या विभागात आकोला (वन्यजीव) विभागातील पैनगंगा अभयारण्य आणि पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर विभागातील टिपेश्वर अभयारण्य हे दोन अभयारण्य समविष्ट करण्यात आले आहेत. पूर्वी पांढरकवडा वन्यजीव विभाग पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर यांचा अंतर्गत कार्यन्वित होता तर १ एप्रिल २०२० पासून दर विभाग मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या अंतर्गत करण्यात आला आहे. या विभागचे विभागीय कार्यालय यवतमाळ जिल्हातील केळापूर तालुक्यातील पांढरकवडा येथे १/०४/२०१४ पासून स्थापन करण्यात आले आहे.

पांढरकवडा व केळापूर तालुक्यातील खुनी नावाची नदी उगम पावते जी पैनगंगा नदीची उपनदी आहे. दुसरे बाजीराव पेशवे यांचा पाडाव याच खुनी नदीच्या किनाऱ्यावर झाला. या तालुक्याच्या दक्षिणेस तेलंगणा राज्य आहे. उत्तर आणि दक्षिण भारतात जोडणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ या शहरातून जातो. पांढरकवडा शहरापासून टिपेश्वर अभयारण्य १३ कि.मी. अतरावर आहे.


## आदिवासी :

टिपेश्वर अभयारण्य क्षेत्रालगत "कोलम", परधन, गवारी, गोंड हे आदिवासी समाज आहेत. तसेच पैनगंगा अभयारण्यात "कोलम, परधन, गोंड व इतर समाज आहे.

## क्षेत्राचा तपशील :

पांढरकवडा वन्यजीव विभागा अंतर्गत टिपेश्वर अभयारण्य व पैनगंगा असे दोन वन्यजीव अभयारण्य असून एकूण क्षेत्रफळ ५४९.३ चौ.कि.मी.

## टिपेश्वर अभयारण्य :



या अभयारण्याची स्थापना ३०/४/१९९७ ला करण्यात आली, या अभयारण्याचे एकूण क्षेत्रफळ १४८.६२ वर्ग कि.मी. आहे. या अभयारण्य क्षेत्रात टिपेश्वर नावाचे गाव होते जे २०१२ ला पुनर्वसन करण्यात आले आहे. या गावात तिपाई देवीचे प्राचीन देऊळ आहे व त्यावरून टिपेश्वर हे गावाचे नाव झाले व या देवीच्या नावावरून या अभयारण्याला टिपेश्वर नाव देण्यात आले.

टिपेश्वर अभयारण्य हे वाघाची भूमी म्हणून नावारूपाला आली आहे, जिथे २०१९-२० मध्ये प्रोढ १० वाघाचा व ७ अवयस्क वाघांचा समवेश आहे. शिवाय बिबट,तडस, कोल्हा, रान मांजर या सोबत चितळ आणि पेंच व्याघ्र प्रकल्पातून सांबर या अभयारण्यात सोडण्यात आले होते आणि आता हे सांबर येथे उत्तमरीत्या स्थिरावले आहे.

हे अभयारण्य वाघाचे भ्रमण मार्ग म्हणून सुद्धा महत्वाचे आहे या अभयारण्यातील वाघांनी कावल व्याघ्र प्रकल्प (तेलंगाणा) पैनगंगा, इसापूर, ज्ञानगंगा व गौताळा या अभयारण्यापर्यंत भ्रमण केल्याचे निदर्शनात आले आहे. या अभयारण्याचे क्षेत्रफळ कमी असून देखील वाघाचे महत्वाचे केंद्र झाले झाले आहे.

टिपेश्वर अभयारण्य हे शास्त्रीय अभ्यासानुसार व connectivity नुसार कावल, मेळघाट, पेंच, बोर व ताडोबा व्याघ्र प्रकल्पांना जोडणारे महत्वाचे क्षेत्र असल्याने Landscape Level Tiger Conservation दृष्टीने अत्यंत महत्वाची भूमिका आहे.











**पैनगंगा अभयारण्य :**

हे अभयारण्य पूर्वी महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचने नुसार २७/५/१९७१ ला किनवट गेम रिझर्व अभयारण्य म्हणून जाहीर करण्यात आले होते. नंतरच्या अधिसूचनेनुसार २५/२/१९८६ ला वन्यजीव संरक्षण कायदा अधिनियम, १९७२ चे कलम १८ अंतर्गत दिनांक २७/५/१९७१ चे अधिसूचनेत समविष्ट २१८.७६ चौ.किमी. क्षेत्रात पुसद वन विभागाचे १०५.८६ किमी. वन क्षेत्राचा समावेश करून एकूण ३२४.६२ चौ.किमी. वनक्षेत्र पैनगंगा अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले. पैनगंगा अभयारण्य क्षेत्रामध्ये यवतमाळ जिल्हातील उमरखेड तालुक्यातील ११ गावांच्या वन क्षेत्राचा समावेश होतो.

२४/१/१९९६ ला  पैनगंगा अभयारण्याचे क्षेत्र व्यवस्थापनाकरिता आकोला वन्यजीव विभागाकडे सोपवले होते नंतर पांढरकवडा वन्यजीव विभागाची स्थापना झाल्यावर सदर अभयारण्य हे पांढरकवडा वन्यजीव विभागा अंतर्गत कार्यन्वित झाले होते जे पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या अंतर्गत कार्यरत होते. १ एप्रिल २०२० पासून हे अभयारण्य सुद्धा मेळघाट व्याघ्र प्रकल्पा अंतर्गत समविष्ट करण्यात आले आहे.

या अभयारण्यातून पैनगंगा नदी वाहत असून या नदीच्या नावावरून या अभयारण्याचे नाव ठेवण्यात आले आहे. उष्ण कटबंधीय पानगळीच्या वनामध्ये हे वन समविष्ट आहे, या अभयारण्यामध्ये बिबट, अस्वल, कोल्हा, चौसिंगा, चितळ, नीलगाय या शिवाय चिंकारा हा प्राणी दिसून येतात.

या अभयारण्य परिसरातून वाहणारा धबधबा पर्यटकांचे विशेष आकर्षण आहे.












पैनगंगा अभयारण्य
आपले सहर्ष स्वागत करीत आहे



# आभार...

**आपण आपले उत्तम छायाचित्र**
**मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या**
**मासिकेसाठी उपलब्ध करून दिल्यामुळे**
**आपले मनःपूर्वक धन्यवाद!**

- अंगुल खांडेकर
- डॉ. मयूर भैलुमे
- सुनिल वाकोडे
- हिरालाल चौधरी
- परमानंद आलोकार
- पियुषा जगताप
- वाईल्डलाईफ क्राईम सेल
- प्रफुल्ल सावरकर
- धनंजय सायरे
- सतिश अनसिंगकर
- मयूर सुर्वासे
- विशाल बनसोड

**कृत्रिम पाणवण्यावरील जिवसृष्टी**
डोलार, गुगामल वन्यजीव विभाग,
मेळघाट व्याघ्र प्रकल्प

Office of

**Additional Principal Chief Conservator of Forest & Field Director,**
**Melghat Tiger Reserve, Amravati.**

You are invited to explore the all new accommodation and restaurants at Semadoh, Narnala, Harisal & Kolkas. Melghat team will ensure you will have a great time.

**Website: www.magicalmelghat.com**

**Please feel free to coordinate with Mr. Swapnil, E-mail: magicalmelghat@gmail.com or Call him on +91-895653016. He will help you plan your programme.**




To,

______________________________

______________________________

______________________________

मेळव्याघ्र मध्ये प्रसिध्द झालेले लिखाण लेखकांची वैयक्तीक विचारधारणा आहे.

मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानास प्राप्त होणाऱ्या देणग्या, आयकर अधिनियमाच्या कलम 80 जी अंतर्गत 50% आयकर सवलतीस पात्र आहे. निसर्ग संवर्धनाला मदत करा आणि आयकरात मदत करा व आयकरात सूट मिटवा. प्रतिष्ठानचे बँक खाते मेळघाट व्याघ्र प्रकल्प प्रतिष्ठान या नावे ॲक्सिस बँक लि., अमरावती (महा.) च्या शाखेत आहे. खाते क्र. 91510002574231, IFS Code: UTIB000265